

हिंदू धर्म म्हणजे काय ?

हिंदू धर्म म्हणजे काय?

महात्मा गांधी

अनुवादक

तारा धर्माधिकारी

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

तर्फे

भारतीय इतिहास अनुसंधान परिषद

ISBN 81-237-1523-4

पहिली आवृत्ती 1995 (*शके* 1917)

दुसरी आवृत्ती 2001 (*शके* 1923)

रु. 30.00

What is Hinduism *(Marathi)*

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क

नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

महात्मा गांधींच्या जयंतीच्या रौप्यमहोत्सवी शताब्दीच्या निमित्ताने त्यांची हिंदू धर्मविषयक समृध्द जाणीव सर्व समाजापुढे मांडतांना मला फार आनंद होत आहे. या संकलनात समाविष्ट केलेले हे लेख मूळ हिंदी आणि गुजराती भाषेतील असून, ते *यंग इंडिया, हरिजन* आणि *नवभारत* साठी लिहिले होते. हे लिखाण त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगी केलेले असले तरी त्यातून उभरणारे हिंदू धर्माचे चित्र समग्रता, समृध्दता आणि मानवी जीवनाच्या अस्तित्वाच्या समस्यांना सामोरी जाणारी संवेदनशीलता, या दृष्टीने केवळ अतुलनीय आहे. हिंदू धर्म म्हणजे काय याबाबत गांधींजीचे विचार जाणून घेणे मोलाचे तर आहेच, परंतु माझा विश्वास असा आहे की आजच्या विशिष्ट परिस्थितीत ते विशेष महत्वाचे आहेत.

हे संकलन तयार करतांना माझे नेहरू संग्रहालयातील सहकारी आणि उप संचालक डॉ. हरिदेव शर्मा यांची मला फार मदत झाली. भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेकरिता, अगदी कमी अवधी असतांनाही नॅशनल बुक ट्रस्टने हे कार्य हाती घेतल्याबद्दल, मी ट्रस्टचा ऋणी आहे.

रवींद्र कुमार
अध्यक्ष
भारतीय इतिहास अनुसंधान परिषद
नवी दिल्ली

26 एप्रिल 1994

1

हिंदू धर्म म्हणजे काय ?

हिंदू धर्माचे हे सुदैव म्हणा किंवा दुर्दैव की हिंदू धर्माची कुठलीही अधिकृत अशी धर्मश्रध्दा नाही. म्हणून माझ्याविषयी गैरसमज होऊ नये यासाठी मी म्हणतो की सत्य व अहिंसा ही माझी धर्मश्रध्दा आहे. जर मला कोणी हिंदू धर्माची व्याख्या करावयास सांगितली तर मी एवढेच म्हणेन की अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध म्हणजे हिंदू धर्म. एखाद्या मनुष्याचा ईश्वरावर विश्वास नसेल तरीही तो स्वतःला हिंदू म्हणवून घेऊ शकतो. धर्म म्हणजे सत्याच्या शोधाची अविश्रांत साधना. आज हा धर्म जर मरणासन्न, निष्क्रीय झाला असेल व विकासोन्मुख राहिला नसेल तर त्याचे कारण हेच आहे की आपण क्लांत झालो आहोत. हा थकवा दूर होताच हिंदू धर्म पुन्हा जगभर फोफावेल आणि कदाचित पूर्वीपेक्षाही अधिक तेजाने उजळून निघेल. आणि म्हणूनच हिंदू धर्म इतर सर्व धर्मांपेक्षा अधिक सहिष्णु आहे व सर्वसमावेशक आहे.

यंग इंडिया, 24 एप्रिल 1924



2

हिंदू धर्मात सैतानाला स्थान आहे काय ?

माझ्या मते हिंदू धर्माचे सौंदर्य हे त्याच्या सर्वसमावेशक व्यापकतेत निहित आहे. महाभारताच्या देवतुल्य लेखकाने त्याच्या महान कृतीविषयी जे लिहून ठेविले आहे, ते हिंदू धर्मालाही तंतोतंत लागू पडते. इतर कोणत्याही धर्मात जे सार निहित आहे, ते सर्व हिंदू धर्मात सामावलेले आहे आणि त्यात जे समाविष्ट केलेले नाही ते सारे गौण व अनावश्यक आहे.

यंग इंडिया, 17 सप्टेंबर 1995



3

मी हिंदू का आहे ?

जीवनभर स्वतःला भारताची हितेच्छू म्हणविणाऱ्या एका अमेरिकन महिलेने लिहिले आहे:

> पौर्वात्य देशांमध्ये हिंदू धर्म प्रमुख धर्मांपैकी एक मानला जातो आणि हिंदू धर्माचा व ख्रिश्चन धर्माचा सखोल अभ्यास केल्यावर आपण म्हणत आहात की मी एक हिंदू आहे, तर आपण ही निवड का केली हे मी आपल्याला विचारू इच्छिते. हिंदू व ख्रिश्चन हे दोन्ही धर्म मानतात की माणसाची प्रथम गरज ईश्वराला जाणून घेणे, त्याची उपासना करणे व त्याचे अस्तित्व जाणून घेऊन सत्याचा शोध घेणे ही आहे. येशूख्रिस्त हा ईश्वराचा अवतार आहे असे मानणाऱ्या अमेरिकेतील ख्रिश्चनांनी आपल्या हजारो मुलामुलींना हिंदुस्थानात ख्रिस्ताविषयीची माहिती देण्यास पाठविले. याची परतफेड म्हणून आपण कृपा करून आम्हाला हिंदू धर्माविषयीचे आपले भाष्य समजावून सांगावे व हिंदूधर्म आणि येशूची शिकवणूक यांचे तुलनात्मक विवेचन करावे. मी याबद्दल आपली सदैव ऋणी राहीन.

मिशनरी लोकांच्या अनेक सभांमधून मी इंग्लिश व अमेरिकन मिशनऱ्यांना हे सांगण्याचे धाडस केले आहे की त्यांनी जर हिंदुस्थानात आल्यावर 'येशूच्या धर्माचा' प्रसार करण्याचा मोह आवरला असता आणि केवळ 'सरमन ऑन दि माऊंट' च्या शिकवणीनुसार जगण्याचा प्रयत्न केला असता तर हिंदुस्थानी लोकांनी त्यांचा संशय घेण्याएवजी त्यांच्या बरोबर राहण्यात आनंद मानला असता व त्यांच्या सान्निध्याचा प्रत्यक्ष फायदाही करून घेतला असता. अशी माझी भूमिका असल्याने, माझ्या अमेरिकन मित्रांना मी 'परतफेडीच्या रूपाने' हिंदू धर्माविषयी काहीही सांगू शकत नाही. विशेषतः

धर्मांतराच्या अपेक्षेने दुसऱ्या धर्माच्या लोकांना आपल्या धर्माविषयी समजावून सांगण्यावर माझा मुळीच विश्वास नाही. कारण हिंदू धर्म ही प्रचाराची बाब नाही. तो धर्म ही स्वतःच्या जीवनात जगण्याची बाब आहे. म्हणजे मग तो आपोआप स्वप्रचारक बनतो.

शिवाय हिंदू धर्माची मीमांसा करण्याइतका योग्य मी स्वतःला मानत नाही. मी फक्त त्यानुसार जीवन जगत आहे. जर मी लिखित शब्दांमधून हिंदू धर्माच्या तत्वांची मीमांसा करू शकलो नाही तर, मी त्याची ख्रिश्चन धर्माशी तुलना कशी करू शकेन ? म्हणून माझ्यासाठी एवढेच शक्य आहे की मी तुम्हाला अगदी थोडक्या शब्दात मी 'हिंदू' का आहे हे समजावून सांगू शकेन.

सामान्यपणे कुटुंबाच्या परंपरेचा प्रभाव पडतो हे मी मानतो. मी हिंदू कुटुंबात जन्मलो आणि म्हणून आजही मी हिंदू राहिलो आहे. माझ्या नीतीविषयक धारणेशी व आध्यात्मिक उन्नतीशी तो विसंगत आहे असे मला वाटले असते, तर मी त्याचा त्याग केला असता. अभ्यासांती मला असे आढळून आले आहे की मला माहीत असलेल्या सर्व धर्मामध्ये हिंदू धर्म हा अत्यंत सहिष्णु धर्म आहे. त्यात विशिष्ट मतप्रणालीचा आग्रह नाही, त्यामुळे आपल्या अनुयायाच्या आत्माविष्काराला तो अधिकाधिक वाव देतो या गोष्टीचे मला जबरदस्त आकर्षण आहे. हा धर्म सर्व समावेशक असल्यामुळे त्याच्या अनुयायांना केवळ इतर सर्व धर्मांबद्दल आदरच नव्हे तर इतर धर्मांमध्ये जे काही चांगले असेल त्याचा गौरव करुन ते आपल्यात सामावून घेण्यास तो मदतही करतो. अहिंसा ही सर्व धर्मांत समान आहे, पण हिंदू धर्मात तिचा आविष्कार आणि आचार फार उच्च कोटीतील आहे (मी जैन धर्म आणि बौध्द धर्म हे हिंदू धर्माहून वेगळे मानीत नाही.) हिंदू धर्म केवळ सर्व मानवी जीवन एक आहे असे मानीत नाही तर या पृथ्वीतलावरील जे काही जीवनवान आहे, ते सर्व एक आहे असे मानतो. माझ्यामते हिंदू धर्मातील गोपूजा ही मानवतावादाच्या विकासात एक अपूर्व योगदान आहे. जीवमात्र एक आहे आणि म्हणून पवित्र आहे हा या श्रध्देला जीवनात उतरविण्याचाच तो एक भाग आहे. पुनर्जन्मावर असलेली महान श्रध्दा ही देखील याच श्रध्देचा स्पष्ट परिणाम आहे. अंतिमतः वर्णाश्रमाच्या कल्पनेचा शोध हा देखील अखंड सत्य शोधनाचा एक विलक्षण परिणाम आहे. या लेखात उद्धृत केलेल्या मूलतत्वाची शास्त्रीय परिभाषा करुन मी हा लेख बोजड करू इच्छित नाही. परंतु एवढे सांगतो की माझ्यामते सांप्रतची गोपूजा आणि वर्णाश्रम विचार या मूलभूत गोष्टीचे विडंबन आहेत. या सर्व अतिशय संक्षिप्त लेखात मी फक्त हिंदू धर्माच्या मला वैशिष्ट्यपूर्ण वाटलेल्या अशा लक्षणांचाच उल्लेख केला आहे की ज्यांच्यामुळे मी या धर्माशी निगडित राहिलो.

यंग इंडिया, 20 ऑक्टोबर 1927



4

हिंदू धर्म

मी स्वतःला आग्रहाने सनातनी हिंदू म्हणवून घेतो, तरीही हिंदू धर्माच्या नावावर ज्या अनेक गोष्टी सर्वसाधारणपणे केल्या जातात, त्या मी मानीत नाही. त्यामुळे जर मी त्यांच्या मताप्रमाणे तसा वागत नसेन तर मला कोणी सनातनी हिंदू मानावे, अशी माझी इच्छा नाही. म्हणून मला हे अत्यंत आवश्यक वाटते की, माझ्यामते सनातन हिंदू धर्म म्हणजे काय हे एकदा परखडपणे मांडलेच पाहिजे.

'सनातन' हा शब्द मी त्याच्या स्वाभाविक अर्थानुसारच वापरतो. मी स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेतो कारण –

1. हिंदू धर्माच्या ग्रंथांवर म्हणजे वेद, उपनिषदे, पुराण इत्यादी धर्मग्रंथांवर मी विश्वास ठेवतो, आणि म्हणून माझा पुनर्जन्मावर व अवतारांवर विश्वास आहे.
2. केवळ वेदातच काटेकोरपणे सांगितलेल्या वर्णाश्रम धर्मावरच माझा विश्वास आहे, त्याच्या सांप्रतच्या लौकिक आणि वेड्यावाकड्या असंस्कृत अर्थाने नव्हे.
3. मी गोरक्षणावर व्यापक अर्थाने विश्वास ठेवतो; आजच्या लोकमान्य अर्थाने नव्हे.
4. मूर्तीपूजेवर माझा अविश्वास नाही.

वेदांविषयी किंवा इतर धर्मग्रंथांविषयी उल्लेख करताना मी त्यांच्याविषयी 'दैवी प्रेरणेने' हा शब्द वापरण्याचे कटाक्षाने टाळले आहे, हे वाचकांनी लक्षात घ्यावे. कारण वेद हेच तेवढे दैवी आहेत असे मी मानीत नाही. बायबल, कुराण आणि झेंदअवेस्ता हे सुध्दा वेदांइतकेच दैवी प्रेरणेतून निर्माण झाले आहेत असे मी मानतो. हिंदू धर्माचे ग्रंथ मी मानतो म्हणून काही त्यातला प्रत्येक शब्द आणि प्रत्येक श्लोक ईश्वराकडून स्फुरलेला आहे असे मानण्याची मला आवश्यकता वाटत नाही. मनाला थक्क करणाऱ्या या ग्रंथांचे

मला प्रत्यक्ष ज्ञान आहे असेही मी म्हणत नाही. परंतु एवढे जरूर म्हणतो की, या धर्मग्रंथांतील मूळ शिकवणीची सत्यता मी जाणतो आणि अनुभवतो. परंतु त्यावरील कोणतेही भाष्य, ते कितीही विद्वत्तापूर्ण असले तरी, जर ते बुध्दीविरोधी व नैतिक भावनांना रूचणारे नसेल, तर ते मी कदापि मानणार नाही. हिंदू धर्मग्रंथांची योग्य मीमांसा आजचे शंकराचार्य अथवा शास्त्रीमंडळीच अधिकारवाणीने करू शकतात असा जर त्यांचा दावा असेल तर तो मला बिलकूल मान्य नाही. उलट या धर्मग्रंथांविषयीच्या आजच्या ज्ञानाची अवस्था अगदी अराजकाची आहे असे माझे मत आहे. सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य याबाबतीत निष्ठापूर्वक पूर्णत्व ज्यांनी प्राप्त केले नसेल आणि ज्यांनी कमावलेली संपत्ती वा स्वामित्व युक्त संग्रहाचा सर्वस्वी त्याग केलेला नाही अशा कोणालाही शास्त्रांचे खरे ज्ञान नसते या हिंदू सूक्तांवर माझा संपूर्ण विश्वास आहे. गुरू या संस्थेबद्दल मला आस्था आहे. पण या काळात लक्षावधी लोकांना गुरूवाचून राहण्याची पाळी येणार आहे. कारण पूर्ण शुध्दता व पूर्ण ज्ञानावस्था यांचे मीलन असलेली व्यक्ती सापडणे अत्यंत दुर्लभ झाले आहे. तरीही आपल्या धर्मातील सत्याचे ज्ञान मिळविण्याबाबत कुणीही हताश होण्याची गरज नाही. कारण प्रत्येक महान धर्माप्रमाणेच हिंदू धर्माची मूलतत्वे सुध्दा न बदलणारी म्हणजेच शाश्वत आहेत व सहज समजण्याजोगी आहेत. प्रत्येक हिंदू मानतो की ईश्वर आहे आणि तो एक आहे आणि पुनर्जन्मावर व मोक्षावर त्याचा विश्वास असतो.

जशी मी माझ्या पत्नीबाबतची भावना यापेक्षा अधिक व्यक्त करू शकत नाही त्याचप्रमाणे हिंदू धर्माबद्दलच्या माझ्या भावनाही मला अधिक शब्दात सांगता येणार नाहीत. जगातील दुसरी कोणतीही स्त्री माझ्या पत्नीप्रमाणे माझे मन हेलावू शकत नाही. याचा अर्थ तिच्यात दोष नाहीत, असे नव्हे. मी धारिष्ट्याने असे म्हणू शकतो की, मला दिसतात त्यापेक्षा कितीतरी अधिक दोषही तिच्याठायी असू शकतील. परंतु आम्हा दोघांमध्ये भावनांचे अभेद्य बंधन आहे. तसेच माझ्या मनात हिंदू धर्माविषयी त्याच्या अनेक दोषांसह, मर्यादा व उणीवांसकट एक विशिष्ट प्रेमाची भावना आहे. गीतेच्या वा तुलसीरामायणाच्या संगीताइतका मी कशानेही मोहून जात नाही. हिंदू धर्मातील ही दोनच पुस्तके मी जाणतो असे म्हटले तरी चालेल. माझ्या कल्पनाविश्वात जेव्हा मी शेवटचा श्वास घेत असेन, तेव्हा गीताच माझे सांत्वन करू शकेल. आज हिंदुंच्या मोठमोठया मंदिरांमधून चालत असलेल्या दुष्कृत्यांची मला जाणीव आहे. परंतु ज्याबद्दल बोलणेही शक्य नाही अशा त्या उणीवांसकटही माझ्या मनात त्या मंदिरांविषयी प्रेम आहे व त्या मंदिरांविषयी जितकी मला आस्था वाटते, तितकी इतर कशाबाबत वाटत नाही. मी पक्का सुधारक आहे. परंतु सुधारणांविषयीची माझी कळकळ मला हिंदू धर्माच्या ज्या मूलभूत गोष्टी आहेत त्यातील एकाचाही धिक्कार करावयास लावीत नाही. मूर्तीपूजेवर माझा अविश्वास नाही, असे मी म्हणतो. देवाची मूर्ती पाहिल्यानंतर माझ्या मनात कसलीही भावना उचंबळून येत नाही. परंतु मला असे वाटते की, मूर्तीपूजा हा मानवी स्वभावाचा एक भाग आहे. आपण नेहमीच प्रतिकांच्या मागे धावत असतो. इतर ठिकाणांपेक्षा

माणसाला चर्चमध्ये शांती का लाभते ? मूर्ती उपासनेला सहायक असते. कोणीही हिंदू मूर्ती हाच परमेश्वर आहे असे मानीत नाही. मी मूर्तीपूजेला पाप मानत नाही.

वरील विवेचनावरून हे सिध्द होते की, हिंदू धर्म हा एका विशिष्ट समाजाचा, वर्गाचा नाही. जगातील सर्व धर्माच्या प्रेषितांच्या पूजेला त्यात स्थान आहे. सर्वसामान्य रूढ अर्थाने हा प्रचारकी धर्म नाही. हिंदू धर्माने आपल्यात नानाविध जातीजमाती सामावून घेतल्या आहेत. पण त्या समावेशाचे स्वरूप सहजपणे अव्यक्त, नकळत विकसित होणारे असे आहे. तुमची जी श्रध्दा असेल किंवा तुमचा जो धर्म असेल, त्यानुसार तुम्ही ईश्वराची उपासना करा असे हिंदू धर्म सांगतो, त्यामुळे तो सर्व धर्मासोबत सलोख्याने, शांततेने राहू शकतो.

अशाप्रकारची माझी हिंदू धर्माची संकल्पना असल्यामुळे मला हिंदू धर्मातील अस्पृश्यतेशी कधीही जुळवून घेता आले नाही, मी सदैव ती एक बांडगुळासारखीच मानली. आपल्याकडे अस्पृश्यता पिढयानपिढया चालत आली आहे हे खरे आहे. परंतु तशा आणखी कितीतरी वाईट चालीही आपल्याकडे आजतागायत चालत आलेल्या आहेत. मुली देवाला अर्पण करून त्यांना वेश्याव्यवसायाला प्रवृत्त करण्याच्या चालीला हिंदू धर्माचे अंग म्हणवून घेताना मला अत्यंत लाज वाटते. तरीही ही चाल हिंदुस्थानच्या काही भागात आजही प्रचलित आहे. कालीमातेला बकऱ्याचा बळी देणे ही गोष्ट मी ठामपणे अधर्म मानतो, आणि ते हिंदू धर्माचे अंग आहे असे मुळीच मानीत नाही. हिंदू धर्म हा अनेक शतकांपासून विकसित होत असलेला धर्म आहे. खुद्द 'हिंदू धर्म' हे नाव देखील परकीयांनी हिंदुस्थानात राहणाऱ्या लोकांच्या धर्माला दिलेले आहे. एकेकाळी धर्माच्या नावावर प्राण्यांचा बळी दिला जात असे हे खरे आहे. पण तो धर्म नव्हे, हिंदू धर्म तर नव्हेच नव्हे आणि मला असेही वाटते की, गाईचे संरक्षण करणे हा जेव्हा पूर्वजांनी धर्म मानला, तेव्हा गोमांस खाणाऱ्यांवर त्यांनी बहिष्कार टाकला असला पाहिजे. आपसातील यादवीचा हा झगडा फार भयंकर झाला असला पाहिजे. केवळ समाजाला न जुमानणाऱ्यावर हा सामाजिक बहिष्कार घातला गेला असे नव्हे तर त्यांच्या पापाचे परिणाम त्यांच्या मुलाबाळांनाही भोगावे लागले असे दिसते. जी रूढी सद्हेतूने अंमलात आणण्याचा प्रयत्न केला गेला ती पुढे भलतीच घट्ट झाली आणि हिंदू धर्मग्रंथांत त्या रूढीला कायम करणारे श्लोकही शिरलेत. अशारीतीने त्या रूढीला शाश्वत करण्याकडे कल होऊ लागला, जो सर्वथा अनुचित व अन्यायकारक होता. माझे हे विवेचन चूक असो की बरोबर असो, पण अस्पृश्यता ही बुध्दीला मुळीच न पटणारी आणि दया, करूणा आणि प्रेम या उपजत भावनांच्या विरोधी आहे. जो धर्म गाईची पूजा करण्यात प्रतिष्ठा मानतो, तो माणसाशी निष्ठुर वागेल, मनुष्यप्राण्यावर अमानुष बहिष्कार टाकेल किंवा ते योग्य मानील, हे शक्य वाटत नाही. माझ्या शरीराचे तुकडेतुकडे करून मला ठार मारणे मी आनंदाने पत्करेन. तरीही मी अस्पृश्यांना कधीही दूर लोटणार नाही. जर हिंदुंनी आपल्या दिव्य धर्माला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक कायमचा मिटविला नाही तर ते

स्वातंत्र्य प्राप्तीला योग्य समजले जाणार नाहीत व त्यांना कधी स्वातंत्र्य मिळणार नाही. मी हिंदू धर्मावर प्राणापेक्षाही अधिक प्रेम करीत असल्याने मला या अस्पृश्यतेच्या कलंकाचा भार असह्य होऊ लागला आहे. आपल्या समाजाच्या एक पंचमांश जनजातीला समानतेची वागणूक नाकारणे म्हणजे ईश्वराचेच अस्तित्व नाकारणे होय.

यंग इंडिया, 6 ऑक्टोबर 1921

5

सनातन हिंदू

(हिंदू धर्मविषयक त्यांच्या भाष्यावर टीका करणाऱ्या एका पत्रकाराला गांधीजींनी लिहिले:)

मी शब्दप्रामाण्यवादी नाही. म्हणून मी जगातील विविध धर्मग्रंथांच्या भावना व मर्म समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. या धर्मग्रंथांनीच त्यांचा अर्थ समजून घेण्यासाठी लाविलेल्या सत्य अहिंसेच्या कसोटीवरच मी त्यांना कसतो. त्या कसोटीला जे उतरत नाही ते मी अग्राह्य मानतो आणि जे उतरते त्या सर्वांचा मी स्वीकार करतो. एका शूद्राने वेदाचा अभ्यास करण्याचे धाडस केल्याबद्दल रामचंद्रांनी त्याला शिक्षा केल्याची कथा प्रक्षिप्त समजून मी अग्राह्य मानतो आणि काहीही असले तरी मी माझ्या कल्पनेतील पूर्णपुरूष रामाची उपासना करतो, ऐतिहासिक रामाची नव्हे. ऐतिहासिक रामाच्या चरित्रात्मक घटनांमध्ये नवे शोध, संशोधन होईल तसतसा फरक पडू शकेल. इतिहासातील रामाचा तुलसीदासांशी काहीही संबंध नाही. इतिहासाच्या कसोटीने पाहिले तर तुलसीदासाचे रामायण कचऱ्याच्या ढिगाच्या योग्यतेचे ठरेल. पण आध्यात्मिक अनुभवाच्या दृष्टीने त्यांचा ग्रंथ मला तरी निदान अद्वितीय वाटतो. पण त्याबाबतीत सुध्दा तुलसीरामायणाच्या प्रसिध्द झालेल्या अनेक आवृत्त्यांमधील प्रत्येक शब्द काही मी शिरसावंद्य मानीत नाही. त्या संबंध ग्रंथात एकूण जो भक्तिभावाचा ओघ आहे तो मला मंत्रमुग्ध करितो. शूद्राला वेद शिकण्याबाबत मनाई करणे मला स्वतःला कधीही मान्य होणार नाही. खरोखरीच माझ्यामते सध्या आपण सारेच शूद्र आहोत, कारण आपण वेठीस धरलेले मजूर आहोत. ज्ञान म्हणजे कोण्या एका वर्गाची वा वर्णाची मिरासदारी वा हक्क नव्हे. परंतु ज्याप्रमाणे प्राथमिक तयारी न करणारांना वातावरणातील

अत्यंत ऊंचीवर विरळ हवेत श्वासोच्छवास करण्याची पात्रता नसते किंवा ज्याप्रमाणे ज्यांचे साध्या गणिताचे प्राथमिक शिक्षण झालेले नसते, ते उच्च भूमिती किंवा बीजगणित समजण्याला व पचनी पाडण्याला अपात्र ठरतात, त्याचप्रमाणे जे लोक प्राथमिक तयारीतून गेलेले नसतात त्यांना उच्चतर किंवा सूक्ष्मतर सत्ये पचनी पाडणे शक्य होणार नाही, ही गोष्ट मी समजू शकतो. शेवटी, काही चांगल्या निरोगी प्रथा पाळल्या पाहिजेत असे माझे मत आहे. गायत्री मंत्री उच्चारणाबाबत काही एक विधी पाळावे लागतात. ते असे की तो मंत्र फक्त घालून दिलेल्या काळात, घालून दिलेल्या पध्दतीनुसार म्हणजे विधिपूर्वक, स्नान केल्यावरच म्हणावयाचा असतो. या विधींवर माझी श्रध्दा आहे, पण प्रत्येक वेळेस या विधीचे पालन करू न शकल्यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून मी आता फक्त भागवत ग्रंथात सांगितलेला द्वादशाक्षर मंत्र म्हणून किंवा तुलसीदासांनी सांगितलेली सोपी सूक्ते म्हणून किंवा गीता आणि इतर धार्मिक ग्रंथांतील काही भजने, प्राकृतातील गीते म्हणून माझे समाधान करून घेत आहे. ही माझी रोजची आध्यात्मिक शिदोरी आहे, हीच गायत्री आहे. माझ्या दैनंदिन जीवनात आवश्यक असलेला सर्व दिलासा व शांतता देण्यास ती पुरेशी आहे.

यंग इंडिया, 27 ऑगस्ट 1925

6

काही आक्षेपांची उत्तरे

मला प्रत्येक ठिकाणी गरिबी दिसते म्हणून मला प्रत्येक ठिकाणी चरखा पाहण्याची इच्छा आहे. जोपर्यंत हाडाचा सापळा झालेल्या हिंदुस्थानातील प्रत्येक गरिबाला आपण पोटभर अन्न व अंगभर वस्त्र देऊ शकत नाही, तोपर्यंत त्यांच्या दृष्टीने धर्माला काही अर्थ उरत नाही. ते आज पशुवत जिणे जगत आहेत आणि त्याला आपणच जबाबदार आहोत. म्हणून आपल्या दृष्टीने चरखा हीच एक तपस्या ठरणार आहे. ज्यांना कुठलाच आधार नाही त्यांची सेवा हाच धर्म होय. असहाय व दरिद्री लोकांच्या रूपात पुष्कळदा ईश्वर आपल्यासमोर प्रकट होत असतो पण आपण मात्र गंधटिळे लावण्यापलीकडे या 'देवांची' कधी दखलही घेत नाही. वेदांमध्ये ईश्वर असतोही आणि नसतोही. जो वेदांतील अक्षरांमागची भावना ध्यानात घेऊन वेद वाचतो त्याला वेदांमध्ये देव दिसतो. जो नुसत्या अक्षरांचे पठण करतो तो फक्त शद्ब च जाणतो. नरसी मेहताने जपमाळेची प्रशंसा केली खरी आणि त्या स्थानी ती योग्यही होती पण तेच नरसी मेहता पुढे गातात :

या गंधाचा व तुळशीचा काय उपयोग ?
या जपमाळेचा आणि नामाजपाचा काय उपयोग ?
या वेदाच्या व्याकरणावर भाष्य करण्याचा काय उपयोग ?
या वेदांच्या केवळ शब्दार्थावर प्रभुत्व मिळविण्याचा काय फायदा ?
या साऱ्यांचा उपयोग परब्रह्म जाणून घेण्यास केला तर ठीक. .
नाहीतर हे सारे उदरभरणाचेच उपाय ठरतील.

मुसलमान 'तसबिह' चे मणी ओढतो, ख्रिश्चन जपमाळ जपतो. जर ती 'तसबिह' किंवा माळ जपण्यात गुंतल्यामुळे ते दोघे सर्पदंश झालेल्या माणसाला मृत्यूपासून

वाचविण्यासाठी धावून जाऊ शकले नाहीत, तर त्या दोघांनाही धर्मच्युत झाल्यासारखे वाटेल. केवळ वेदांचे ज्ञान मिळवून ब्राह्मण धर्मगुरू बनू शकत नाही. तसे झाले असते तर मॅक्समुल्लर देखील धर्मगुरू-धर्मोपदेशक बनले असते. आजचा धर्म जाणणारा ब्राह्मण वेदाभ्यासाला गौण समजून चरखा-धर्माचे अवश्य प्रवर्तन करील आणि आपल्या देशवासीयांची भूक भागवील आणि मगच पुन्हा वेदांचे अध्ययन सुरू करील. त्याआधी नव्हे.

सूत कांतणे हे सांप्रदायिक कर्मकांडापेक्षाही मी निश्चितच श्रेष्ठ मानतो. पण याचा अर्थ असा नव्हे की धर्माचा त्याग करावा. माझे एवढेच म्हणणे आहे की सर्व धर्माच्या अनुयायांनी ज्या आपापल्या धर्माचे पालन करायलाच हवे तो 'धर्म' सर्वांच्या पलीकडे आहे आणि म्हणून ब्राह्मणाने श्रेष्ठ ब्राह्मण होण्यासाठी, मुसलमानाने चांगला मुसलमान होण्यासाठी आणि वैष्णवाने उत्तम वैष्णव होण्यासाठी, सेवेच्या भावनेने चरखा हाती घ्यावा.

जर मला माझ्या बिछान्यात चरखा फिरविता आला आणि त्यायोगे माझे मन जर मी ईश्वरचरणी अधिक लीन करू शकलो, तर मी नक्कीच जपमाळ बाजूला टाकून चरखाच हाती धरीन. जर मी चरखा चालविण्याइतका पुरेसा सशक्त असलो तर, आणि जर मला जपमाळ आणि चरखा यापैकी कुणा एकाची निवड करण्यास सांगितले तर, जोपर्यंत माझ्या देशातील गरिबी आणि उपासमार नष्ट होत नाही तोपर्यंत मी नक्कीच चरख्याचीच निवड करेन. चरखाच माझी जपमाळ होईल. मी अशा अवस्थेची वाट पहात आहे की जेव्हा रामनाम घेणे हादेखील एक अडसरच ठरेल. जेव्हा मला जाणवेल की रामनाम वाणीच्या पल्याड आहे, तेव्हा केवळ नामजपाची मला गरजच उरणार नाही. चरखा, जपमाळ आणि रामनाम हे माझ्या दृष्टीने समान आहेत, वेगवेगळे नाहीत. या तिन्ही गोष्टी मला सेवाधर्मच शिकवितात. तिघांचाही उद्देश्य एकच आहे. सेवाधर्म न आचरिता मला अहिंसाधर्म पाळता येणार नाही आणि अहिंसा पालनावाचून मला सत्य शोधता येणार नाही व सत्याशिवाय दुसरा धर्म नाही. सत्य हेच राम, नारायण, ईश्वर, खुदा, 'अल्ला' आणि 'गॉड' आहे. (नरसी मेहता म्हणतात त्यानुसार "सोन्याला वेगवेगळे घाट व आकार दिले म्हणजे त्याची रूपे व आकार व नावे बदलतात, पण शेवटी असते ते सोनेच."

यंग इंडिया, 14 ऑगस्ट 1924

7

काँग्रेस आणि त्यानंतर

धर्माच्या नावाखाली आपण हिंदुंनी बाह्य कर्मकांडाला विनाकारण जास्त महत्व देऊन खाण्यापिण्याचा प्रश्न म्हणजेच धर्म मानून धर्माची अवनती केली आहे. ब्राह्मणांनी समाजात जे अद्वितीय स्थान मिळविले आहे ते अपूर्व त्यागाची वृत्ती, आंतरिक शुचिता आणि कठोर परिग्रह यांनी उजळून निघालेल्या ज्ञानाच्या भरवशावरच होय. काय खावे, कोणाबरोबर खावे या तपशीलवार नियमांना गैरवाजवी महत्व देत राहिलो तर, हिंदूधर्माचे सत्व नष्ट होण्याची भीती आहे. आतून कसोट्या व प्रलोभने यामध्ये अडकल्यामुळे आपण नीच व शुद्र विचारांच्या स्पर्शाने प्रदूषित व ग्रस्त झालो आहोत. ज्या लोकांना आपण अज्ञान आणि अंहकाराने आपल्यापेक्षा कमी दर्जाचे व हीन लेखतो. त्याना स्पर्श करण्याच्या बाबीचे, अहंकाराने उन्मत्त होऊन आतातारी आपण उगीच स्तोम माजवू नये. ईश्वराच्या सिंहासनासमोर उभे केले जाईल तेव्हा आपण काय खाल्लेपिले आहे, कोणाला स्पर्श केला आहे याबद्दल जाब विचारला जाणार नाही तर आपण कोणाची सेवा केली व कशी केली, हा मुद्दा महत्वाचा ठरणार आहे. आपण एखाद्या जरी निराधार गरीब मानवाची सेवा केली असेल तरच आपण ईश्वर कृपेस प्राप्त होऊ. वाईट, शिळे व उत्तेजक अन्न खाणे टाळावे, तसेच दुर्जन व्यक्तींचा संपर्कही टाळावा पण या विचारांना, या आचारांना प्रमाणाबाहेर अवास्तव महत्व देऊन जीवनाचा समतोल बिघडू देऊ नये. विशिष्ट प्रकारचे अन्न खात नाही असे सांगून या सबबीखाली भ्रष्टाचार, दांभिकता आणि इतर वाईट दुर्गुणांना झाकण्याचा प्रयत्न करू नका आणि या गोष्टी पाळतांना आपल्या अध्यात्माच्या प्रगतीला बाधा येईल म्हणून आपल्या दलित किंवा पतित बांधवाची सेवा करण्याचे टाळू नका.

यंग इंडिया, 5 जानेवारी 1922



8

माझी साधना

प्रेषितांच्या ओळीत जाऊन बसण्याची माझी योग्यता नाही, हे मी जाणून आहे. सत्याच्या शोधाचा मी केवळ एक नम्र उपासक आहे. याच जन्मी मोक्षाची प्राप्ती व्हावी म्हणून मी आत्मदर्शनासाठी अधीर झालो आहे. माझी राष्ट्रसेवा ही देखील या हाडामांसाच्या देहाच्या बंधनांतून आत्म्याची सुटका करण्याच्या माझ्या साधनेचाच एक भाग आहे. या भूमिकेतून विचार केल्यास, माझी सेवा पूर्णतः स्वार्थी आहे असेही म्हटले जाऊ शकते. मला या क्षणभंगुर पृथ्वीतलावरील साम्राज्याची यत्किंचितही अभिलाषा नाही. मला स्वर्गाच्या राज्याची म्हणजेच, मोक्षाची आकांक्षा आहे. माझे उद्दिष्ट साधण्यासाठी मला गुहेत जाऊन बसण्याची गरज भासत नाही. मी जर ते पूर्णपणे जाणून घेतले तर ते सतत माझ्यासोबतच राहील. गुहेत राहणारा माणूसही हवेत किल्ले बांधून मनोरथ रचू शकतो, तर प्रासादात राहणाऱ्या जनकराजाला कुठलेच इमले बांधावयाचे नसतात. गुहेत राहणारा माणूसही मनाच्या पंखावर बसून जगाभोवती घिरट्या घालीत राहतो, पण त्यामुळे त्याला मनःशांती लाभत नाही तर वैभव व ऐश्वर्यात राहणाऱ्या एखाद्या जनकराजालाही आत्म्याची जाण झाली असेल ती लाभू शकते. माझ्या मोक्षाचा मार्ग आहे माझ्या देशाची अविरत कष्ट करीत सेवा आणि त्याद्वारे अखिल मानवतेची सेवा. जगात जे जे जीवनवान आहे, त्या साऱ्याशी मी एकरूप होऊ इच्छितो. गीतेच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास मी माझ्या मित्रांबरोबर व शत्रूंबरोबर सुध्दा शांततेने राहू इच्छितो. म्हणून एखाद्या मुसलमानाने, किंवा ख्रिश्चनाने किंवा हिंदुने जरी माझा तिरस्कार केला आणि द्वेष केला तरी मला त्याच्यावर प्रेम करावयाचे आहे व त्याची सेवा करावयाची आहे, जसे माझ्या पत्नी व मुलांना माझा तिरस्कार वाटला तरी मी त्यांच्यावर प्रेमच करीत असतो व त्यांची

सेवा करीत राहतो. म्हणून माझी देशभक्ती हा शाश्वत मुक्तीच्या आणि शांतीच्या अनंताकडे चालणाऱ्या प्रवासाच्या मार्गातील एक टप्पा आहे. आपल्याला दिसून येईल, की मी धर्मा विना राजकारण मानत नाही. असे राजकारण धर्माला घातक आहे. हे राजकारण मृत्युच्या सापळयासारखे आहे. कारण ते आत्म्यालाच चिरडून टाकते.

यंग इंडिया, 3 एप्रिल 1924

9

हिंदू-मुसलमान तणावाची कारणे व उपाय

ख्रिश्चन धर्मात व थोडयाफार प्रमाणात इस्लाम धर्मातही आढळून येते, तशी माझ्यामते हिंदू धर्मात धर्मांतराची कोणतीही कल्पना नाही. मला वाटते, आर्य समाजाने ख्रिश्चन लोकांचे अनुकरण करूनच प्रचाराचा कार्यक्रम आखला. त्यांची ही आधुनिक पध्दती मला पटली नाही. त्यामुळे फायद्यापेक्षा नुकसानच अधिक झाले आहे. जरी धर्म ही बाब केवळ हृदयापुरती सीमित आहे आणि ती ईश्वर आणि व्यक्ती यांच्या संबंधापुरतीच आहे असे गृहीत धरले तरीही त्यामुळे हीन, स्वार्थी भावनेला चुचकारण्यापर्यंत अवनती झाली आहे. आर्य समाजी धर्मोपदेशकाला दुसऱ्या धर्माची निंदा करण्यातच अधिक आनंद मिळतो असे दिसते. माझे हिंदू मत मला सांगते की सगळे धर्म जवळपास समान आहेत व सत्य आहेत. ते एकाच ईश्वरापासून निर्माण झालेले आहेत. परंतु सर्व धर्म अपूर्ण मानवाची साधने आहेत. शुध्दीकरणाच्या मोहिमेचा खरा अर्थ हा आहे की प्रत्येक स्त्री पुरुषाने आपापल्या स्वतःच्या धर्मानुसार पूर्णतेकडे वाटचाल करावी. अशा वाटचालीत चारित्र्य ही एकच कसोटी असली पाहिजे. जर आध्यात्मिक उन्नती होणार नसेल तर एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जाण्यात काय अर्थ आहे? इतरांचे धर्मपरिवर्तन ईश्वराच्या सेवेच्या उद्देश्याने करण्यात (हाच 'शुध्दी' अथवा 'तबलिघ'चा अर्थ निहित आहे ना?) काय अर्थ आहे? कारण माझे धर्मबंधू आपल्या आचरणाद्वारे आणि कृतीद्वारे रोज ईश्वराला नाकारीत असतात. "रोग बरा करणाऱ्यांनो, स्वतःला बरे करा" हे ऐहिक जगापेक्षा धार्मिक बाबींमध्येच अधिक लागू पडते असे म्हणावे लागेल. पण ही माझी स्वतःची मते आहेत. जर आर्यसमाजी लोकांना वाटत असेल की आपण ही चळवळ आपल्या अंतरातील आवाजाप्रमाणे चालवीत आहोत, तर ती चळवळ चालू ठेवण्याचा त्यांना पूर्ण

अधिकार आहे. अशा प्रकारच्या उत्कट अंतरात्म्याच्या हाकेला कुठल्याच सीमेचे बंधन नसते आणि अनुभवांचा अडसरही नसतो. जर एखाद्या आर्यसमाजी प्रचारकामुळे अथवा आपल्या अंतरात्म्यातील आज्ञेनुसार आपले प्रचाराचे काम करीत असलेल्या एखाद्या हिंदू किंवा मुसलमान प्रचारकामुळे जर हिंदू मुसलमान एकता धोक्यात येत असली तर ती एकता फक्त वरवरची आहे. आपण अशा चळवळींनी विचलित होण्याचे कारण काय ? फक्त अशा चळवळी प्रामाणिक असल्या पाहिजेत. जर मालकन लोकांना हिंदू धर्मात यावयाचे असेल तर तसे करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. परंतु दुसऱ्या धर्माची निंदानालस्ती करणारा प्रचार खपवून घेणे योग्य नाही. कारण त्यामुळे आपण सहिष्णुतेलाच नाकारल्यासारखे होईल. अशा प्रकारच्या प्रचाराचा मुकाबला करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे त्याचा जाहीर निषेध करणे !

यंग इंडिया, 29 मे 1924


10

हिंदुंनी काय करावे ?

हिंदुस्थानातील बहुसंख्य मुसलमान आणि हिंदू हे एकाच 'वंशा'चे असले तरी वेगवेगळ्या धार्मिक वातावरणामुळे ते अलगअलग झाले आहेत. माझा विश्वास आहे आणि मला असे आढळूनही आले आहे की, माणसाचे विचार हे त्याचा चेहरामोहरा तद्वतच त्याचे चारित्र्य बदलून टाकतात. या वस्तुस्थितीचे शीख हे अत्यंत ताजे उदाहरण आहे. मुसलमान सर्वसाधारणपणे नेहमी अल्पसंख्याक असल्याने त्यांचा एक आडदांड आक्रमक वर्ग बनू पहात आहे. शिवाय, नव्या परंपरांचा वारसा मिळाल्याने ते तुलनात्मकदृष्ट्या ते नव्या पध्दतीमधील पौरूषाचे प्रदर्शन करीत असतात. माझ्यामते जरी कुराणात अहिंसेला सर्वाधिक प्राधान्य असले तरी तेराशे वर्षे साम्राज्यवादाच्या विस्तारवादी मनोवृत्तीत वाढल्यामुळे मुसलमान समाज एक लढाऊ वर्ग बनला आहे. म्हणून ते आक्रमक बनले आहेत. अशा आक्रमक प्रवृत्तीची अभिव्यक्ती म्हणजे आडदांडपणा. हिंदुची संस्कृती पुरातन आहे व तो मुख्यतः अहिंसावादी आहे. ख्रिश्चन आणि मुसलमान अद्याप ज्या अनुभवातून जात आहेत ते हिंदू संस्कृतीने अनुभविले आहे. साम्राज्यवादाच्या आधुनिक व्याख्येनुसार जर हिंदू धर्म साम्राज्यवादी मानला तरी त्याचा साम्राज्यवाद केव्हाच नाहीसा झाला आहे. एकतर त्याने साम्राज्यवादाचा जाणूनबुजून किंवा कालपरत्वे त्याग केलेला आहे. अहिंसक वृत्तीच्या प्राबल्यामुळे, शस्त्राचा उपयोग फारच मोजक्या लोकांपर्यंत सीमित राहिला व तोही श्रेष्ठ आध्यात्मिक, आणि निस्पृह अशा विद्वान राजकीय सत्तेच्या आधीन ठेवल्या गेला. म्हणून हिंदू समाज हा वृत्तीने लढाईसाठी कधीच तयार नव्हता. परंतु नंतरच्या काळात त्यांनी आध्यात्मिक तपस्यावृत्ती राखून न ठेवल्यामुळे ते शस्त्रांचा परिणामकारक पर्याय शोधून त्याचा उपयोग करू शकले नाही. शस्त्रास्त्रांचा वापर करण्याची त्यांच्याजवळ बुध्दीही नव्हती आणि तशी त्यांची प्रवृत्तीही नव्हती. त्यामुळे ते भित्रे, बुजरे म्हणण्याइतपत दुर्बल बनले. अर्थातच हा

दुर्गुण हा त्यांच्या सौजन्यपूर्ण वागणुकीचा एक स्वाभाविक परिणाम होता. यादृष्टीने विचार केला तर हिंदुंचे वेगळेपणाने राहणे, जे निःसंशय वाईटच आहे, तरीही त्याचा हिंदुंच्या बुजरेपणाशी काही खास संबंध आहे, असे मला वाटत नाही. म्हणूनच माझा स्वसंरक्षणार्थ उभारलेल्या आखाड्यांवर विश्वास नाही. शरीर संवर्धनाच्या दृष्टीने मी त्याचे मोल मानतो. परंतु स्वसंरक्षणासाठी आध्यात्मिक संस्कृतीचेच पुनरुज्जीवन केले पाहिजे असे माझे मत आहे. सर्वोत्तम आणि चिरकाल टिकणारा आत्मसंरक्षणाचा मार्ग म्हणजे आत्मशुध्दीच होय. आज आपल्याला भयभीत करणारे प्रश्न समोर भेडसावीत असले तरीही मी आपले अधिष्ठान कदापि ढळू देणार नाही. आज जर हिंदुंमध्ये आत्मविश्वास जागृत झाला आणि ते आपल्या परंपरेनुसार कामाला लागले तर त्यांना दांडग्यांची मुळीच भीती वाटण्याचे कारण नाही. ज्याक्षणी ते आपल्या खऱ्याखुऱ्या आध्यात्मिक तपस्येला प्रारंभ करतील, त्यावेळी मुसलमान देखील त्यांना प्रतिसाद देतील. त्याशिवाय त्यांना इलाजच राहणार नाही. जर मला आत्मविश्वासाने प्रेरित झाल्यामुळे मुसलमानांवरही विश्वास ठेवणारे मूठभर हिंदू तरूण भेटले तर हा तरूणगट दुर्बलांची ढाल बनू शकेल आणि ते (तरूण हिंदू) लोकांना न मारता कसे मरता येते हे दाखवून देऊ शकतील. या खेरीज दुसरा मार्ग मला माहीत नाही. ज्यावेळी आमच्या पूर्वजांनी अवतीभोवती दुःखदायक परिस्थिती अनुभविली, तेव्हा ते तपस्येच्या, शुध्दिकरणाच्या मार्गानेच गेले. जेव्हा त्यांना आपल्या शारीरिक असहायतेची जाणीव झाली तेव्हा त्यांनी त्या असहाय्य अवस्थेत भगवंताची प्रार्थना केली आणि आपल्या हाकेला प्रतिसाद देण्यास त्या जगन्नियंत्या परमेश्वराला भाग पाडले. यावर माझा हिंदू मित्र म्हणाला, "होय, पण त्यानंतर परमेश्वराने कुणालातरी शस्त्रास्त्रे घेऊनच पाठविले ना ?" या टोमण्यातील सत्याचा इन्कार करण्याची मला गरज वाटत नाही. मला त्या मित्राला एवढेच म्हणावेसे वाटते की त्याने एक हिंदू या नात्याने मूळ कारणाकडे दुर्लक्ष न करता इप्सित परिणाम घडवून आणावा. जेव्हा आपण पुरेशी तपस्या करू, तेव्हाच लढण्याची वेळ येईल. आपण पुरेसे शुध्द झालो आहे काय ? असे मी आपणास विचारतो. व्यक्तिगत आत्मशुध्दीचे तर सोडा पण अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्यासाठी आपण मनापासून तपश्चर्या तरी केली आहे काय ? आमचे धर्मगुरू जसे परिपूर्ण हवेत तितके आहेत काय ? ज्यावेळेस आम्ही आपले लक्ष फक्त मुसलमानांच्या वागणुकीतील छिद्रान्वेषी भूमिकेवर केंद्रित करतो, तेव्हा आम्ही फक्त हवेत वार करीत असतो.

यंग इंडिया, 19 जून 1924



11

आजचा हिंदू धर्म

हिंदू धर्म ही चैतन्यमय संस्था असून निसर्गनियमानुसार तिची प्रगती वा तिचा ऱ्हास होऊ शकतो. मुळाशी ती अखंड व अविभाज्य असून आता तिचे अनेक शाखा असलेल्या वृक्षात रूपांतर झाले आहे. ऋतुमानांतील बदलांचा त्यावर परिणाम होतो. त्याचेही शरद, ग्रीष्म, शिशिर आणि वसंत ऋतु आहेत. पाऊस त्याचेही पोषण करतो, त्याला सुफलित करतो. तो धर्मग्रंथांवर आधारित आहे आणि नाहीही. त्याचे प्रामाण्य कोणा एका पुस्तकावर आधारित नाही. गीता ही सर्वसाधारणपणे सर्वमान्य आहे, तरी ती केवळ मार्ग दाखविते. रूढींवर तिचा फारच थोडा प्रभाव आहे. हिंदू धर्म हा गंगेसारखा आहे. मुखाशी पवित्र आणि निर्मळ आहे पण वाहत जाताना मार्गातील सर्व अशुध्दता आपल्यासोबत घेतो. गंगेसारखाच हिंदू धर्माचा एकूण प्रभाव कल्याणकारी आहे. प्रत्येक प्रांतात त्याला प्रादेशिक स्वरूप येते. पण त्याचा मूळ गाभा सर्वत्र एकच आहे. रूढी म्हणजे धर्म नव्हे. रूढीरीती बदलू शकतात, परंतु धर्म मात्र बदलत नाही, अबाधित असतो.

हिंदू धर्माची शुचिता त्याच्या भक्तांच्या संयमित वर्तनावर अवलंबून असते. जेव्हा जेव्हा त्यांचा धर्म संकटात सापडला, तेव्हा तेव्हा हिंदू धर्मीयांनी कठोर तपश्चर्या केली, त्या संकटांची कारणे शोधून काढली, आणि त्यांना तोंड देण्याचे उपाय योजिले. शास्त्रे नित्य विकसनशील आहेत. वेद, उपनिषदे, स्मृति, पुराणे आणि इतिहास यांची निर्मिती एकदम आणि एकाच वेळेस झालेली नाही. त्या त्या काळच्या विशिष्ट गरजांमधून आणि विशिष्ट काळांमधून ते उत्पन्न झालेले आहेत. म्हणूनच त्यांच्यात परस्परविरोध असल्यागत भासते. या ग्रंथांमधून शाश्वत सत्ये नव्याने मांडली आहेत असे नव्हे, तर हे ग्रंथ निर्माण झाले, त्या काळात त्याबाबत आचार व्यवहार कसा चालत असे हे दाखवितात. एका विशिष्ट कालात जो आचार चांगला ठरला, तो दुसऱ्या काळात

आंधळेपणाने तसाच अंमलात आणला, तर तो लोकांना पापकर्मात नेऊन टाकील. कारण एकेकाळी यज्ञात प्राण्याचा बळी देण्याची प्रथा असली म्हणून आज ती आपण पुन्हा सुरू करणार काय ? एकेकाळी आपण गोमांस खात होतो, म्हणून आपण आजही गोमांस खावे काय ? एकेकाळी आपण चोराला शिक्षा देताना त्याचे हातपाय छाटून टाकीत होतो म्हणून ती पाशवी प्रथा आपण आजही पुनरुज्जीवित करणार आहोत काय ? बहुपत्नीकत्वाची चाल आपण पुन्हा सुरू करणार आहोत काय ? बालविवाह पुन्हा सुरू करावयाचे आहेत काय ? कोण्या एकेकाळी समाजाच्या काही भागाला बहिष्कृत मानण्यात आले म्हणून आजही त्यांच्या वंशजांना-मुलाबाळांना तसेच बहिष्कृत आणि शापित समजावयाचे काय ?

हिंदूधर्माला कुंठित अवस्था मान्य नाही. ज्ञान हे अनंत आहे तसेच सत्याची व्याप्ती अमर्यादित असते. आत्म्याच्या शक्तीचे नवे ज्ञान व नवे शोध रोज होत आहेत व पुढेही होत राहतील. नवीन अनुभव आपल्याला नवीन कर्तव्यांची जाणीव करीत राहतील. परंतु सत्य मात्र सदैव तेच राहील. त्याचे संपूर्ण ज्ञान आजवर कुणाला तरी झाले आहे काय ? आज वेद हे सत्य सांगतात. ते अनंत आहेत. पण त्यांचे पूर्ण ज्ञान कुणाला तरी झाले आहे काय ? वेदांच्या नावावर जे सांगितले जात आहे,ते जुन्या वेद-ग्रंथांच्या म्हणजे ज्ञानाच्या एक कोट्यांश भाग देखील नसेल. आज आपल्याजवळ जे थोडेकार जुने ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांची संपूर्ण माहिती व ज्ञान तरी कुणाला असेल काय ? अशा या अनंत गुंतागुंतीतून मार्ग काढण्यापेक्षा आमच्या ऋषीमुनींनी एक गोष्ट शिकविली. "यथा पिंडे तथा ब्रह्मांडे" – जसे स्वतःशी वागाल तसे विश्वाशी वागा. स्वतःला निरखून पहाणे सोपे असते. पण विश्वाचे निरीक्षण करणे कठीण असते, शक्य नसते. म्हणून स्वताःला ओळखा म्हणजे विश्वाचे स्वरूप उलगडेल परंतु स्वःला जाणून घेण्यासाठी देखील अविरत प्रयत्न करावे लागतात. केवल अविरतच नव्हे, तर ते अत्यंत निर्मल व शुध्द असावे लागतात. ते प्रयत्न शुध्द हृदयातूनच उमटतात आणि असे शुध्द अंतःकरण यम-नियमांच्या† पालनावर अवलंबून असते.

ईश्वराच्या कृपेवाचून हे यमनियमांचे पालन शक्य होत नाही आणि श्रध्दा व भक्तीवाचून ईश्वरकृपा लाभत नाही. म्हणूनच तुलसीदासाने रामनामाची महती गायिली आहे आणि भागवताच्या लेखकाने द्वादशाक्षर मंत्राचा जप (ॐ नमो भगवते वासुदेवाय) शिकविला आहे. जो हिंदू या मंत्राचा अंतःकरणापासून जप करू शकतो तोच माझ्या मते सनातनी हिंदू म्हणविला जाऊ शकतो. नाहीतर आखो ऋषी (गुजराथ मधील द्रष्टे कवी) म्हणतात त्यानुसार इतर सर्व अगाध अंधार आहे.

युरोपीय लोक आपल्या चालीरीती व रूढींचा अभ्यास करीत आहेत, परंतु त्यांचा अभ्यास टीकेच्या दृष्टिकोनातून होत आहे. भक्तीच्या नव्हे, म्हणून त्यांचे 'अध्ययन' मला धर्म शिकवू शकणार नाही.

हिंदूधर्म हा केवळ काही गोष्टी खाण्यात वा न खाण्यात सीमित नाही. त्याचा मूळ

---

† योग शास्त्रानुसार यम म्हणजे मुख्य सदगुण : अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह. नियम म्हणजे सहजतेने येणारे सदगुण (तेही शास्त्रानुसार) शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान.

गाभा उचित आचरण, अहिंसा आणि सत्याचे योग्य पालन हा आहे. मांसाहार करणारी एखादी व्यक्ती करूणा व सत्य या महत्वाच्या गुणांचे पालन करीत असेल आणि पापभीरू असेल, तर ती मांसाहार न करणाऱ्या दांभिक हिंदुपेक्षा श्रेष्ठ हिंदू आहे. गोमांस खाण्यात व मांसाहार करण्यात जी हिंसा आहे त्यातील सत्य डोळसपणे समजून, जो मनुष्य ते खाण्याचे नाकारतो आणि जो पशुपक्षी व मानवावर समान प्रेम करितो, तो गौरवास पात्र ठरतो. त्याने ईश्वराला पाहिले आहे आणि जाणून घेतले आहे. म्हणून तोच खरा भक्त मानला पाहिजे. तो मानव मात्राचा खरा धर्म म्हणजे काय हे शिकवू शकतो.

हिंदू धर्म आणि अन्य सर्व धर्म तराजूत घालून तोलले जात आहेत. अंतिम सत्य एकच आहे आणि ईश्वरही एकच आहे. आपण आपले सर्व परस्पर विरोधी धर्म, चालीरीती, रूढी, बाजूला ठेवूया आणि सत्याचा सरळ मार्ग स्वीकारुया. तरच आपण खरे हिंदू मानले जाऊ. कित्येकजण स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेत दिमाखाने पृथ्वीवर वावरतात, परंतु त्यातील किती ईश्वराला आवडत असतील कोण जाणे ? फक्त तोंडाने रामनाम जपतात ते नव्हे, तर जे ईश्वराच्या इच्छेनुसार, आज्ञेनुसार वागून सेवा करतात, तेच ईश्वरकृपेस पात्र ठरतात.

यंग इंडिया, 8 एप्रिल 1926



12

बहुमुखी राक्षस

जर पुराणातील कथांचा प्रचलित परिस्थितीवर होणारा परिणाम आपण ओळखला नाही तर त्या कथांपैकी काही कथा आज फारच धोकादायक ठरतील. शास्त्रांत सांगितल्यानुसार आज आपण बारीकसारीक गोष्टी पाळून वागू लागलो अथवा त्यात वर्णन केलेल्या व्यक्तिरेखांनुसार आपण आज वागू लागलो, तर आपले शास्त्र म्हणजे केवळ मृत्युचा सापळाच ठरेल. शास्त्र केवळ आपल्याला नेहमी मूलभूत गोष्टींची परिभाषा करण्यास आणि मीमांसा करण्यास मदत करते. जर धर्मग्रंथांतील एखाद्या प्रसिध्द व्यक्तीने देवाशी अगर माणसाशी पातकी वर्तन केले असेल, तर तेवढ्याच धर्मग्रंथांच्या आधारे आपणासही ते पातक करण्याचा परवाना मिळू शकेल काय ? जगात फक्त सत्य हेच अंतिम महत्त्वाचे असून सत्य हाच परमेश्वर आहे. हे आम्हाला एकदा कळले, की पुरेसे आहे. युधिष्ठिराने सुध्दा खोटे बोलून प्रतारणा केली होती हे सांगण्याची गरज नाही, ते अनावश्यक आहे. जेव्हा तो खोटे बोलला तेव्हा त्याचक्षणी त्याला शिक्षा भोगावी लागली, आणि तो महापुरूष असूनही त्याची शिक्षेपासून सुटका होऊ शकली नाही, हेच सांगणे अत्यावश्यक आहे. तसेच आदि शंकराचार्यांनी चांडाळाला दूर लोटले होते, हेही सांगणे अनावश्यक आहे. अखिल प्राणीमात्राला आपण आत्मीयतेने वागवावे असे सांगणारा धर्मच, एखाद्या प्राण्याला अमानुषतेने वागवावे किंवा पूर्णतः निरपराधी अशा पूर्ण मानवसमाजालाच दूर लोटावे, टाळावे असे सांगेल, हे असंभव आहे. एवढे आपणास समजले म्हणजे पुरेसे आहे. या व्यतिरिक्त आदिशंकरांबाबत काय घडले व काय नाही याची संपूर्ण माहिती आपल्याजवळ नाही, मग आपण निर्णय कसा घेऊ शकणार ? शिवाय 'चांडाळ' या शब्दाचा खरा अर्थ व तो कुठे वापरला, हे तरी आपल्यास कुठे

माहीत आहे ? त्या शब्दाचे अनेक अर्थ आहेत, हे सर्वमान्य आहे आणि त्यातील एक अर्थ आहे 'पापी'. सर्व पापी अस्पृश्य आहेत असे मानले तर, ज्या† पंडिताने प्रश्न विचारला आहे त्यासकट आपल्या सर्वांनाच अस्पृश्य म्हणून बहिष्कृत मानले जाऊ शकेल, अशी रास्त भीती मला वाटते. अस्पृश्यता ही एक पुरातन संस्था आहे, हे कुणीही नाकारू शकत नाही. परंतु ते महापाप आहे. ते केवळ पुरातन आहे असे म्हणून त्याचे समर्थन होऊ शकत नाही.

यंग इंडिया, 29 जुलै 1926

---

† ज्या लेखातून हा उतारा घेतला आहे, तो एका लिखित उत्तराचा भाग असून, ते उत्तर एका दक्षिणेकडील पंडिताने विचारलेल्या अस्पृश्यतेच्या समर्थनाबाबतच्या प्रश्नाचे होते.



13

तुलसीदास

अनेक प्रसंगी, अनेक मित्रांनी माझ्या तुलसीरामायणाबाबतच्या आकर्षणासंबंधी टीका केली आहे. त्यांच्या टीकेचा मथितार्थ असा आहे :

> रामायण हे सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे असे तुम्ही म्हणता पण आम्ही तुमच्याशी कधीही सहमत होऊ शकलो नाही. तुम्हाला हे दिसत नाही का, की तुलसीदासाने त्यात स्त्रियांना तुच्छ लेखले आहे. रामाने भेकडपणे केलेल्या वालीच्या वधाचे समर्थन केले आहे, बिभीषणाने आपल्या देशाशी द्रोह केला तरी त्याचे गुणगान गायिले आहे आणि रामाने सीतेवर घोर अन्याय केला तरीही त्याला अवतारपुरूष मानले आहे. अशा या पुस्तकात तुम्हाला कोणते सौंदर्य आढळले ? तुम्हाला असे वाटते, का की त्यात काव्याचे सौंदर्य असल्याने हे सारे दोष झाकले जाऊ शकतात ? असे असेल तर आम्ही धारिष्ट्य करून सुचवू इच्छितो की याप्रकारचे काम करण्याची तुमची पात्रताच नाही.

मला हे मान्य आहे की या प्रत्येक मुद्यावरील टीकेचे प्रत्युत्तर देणे कठीण आहे आणि यादृष्टीने विचार केला तर पूर्ण रामायणाचा निषेध करावा लागेल. परंतु हे प्रत्येक गोष्टीबद्दल व प्रत्येक व्यक्तीबद्दल देखील म्हणता येईल. एका प्रख्यात कलावंताची अशी गोष्ट सांगतात की आपल्या टीकाकारांना उत्तर देण्यासाठी त्याने आपले चित्र प्रदर्शनात मांडले व सर्व टीकाकारांना आवाहन केले की ज्याला जो भाग आवडला नसेल, त्याने त्याबद्दल सांगावे. परिणाम असा झाला की ज्याच्यावर टीका झाली नाही असा त्याच्या चित्राचा एकही भाग शिल्लक उरला नाही. वस्तुस्थिती अशी होती की ते त्याचे चित्र उत्कृष्ट कलाकृती ठरली होती. खरोखर पाहू गेले असता, वेद, बायबल, कुराण हे धर्मग्रंथ

देखील टीकेच्या तडाख्यातून सुटलेले नाहीत. कोणत्याही पुस्तकाचे योग्य परीक्षण करावयाचे असेल तर त्याचे समग्र मूल्यमापन केले पाहिजे. ही तर बाह्य टीकेची गोष्ट झाली. आंतरिक कसोटीचा विचार करावयाचा झाल्यास त्या ग्रंथांच्या वाचनाने बहुसंख्य वाचकांच्या मनावर कोणता परिणाम झाला हे लक्षात घेतले पाहिजे. या दोन्हीपैकी कोणत्याही कसोटीचा विचार केला तरीही, रामायणाचे उत्कृष्ट ग्रंथ म्हणून असलेले स्थान निर्विवाद आहे. याचा अर्थ असा नव्हे की त्यात कोणताही दोष नाही. पण रामायणाने लाखो लोकांना मनःशांती दिली आहे, श्रध्दाहीनांना श्रध्दा दिली आहे आणि आजतागायत जे हजारो लोक श्रध्दाहीनतेमुळे तळमळत होते. त्यांना सांत्वना दिली आहे, असे मानले जाते. भक्तिभाव त्याच्या प्रत्येक पानातून ओसंडून वाहतो आहे. रामायण ही आध्यात्मिक अनुभूतीची प्रचिती आणून देणारी खाण आहे.

हे खरे आहे की कधी कधी रामायणाचा उपयोग दुष्ट लोक आपल्या दुराचरणाच्या समर्थनासाठी करून घेतात. पण त्यामुळे 'रामायण' वाईट आहे असे सिध्द होत नाही. मी हे मान्य करतो की माझ्यामते तुलसीदासाने अजाणतेपणी स्त्रियांवर अन्याय केलेला आहे. याबाबत आणि इतर अन्य बाबीतही तो तात्कालिक चालीरीतींच्या पलीकडे जाऊ शकला नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, तुलसीदास हा काही समाजसुधारक नव्हता, तो भक्तांचा मेरूमणी होता. रामायणात आढळणारे दिसणारे दोष, हे तुलसीदासाच्या विचारातील दोष नसून ज्या काळात तो राहात होता, त्याकाळच्या विचारांचे ते प्रतिबिंब आहे.

स्त्रियांच्या स्थानाबाबत त्या काळच्या परिस्थितीत आणि तुलसीदासाबाबत समाजसुधारकांची वृत्ती काय असावी ? समाजसुधारकाला तुलसीदासाकडून कोणतेच सहाय्य मिळू शकत नाही काय ? याचे उत्तर ठामपणे हे आहे की तो सहाय्य देऊ शकतो. तुलसीदासाचे रामायणातील स्त्रियांबाबतचे अवहेलनेचे उदगार लक्षात घेऊनही हे विसरता येणार नाही की त्याने सीतेचे अद्वितीय असे चित्र जगासमोर मांडले आहे. सीतेशिवाय रामाचे काय महत्व ? याशिवाय आपल्याला रामायणात कौसल्या, सुमित्रा इत्यादी अनेक उदात्त स्त्रीपात्रेही पहावयास सापडतात. शबरी आणि अहिल्येच्या भक्तीपुढे व श्रध्देपुढे आपण सहजच नतमस्तक होतो. रावण हा राक्षस होता पण त्याची पत्नी मंदोदरी ही सती होती. माझ्यामते, या उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की तुलसीदास हा विचाराने स्त्रीद्वेष्टा नव्हता. उलटपक्षी त्याच्या विचारधारणेनुसार तो स्त्रियांचा आदरच करीत असे. तुलसीदासाची स्त्रियांच्याबाबत काय विचारसरणी होती, हे सांगण्यास एवढे पुरेसे आहे.

वालीच्या वधाबाबत मात्र दुमत असण्याला वाव आहे. बिभीषणात मात्र मला काहीही दोष दिसत नाही. बिभीषणाने आपल्या भावाच्या विरोधात सत्याग्रह करण्याची तयारी दाखविली आहे. त्याच्या उदाहरणावरून अशी शिकवण मिळते की आपल्या देशाच्या राजाच्या दोषाबाबत सहानुभूती प्रकट करणे व त्याच्या दोषांवर पांघरूण घालणे,

हे देशभक्तीचे विडंबन आहे.उलटपक्षी त्याला विरोध करणे हेच खऱ्या देशभक्तीचे लक्षण आहे. रामाला मदत करून बिभीषणाने आपल्या देशाची खऱ्या अर्थाने सेवा केलेली आहे. रामाने सीतेला दिलेली वागणूक निर्दयी व कठोरपणाचे द्योतक नाही, राजाची कर्तव्ये व पत्नीचे प्रेम या दोन भावनांमधील संघर्षाचे ते एक उत्तम उदाहरण आहे.

ज्या संशयात्म्यांना रामायणाबाबत प्रामाणिक शंका वाटत असतील त्यांना माझे सांगणे आहे की त्यांनी कुणीही लावलेला अर्थ यांत्रिकपणे ग्राह्य मानू नये. ज्या भागाविषयी त्यांना प्रामाणिक शंका आहेत,तेवढे भाग त्यांनी सोडून द्यावेत. सत्य आणि अहिंसा यांच्या जे काही विरोधी असेल, त्याला कदापि क्षमा करू नये. रामाने प्रतारणा केली म्हणून आपणही तसे करू शकतो,हा युक्तिवाद म्हणजे केवळ विकृती ठरेल.उलट राम हा प्रतारणा करूच शकत नव्हता असे आपण मानणेच योग्य ठरेल.ज्याप्रमाणे गीतेत म्हटले आहे, "या जगात दोषमुक्त अशी एकही वस्तू नाही",म्हणून गोष्टीतील हंसाप्रमाणे नीरक्षीर विवेक न्यायानुसार पाणी टाकून द्यावे व दूध प्यावे,तसे आपणही चांगल्या गोष्टी संग्रही ठेवाव्यात व वाईट गोष्टींचा त्याग करावा. या जगात फक्त ईश्वराशिवाय इतर कुणीही व काहीही परिपूर्ण नाही.

यंग इंडिया, 31 ऑक्टोबर 1929

14

साप्ताहिक पत्र
(इतर प्रश्न)

(यात गांधीजींचा श्री बॅसिल मॅथ्यूज यांच्याशी झालेला संवाद उद्धृत केलेला आहे. त्यांना हे जाणून घेण्याची उत्सुकता होती की गांधीजी काही आध्यात्मिक ध्यानधारणा करतात काय किंवा त्यासाठी त्यांना काही विशिष्ट पुस्तकांचे वाचन सहायभूत झाले आहे काय :)

गांधीजी : माझा योगसाधनेशी खास परिचय नाही. आता मी जी साधना करतो आहे ती मी लहानपणी माझ्या दाईकडून शिकलो आहे. मला भुताखेताची भीती वाटत असे. ती मला म्हणत असे, भूतबित काही नसते. तरी पण तुला भीती वाटत असेल तर रामनामाचा जप करीत जा.' हे जे मी माझ्या लहानपणी जे शिकलो, त्यानेच पुढे मोठेपणी माझे मन: पटल व्यापले. या सूर्याने माझ्या आयुष्यातील सर्वात अंधाऱ्या क्षणी उज्वल प्रकाश दाखविला. ख्रिश्चनांनी जर असाच येशूच्या नावाचा जप केला आणि मुसलमानांनी अल्लाच्या नावाचा जप केला तर, त्यांना माझ्यासारखा दिलासा मिळू शकतो. यातून एकच अर्थ ध्वनित होतो, आणि समान परिस्थितीतून समान परिणाम दृग्गोचर होऊ लागतात. हा जो जप करावयाचा असतो, तो मात्र फक्त ओठातून येता कामा नये. तो तुमच्या अस्तित्वाचा अंश बनला पाहिजे.

जर सहाय्यभूत वाचनाबद्दल विचारीत असाल तर, आम्ही भगवद्‌गीतेचे वाचन नेमाने करतो आणि आता तर आम्ही इथवर येऊन पोहोचलो आहोत की दर आठवड्याला गीतेचा पूर्ण पाठ करतो, कारण रोज सकाळी गीतेचे ठराविक अध्याय वाचीत असतो. याशिवाय आम्ही भारतातील विविध संतांची ईश भजने, स्तोत्रे म्हणतो, ज्यात ख्रिस्ती धर्मग्रंथातील काही स्तोत्रे आम्ही समाविष्ट केली आहेत. खानसाहेब

आमच्या बरोबर असल्यामुळे आम्ही कुराणातील काही भागही वाचीत असतो. सर्व धर्मांच्या समानतेवर आमची श्रध्दा आहे. मला स्वतःला तुलसीदासाचे रामायण वाचल्याने सर्वात जास्त समाधान लाभते. तसेच नवा करार (बायबल) आणि कुराण वाचूनही माझ्या मनाला दिलासा मिळतो. मी टीकात्मदष्टीने त्यांच्याकडे पहात नाही. ते ग्रंथ मला भगवद्‌गीतेइतकेच महत्त्वाचे वाटतात. परंतु त्यातील सर्वच काही माझे मन आकर्षून घेत नाही. उदाहरणार्थ, पॉलच्या साहित्यातील एपिस्टलचा सर्व भाग, तद्वतच तुलसीदासाच्या ग्रंथातील सर्वच गोष्टी काही मला पटत नाहीत. गीता हे अत्यंत शुध्द धार्मिक प्रवचन आहे. त्यात कुठल्याही प्रकारची सजावट नाही. त्यात फक्त परमात्म्याकडे जाणाऱ्या आंतरयात्रेचे वर्णन आहे. म्हणून त्यात निवड करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

श्री मॅथ्यूज : तुम्ही खरोखरच प्रोटेस्टंट आहात !

गांधीजी : मी कोण आहे, आणि कोण नाही, हे मलाही माहीत नाही. श्री. हॉज मला प्रेबिस्टेरियन देखील म्हणतील.

श्री मॅथ्यूज : तुम्हाला आपले अंतिम अधिष्ठान कुठे आढळले ?

गांधीजी : ते येथे आहे. (छातीकडे बोट दाखवून) मी प्रत्येक धर्मग्रंथाच्या बाबतीत, ज्यात गीतेचा सुध्दा समावेश आहे, स्वतःची निर्णयशक्ती वापरीत घेतो. कुठल्याही धर्मग्रंथांना माझ्या बुध्दीवर मात करु देत नाही. माझी अशी श्रध्दा आहे की हे प्रमुख धर्मग्रंथ ईश्वरी प्रेरणेतून स्फुरलेले आहेत. परंतु ते दोन चाळण्यातून गाळले जातात. प्रथम ते मानवी प्रेषिताच्या मुखातून प्रकट झाले आणि नंतर भाष्यकारांनी त्यावर भाष्य लिहिले, आणि त्यांचे अधिक स्पष्टीकरण केले. मग त्यात प्रत्यक्ष ईश्वराकडून आलेले काहीच राहत नाही. एखाद्या उताऱ्याचा मॅथ्यूजने एक अर्थ सांगावा असे होते व जॉनने त्या उताऱ्याचा दुसरा अर्थ सांगावा. जरी दैवी आविष्कारावर माझी श्रध्दा आहे, तरी मी माझी बुध्दी गहाण ठेवत नाही. शिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे "केवळ शब्द मारक ठरतो, तर त्यामागची भावना तारक असते." परंतु तुम्ही माझ्या दृष्टिकोनाबद्दल गैरसमज करून घेऊन नका. कारण बुध्दी आणि तर्काच्या पलीकडे असलेल्या श्रध्दांवरही माझा विश्वास आहे. उदाहरणार्थ, ईश्वराचे अस्तित्व. कोणताही युक्तिवाद किंवा तर्क माझी ही श्रध्दा ढळू देऊ शकत नाही. जशी ती लहान मुलगी सर्व तर्क बाजूला सारून वारंवार म्हणत राहिली की "तरीही आम्ही सातजण आहो."†

तसेच एखाद्या श्रेष्ठतर बुध्दीवाद्यासमोर मी भ्रमित झालो तरीही त्या मुलीप्रमाणे वारंवार मी म्हणत राहीन की "होय, तरीही ईश्वर आहेच."

हरिजन, 5 डिसेंबर, 1936

---

†इंग्लंडचे प्रसिध्द कवी वर्डस्वर्थ यांची एक कविता आहे, 'वी आर सेव्हन', आम्ही सात भावंडे आहोत. एका लहान मुलीला कवी विचारतो, 'तुम्ही किती भावंडे ?' ती उत्तर देते 'सात', आणि मग सांगते की दोघे जण थडग्याखाली झोपले आहेत, एक समुद्रावर गेला तो कधी परतलाच नाही, वगैरे. यावर जेव्हा कवी म्हणतो की मग तुम्ही सात नाही. तर ती चिमुकडी ठासून सांगते की 'आम्ही आहोत सात भावंडे.'

15

साप्ताहिक पत्र
(रावबहादुर राजा सोबत संभाषण)

अत्यंत शुध्द स्वरूपाच्या हिंदू धर्मामध्ये एक ब्राह्मण, एक मुंगी, एक हत्ती आणि कुत्रा खाणारा श्वापच्च हे एकाच दर्जाचे मानले जातात. आपले तत्वज्ञान अत्यंत उच्च प्रतीचे असल्यामुळे आणि त्यानुरुप आपले वर्तन नसल्यामुळे, त्या तत्वज्ञानालाच आज दुर्गंध सुटलेला आहे. हिंदू धर्म केवळ सर्व मानवातच नव्हे तर सर्व जीवमात्रात बंधुभाव आहे असे मानतो. या कल्पनेने आपले डोके चक्रावून जाते, पण आपण त्याप्रमाणेच कार्य केले पाहिजे. ज्याक्षणी आपण खऱ्या अर्थाने माणसामाणसातील समानता पाळू लागू, त्याचक्षणी आपण मानव आणि इतर जीवमात्र यांच्यातील समानता प्रस्थापित करू शकू. आणि तो दिवस जेव्हा उजाडेल तेव्हाच पृथ्वीवर शांतता नांदू शकेल आणि माणसात सद्‌भाव निर्माण होईल.

हरिजन, 28 मार्च 1936

16

साप्ताहिक पत्र
(गुरूकिल्ली)

क्विलॉन येथील जाहीर सभेत अगदी प्रथम गांधीजीनी हिंदू धर्मातील उपनिषदांतील एक मंत्र जनतेसमोर मांडला आणि त्यानंतर प्रत्येक सभेत, त्या सर्वसमावेशक मंत्रावर अत्यंत रसाळ आणि साध्या भाषेत सोप्या भाष्यासह अनेक अर्थपूर्ण भाषणे केली. फारसे भाष्य नसलेले पण अत्यंत शास्त्रशुध्द मांडणी करणारे एक भाषण त्यांनी क्विलॉन येथे केले होते ते खाली उद्धृत केले आहे:

> हिंदूधर्माने अनेक संतपुरुषांना प्रेरित केले आणि त्याचे दाखले आपल्याला ऐतिहासिक आलेखात सुध्दा सापडतात, तर असे या धर्मात काय दडलेले आहे, हे मला आधी सांगू द्या. या धर्माने विश्वाला अनेक मोठमोठ्या तत्ववेत्त्याची देणगी का व कशी दिली ? हिंदू धर्मात अशी कोणती गोष्ट निहित होती की ज्यामुळे त्याच्या भक्तांची आस्था शतकानुशतके टिकून राहिली ? त्यांना हिंदू धर्मातील अस्पृश्यता आढळून आली, तरीही त्या धर्माबद्दल त्यांची आस्था कायम राहिली काय ? माझ्या अस्पृश्यताविरोधी संघर्षात अनेक कार्यकर्त्यांनी मला हिंदू धर्माच्या मूलतत्वाबद्दल पुष्कळ प्रश्न विचारले होते. ते म्हणाले, आपल्या धर्मात एक साधासुधा कलमा नाही, जसा तो इस्लामच्या धर्मग्रंथात आहे, किंवा बायबलमध्ये जॉन 3.16 आहेत. अत्यंत तत्वनिष्ठ असे हिंदू आणि त्यातील जे व्यवहारवादी वस्तुनिष्ठ आहेत, अशा दोन्ही प्रवृत्तीच्या लोकांच्या प्रश्नांचे समाधान होऊ शकेल असे काही आपल्याजवळ आहे की नाही ? काहीजण असे म्हणतात, आणि त्याला सबळ कारणेही दाखवितात की गायत्री मंत्र हा याचे उत्तर देऊ शकतो. मी हजारो

वेळा गायत्री मंत्राचे पठण केले असेल. मला त्याचा अर्थही पूर्णपणे समजलेला आहे. परंतु मला असे वाटते की माझ्या सर्व प्रकारच्या जिज्ञासेला त्यात उत्तर मिळू शकत नाही. तुम्हाला माहीतच आहेच की गेल्या कित्येक वर्षापासून मी भगवद्‌गीतेबद्दल सतत शपथेवर हे सांगतो की गीतेमुळे माझ्या सर्व अडचणी सोडविण्यास मदत झाली आहे आणि माझ्या जीवनात ती कामधेनूसारखी आहे व मार्गदर्शक ठरली आहे आणि संकटाच्या काळी शेकडो वेळेस शंका निरसन करणारी "तिळा दार उघड" म्हणणारी जादूची कांडी ठरली आहे. मला असा एकही प्रसंग आठवत नाही, जेव्हा ती मला आधार देऊ शकली नाही. परंतु गीता हे असे पुस्तक नाही की जे मी या संपूर्ण श्रोतृवर्गासमोर ठेवू शकेन. त्यासाठी प्रार्थनापूर्वक अभ्यास करावा लागतो, तेव्हाच ती कामधेनू आपल्या आंचळात दडलेले पौष्टिक दूध आपल्याला देते.

परंतु आता मी एक मंत्र निश्चित करून ठेविला आहे, जो मी आता तुमच्यासमोर म्हणणार आहे, कारण त्यातच हिंदू धर्माचे संपूर्ण सार साठविलेले आहे. मला वाटते, तुमच्यापैकी पुष्कळांना इशोपनिषद माहीत असेल. अनेक वर्षापूर्वी मी त्याचा अनुवाद व त्यावरील भाष्य वाचलेले आहे. येरवडा जेलमध्ये असतांना मी ते पाठ केले होते परंतु त्यावेळी त्याने मला आकर्षून घेतले नाही. पण गेल्या काही महिन्यांपासून त्याने माझ्या अंतःकरणाचा ठाव घेतला आहे, आणि मी आता या अंतिम निर्णयापर्यंत येऊन पोहोचलो आहे की जर सर्व उपनिषदांची आणि सर्व धार्मिक ग्रंथांची एकाएकी राखरांगोळी झाली आणि इशोपनिषदातील फक्त पहिला श्लोक जरी हिंदूच्या स्मरणात शाबूत राहिला, तरी देखील हिंदू धर्म सदैव यावच्चन्द्र दिवाकरौ कायम राहील.

या मंत्राचे चार भाग पडतात. पहिला भाग असा आहे. "ईशा वास्यामिदं सर्व यत्किंच जगत्यां जगत्" याचे भाषांतर मी असे केले आहे की या विशाल जगात आपण जे जे सर्व काही पाहतो, ते सर्व ईश्वराने व्यापलेले आहे. त्यानंतर दुसरा आणि तिसरा भाग येतो आणि ते एकत्र वाचावे. "तेन त्यक्तेन भुंजीथा" : याचे मी दोन भाग करतो आणि त्याचे भाषांतर असे – "त्याचा त्याग कर आणि मग उपभोग घे" याचे दुसरे जे वचन आहे, त्याचा अर्थ एकच आहे, "जे ईश्वर तुला देतो, त्याचा उपभोग घे." दोन्हीचे तात्पर्य एकच असले तरी तुम्ही त्याचे दोन भाग करु शकता आणि त्यानंतर येतो चौथा आणि अंतिम महत्वाचा भाग – "मा गृधः कस्य स्विध्दनम्". याचा अर्थ असा की कोणाच्याही धनाची अथवा मिळकतीची वासना राखू नकोस. या प्राचीन उपनिषदातील इतर सर्व मंत्र, हे पहिल्या मंत्राचे भाष्य आहे अथवा या प्रथम मंत्राचा पूर्णपणे अर्थ समजावून सांगण्याचा केलेला प्रयत्न आहे. हा मंत्र मी जेव्हा गीतेच्या संदर्भात वाचतो, अथवा गीता या मंत्राच्या संदर्भात

वाचतो, तेव्हा मला असे आढळून येते की गीता हा ग्रंथ म्हणजे केवळ या मंत्रावरील भाष्य आहे. कोणी समाजवादी असो अथवा साम्यवादी, तत्वज्ञ असो वा अर्थशास्त्रज्ञ, सर्वांना याने समाधान लाभू शकते असे मला वाटते. जे हिंदू धर्म मानीत नाहीत, अशा सर्वांना उद्देशून सुध्दा मी धारिष्ट्याने म्हणू शकतो की हा मंत्र त्यांनाही समाधान देईल. आणि हे जर खरे असेल – मी स्वतः ते खरे मानतो की या मंत्राशी जे विसंगत असेल ते आणि या मंत्राच्या अर्थाविरुध्द वाटत असेल असे हिंदू धर्मातील बाकी काहीही न घेतले तरी चालेल, तर सामान्य माणसाला यापेक्षा अधिक काय शिकण्यासारखे आहे की सर्व प्राणीमात्राचा निर्माता, प्रभु हा जो एकच आहे, तो सर्वत्र व्यापलेला आहे. या मंत्राचे इतर तीन भाग पहिल्या भागातूनच ओघानेच निघतात. जर तुमची अशी श्रध्दा असेल की ईश्वराने जे जे निर्माण केले आहे, त्यामध्ये तो वास करतो, तर मग तुम्हाला हे मानले पाहिजे की जे ईश्वराने तुम्हाला दिलेले नाही, त्याचा तुम्ही उपभोग घेऊ शकत नाही आणि पृथ्वीतलावरील असंख्य लेकरांचा तो निर्माता आहे, तर मग हे ओघानेच लक्षात घेतले पाहिजे की तुम्ही कोणाच्याही मिळकतीचा लोभ धरता कामा नये, जर तुम्ही हे मानता की त्याच्या असंख्य बालकांपैकी तुम्ही एक आहात, तर त्यातून ओघानेच हे येते की सर्व काही त्याग करून जे काही तुमचे असेल ते ईश्वर चरणी अर्पण करणे हे तुमचे कर्तव्य ठरते. याचा अर्थ असा की सर्व गोष्टींचा त्याग, ही केवल शारीरिक त्यागाची बाब नव्हे, एक प्रकारे तो दुसरा जन्म, नवा जन्मच असतो. ती बुध्दिपुरस्सर रस केलेली कृती असते, अज्ञानापोटी झालेली नव्हे आणि म्हणूनच तो पुनर्जन्म असतो. आणि शरीर धारण केल्यावर, खाणेपिणे, वस्त्र धारण करणे या गोष्टी आवश्यक असल्याने, माणसाने ईश्वराकडे त्यांची याचना केली पाहिले. आणि हेच त्यागाचे आपोआप मिळणारे फल असते. हा सर्व अर्थ जणू पुरेसा नाही म्हणूनच की काय या मंत्राचा शेवट पुढील एका भव्य विचाराने झालेला आहे. "कुणाच्याही धनाविषयी वासना राखू नकोस" – ज्या क्षणी तुम्ही या शास्त्राज्ञा पाळण्याचे ठरविता त्याचक्षणी या जगाचे एक समंजस नागरिक बनता, आणि जगातील जीवमात्रासोबत तुमचा सलोखा निर्माण होऊन तुम्ही शांततेने जगता व तुमच्या इहलोकातील आणि परलोकातील अत्युच्च आकांक्षा पूर्ण होतात.

हाच तो मंत्र आहे ज्याचे वर्णन गांधीजींनी "गुरू किल्ली" म्हणून केले आहे, ज्यामुळे हृदयात उदभवणाऱ्या सर्व शंकाकुशंकांचे समाधान होते आणि अडचणींचे निवारण होते.

इशोपनिषदातील फक्त या एका या मंत्राची आठवण ठेवा आणि इतर सर्व धर्मग्रंथाना विसरुन जा. नाहीतर तुम्ही शास्त्रवचनांच्या गदारोळात व धर्मग्रंथाच्या समुद्रात स्वतःला बुडवून गुदमरवून घेऊ शकता.जर ते त्यामुळे अधिक नम्र व

अधिक ज्ञानी होणार असतील तर ते ग्रंथ विद्वानांसाठी उचितच ठरतील. परंतु सामान्य माणसाचे काय? त्याला तर हा एक मंत्रच भवसागर तरून जाण्यास उपयोगी पडू शकतो.

"या विश्वाचा नियंता परमेश्वर, जगात जे जे आहे त्यात वास करतो, म्हणून त्याग करा आणि सर्व काही त्याच्या चरणी अर्पण करा व नंतर तुमच्या पदरी जे पडले असेल, नशिबात जे असेल, त्याचा उपभोग घ्या. दुसऱ्याच्या मिळकतीचा लोभ कधीही धरु नका.

हरिजन, 30 जानेवारी 1932

17

हरिपादचे भाषण

गेल्या रात्री क्विलॉन येथील सभेत तुम्हाला मी जो हिंदू धर्माचा संदेश सांगितला त्याबाबतच आज मी काही वेळ बोलू इच्छितो. त्या सभेत मी सांगितले होतें की संपूर्ण हिंदू धर्माचे सार इशोपनिषदाच्या पहिल्या श्लोकात सामावलेले आहे.

ईशा वास्यमिदं सर्व यत्किंच जगत्यां जगत्
त्येन त्यक्तेन भुंजीथाः मा ग्रृधः कस्य स्विध्दनम् ।

जे लोक थोडे बहुत संस्कृत जाणतात, त्यांच्या लक्षात येईल की इतर वैदिकमंत्र जसे दुर्बोध आहेत, तसे यात काहीच कठीण वाटत नाही आणि याचा साधा सोपा अर्थ असा आहे : या विश्वात जे जे काही आहे; लहान, मोठे आहे, ज्यात सर्वात लहान अशा परमाणुचाही समावेश आहे, त्या सर्वात ईश्वर वास करीत असतो आणि तो जगाचा निर्माता व स्वामी म्हणून ओळखला जातो. ईश म्हणजे शासक, आणि जो या जगाचा निर्माता आहे तो त्याच अधिकारामुळे स्वाभाविकपणेच जगाचा शासकही बनतो आणि या श्लोकात त्या द्रष्ट्याने इतर काही विशेषणे न वापरता देवाला संबोधण्यासाठी शासक हेच विशेषण वापरले आहे आणि त्याच्या अधिकार क्षेत्रातून काहीही वगळलेले नाही. तो म्हणतो, या जगात आपण जे जे पाहतो, त्यात ईश्वराचा वास आहे आणि यातूनच स्वाभाविकपणे मंत्राचा पुढील भाग आलेला आहे. त्यात असे आहे, सर्व विश्वाचा त्याग कर, पृथ्वीवर जे जे आहे, केवळ त्याचाच नव्हे तर आपल्या या चिमुकल्या पृथ्वीसह साऱ्या ब्रह्मांडाचा त्याग कर ! तो आपल्याला त्याग कर असे सांगतो कारण आपण इतके क्षुद्र अणुसारखे जीव आहोत की आपल्या ठायी स्वामित्वाची भावना बाळगणेही हास्यास्पद वाटेल आणि मग तो ऋषी सांगतो, या त्यागाचे बक्षिस म्हणजे भुंजीथा :

---

† त्रावणकोर येथील हरिपाद येथे गांधीजींनी 17 जानेवारी, 1937 रोजी दिलेल्या भाषणाचा संपूर्ण गोषवारा.

म्हणजेच तुला जे जे आवश्यक आहे, ते उपभोग ! पण या ठिकाणी अनुवादित केलेल्या 'उपभोग' या शब्दाचा अर्थ 'वापर कर, उपयोग कर' असा होऊ शकतो. पण याचा अर्थ असाही होतो की तुम्हाला तुमच्या जीवनासाठी जेवढे घेणे आवश्यक आहे, त्याहून अधिक घेता कामा नये. म्हणून हा उपभोग किंवा वापर हा दोन मर्यादानी सीमित आहे. एक तर त्यागाच्या क्रियेतून अथवा भागवतकाराने म्हटल्याप्रमाणे 'कृष्णार्पणमस्तुसर्वम्' या भावनेने भोगणे. ज्याची भागवत धर्मावर श्रध्दा आहे त्याने रोज सकाळी उठताच आपले विचार, उच्चार आणि आचार कृष्णार्पण करावयाचे आणि ही त्यागाची व समर्पणाची क्रिया केल्यानंतरच त्याला कोणत्याही वस्तूला हात लावण्याचा अधिकार प्राप्त होईल किंवा घोटभर पाणी प्राशन करता येईल आणि अशातऱ्हेने आपण जेव्हा त्यागाची व समर्पणाची क्रिया करतो, तेव्हाच आपल्याला खाण्याचा, पिण्याचा, कपडे घालण्याचा, घरात राहण्याचा अधिकार लाभतो आणि तोही दैनंदिन जीवनाची गरज भागविण्यापुरताच असतो. म्हणून कोणत्याही अर्थाने घेतले तरी, पाहिजे तर उपभोग वा वापर हे त्यागाचे बक्षीस आहे म्हणा, किंवा त्याग ही भोगाची पूर्वअट माना, त्याग आपल्या अस्तित्वासाठी आणि आमच्या आत्म्याच्या उन्नतीकारिता अत्यंत आवश्यक आहे. आणि मंत्रातील ही अट अपुरी वाटली म्हणूनच की काय ऋषींनी पुढे चटकन असेही सांगून ठेवले आहे की "जे दुसऱ्याचे असेल, त्याचा लोभ धरू नका". म्हणून मी तुम्हाला सांगू इच्छितो की जगातले सारे तत्वज्ञान किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात असलेल्या धर्मातील तत्वे या मंत्रात निहित आहेत, आणि या धर्माशी जे विसंगत, विरोधी आहे, ते सारे या मंत्रातून वगळले आहे. भाष्यार्थ सांगण्याच्या सर्वसामान्य तत्वानुसार श्रुतीशी जे विसंगत व विरोधी असेल ते सरसकट नाकारले पाहिले आणि इशोपनिषद म्हणजेच श्रुती आहे.

मंदिरांचे शुध्दीकरण

आता हा मंत्र मी आजच्या परिस्थितीला लागू करु इच्छितो. जर विश्वामध्ये सर्वत्र ईश्वर वसतो आहे तर मग तो ब्राह्मण असो की भंगी, विद्वान मनुष्य आणि सफाईकामगार, कोणत्याही जातीचा असो, त्या सर्वांमध्ये ईश्वराचा वास असतो ना ? मग आपल्या या मंत्राच्या अर्थानुसार कुणीही उच्च नाही, वा नीच नाही, सर्वसमानच असले पाहिजेत. कारण ही सारी जगत् निर्माण करणाऱ्या ईश्वराचीच लेकरे आहेत ! आणि हे काही ब्राह्मणासाठी वा क्षत्रियांसाठी सांगितलेले तत्वज्ञान नाही. ते स्पष्टपणे मांडलेले शाश्वत सत्य आहे. त्यात कोणत्याही त्रुटीला वाव नाही आणि त्यात कमी काहीजास्त करता येणार नाही. म्हणून त्रावणकोरचे महाराज व राणीसाहेब हे त्यांच्या जनतेतील सर्वात खालच्या घटकापेक्षा थोडेसुध्दा श्रेष्ठ ठरणार नाहीत. आपण सर्व प्राणीमात्र त्या दयावान ईश्वराची लेकरे आहोत, त्याचे दास आहोत. जर महाराजांचे स्थान हे समान लोकांमध्ये प्रथम असेल आणि तसेच ते आहेत, तर ते या कारणामुळे नव्हे की ते शासक आहेत, परंतु ते त्यांना

सेवा करण्याचा अधिकार आहे म्हणून. प्रत्येक महाराज स्वतःला 'पद्मनाभदास'* म्हणवितो हे किती उदात्त, किती छान आहे. म्हणून मी जेव्हा तुम्हाला सांगितले की महाराज किंवा राणीसाहेब हे आपल्यापेक्षा तीळभरही श्रेष्ठ नाहीत, तेव्हा मी महाराजांनी व महाराणींनी स्वतः स्वीकार केलेल्या प्रत्यक्ष सत्याचाच उच्चार केला होता आणि ही जर वस्तुस्थिती आहे तर मग येथील कुणीही व्यक्ती-मग ती स्त्री असो वा पुरुष, आपल्याला दुसऱ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ मानण्याचे धारिष्ट्य करू शकते काय ? म्हणून मी पुन्हा तुम्हाला सांगतो की जर हा मंत्र मान्य प्रभावी असेल तर, येथे जो कोणी स्त्री-पुरुष असे मानीत असेल की देवळात अस्पृश्य आल्याने ते अपवित्र होईल आणि विटाळेल, तर मी त्या व्यक्तीला एका गंभीर पापाचे धनी झाल्याचे जाहीर करीन. मी तुम्हाला सांगू इच्छितो की हरिजन प्रवेश जाहीरनाम्यामुळे† या मंदिरांचे शुध्दीकरण झाले आहे आणि त्यांचा कलंक पुसला गेला आहे.

मी जो हा मंत्र उच्चारला आहे, तो सर्व स्त्रीपुरुष व मुले यांच्या हृदयात कोरला जावा कारण माझ्या मते त्यात साऱ्या हिंदू धर्माचे सार साठविले आहे आणि तसे आहे म्हणूनच, तो प्रत्येक मंदिराच्या प्रवेशद्वारांवर कोरला गेला पाहिजे. मग जर आपण काही लोकांना मंदिरात प्रवेश करू दिला नाही तर आपण त्या मंत्राला प्रत्येक क्षणी खोटे पाडीत असतो असे आपणास वाटत नाही काय ?

म्हणून तुम्हाला स्वतःला जर या अस्पृश्य-मंदिर-प्रवेश-जाहीरनाम्याला पात्र ठरावयाचे असेल आणि तुम्हाला स्वतःशी व जे तुमचे शासक असतील त्यांच्याशी एकनिष्ठ राहावयाची इच्छा असेल तर तुम्ही या जाहीरनाम्यातील प्रत्येक शब्दानुसार व त्यातील भावनेनुसार आचरण केले पाहिजे. या जाहीरनाम्यामुळे ही त्रावणकोरची मंदिरे, जी पूर्वी देवांची निवासस्थाने नाहीत असे मी म्हणत असे, ती आजपासून खऱ्या अर्थाने देवाची निवासस्थाने बनली आहेत. कारण येथे कुठल्याही अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या प्रवेशाला आता मनाई नाही. म्हणून मी आशा करतो व देवाला प्रार्थना करतो की संपूर्ण त्रावणकोरभर कुणीही स्त्रीपुरुष, ही मंदिरे अस्पृश्यांकरिता खुली केली आहेत म्हणून, आणि समाजातील बहिष्कृतांसाठी उघडी केली आहेत म्हणून तेथे जाण्याचे नाकारणार नाही.

हरिजन, 30 जानेवारी 1937

---

* सर्वत्र वास करणाऱ्या विष्णूचा दास — विष्णूदास

† अस्पृश्य मंदिर प्रवेशाचा जाहीरनामा.



18

कोट्टायमच्या भाषणातून

हा मंत्र ईश्वराचे वर्णन जगाचा निर्माता, शासक आणि स्वामी म्हणून करितो. या मंत्राचा जो द्रष्टा होता, ज्याला ह्याचा साक्षात्कार झाला होता त्याचे, "केवळ ईश्वरच सर्वत्र वास करतो," या एका दिव्यभव्य विधानाने समाधान झाले नव्हते. तो त्यापुढे जाऊन म्हणाला, "ईश्वराचा सर्वत्र वास असल्यामुळे, तुझ्या मालकीचे काही नाही, तुझे शरीरसुध्दा तुझे नाही. तुमच्याजवळ असणाऱ्या प्रत्येक वस्तूचा तो वादातीत स्वामी आहे." म्हणून जो स्वतःला हिंदू म्हणवून घेतो, तो जेव्हा पुनर्निर्मितीच्या वा खिश्चन लोकांच्या मतानुसार पुनर्जन्माच्या प्रक्रियेतून जातो तेव्हा त्यांना त्यागाची व समर्पणाची वृत्ती स्वीकारावी लागते. आणि त्याने अज्ञानाने ज्याला स्वतःच्या मालकीची संपत्ती मानली असेल त्याचा परित्याग करावा लागतो. जेव्हा तो त्यागाच्या व समर्पणाच्या भूमिकेतून ही क्रिया पार पाडतो, तेव्हाच त्याला सांगितले जाते की आता ईश्वर त्याची काळजी घेईल. बक्षिसाच्या रूपाने ईश्वराकडून अन्न, वस्त्र, निवाऱ्याबाबतच्या त्याच्या गरजांची पूर्ती होईल. म्हणून समर्पण व त्यागाच्या अटीवरच तो उपभोग अथवा अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांची पूर्ती इत्यादींस पात्र ठरतो. आणि अशाप्रकारे त्याग व समर्पण हे नित्य करणे आवश्यक असते. नाहीतर या घाई गर्दीच्या जीवनात आपल्याला या मूलभूत तत्वाचाच विसर पडेल. या सर्वांवर कळस चढविणारे कथन तो द्रष्टा पुढे करतो ते असे, "दुसऱ्याच्या संपत्तीची अभिलाषा कधीही धरू नये" म्हणून मी म्हणतो की या लहानशा मंत्रामध्ये महान सत्य दडलेले आहे आणि ते सत्य प्रत्येक माणसाच्या मनातील उच्चतम आकांक्षेचे समाधान करते, मग ती आकांक्षा ऐहिक असो वा पारलौकिक असो. साऱ्या जगातील धर्मग्रंथांचे अध्ययन केल्यानंतरही मला या मंत्रात अधिक जोडण्यासारखे काहीही

मिळाले नाही. मी जे धार्मिक ग्रंथांचे थोडेफार वाचन केले आहे, त्याचा आढावा घेता मी हे कबूल करतो की ते अगदी बेताचे आहे. पण त्या सर्व धार्मिक ग्रंथांमधून जे जे चांगले आहे ते जणू या मंत्रातूनच घेतले आहे असे वाटते. विश्वबंधुत्व घ्या, म्हणजे फक्त मानवामानवातील बंधुभावच नव्हे, तर जगतातील सर्व जीवांचे बंधुत्व मानवायाचे असेल तर ते मला या मंत्रात आढळून आले. जगाच्या निर्मात्यावर, विश्वाच्या स्वामीवर श्रध्देची बाब घ्या आणि कोणतेही विशेषण लावा, ते सर्व मला या मंत्रात आढळून येते. ईश्वराप्रती पूर्णतः समर्पित होण्याची वृत्ती घ्या आणि मला जे हवे आहे ते सर्व ईश्वर देईल ही श्रध्दा घ्या, हेही मला या मंत्राच्या ठायीच आढळते. ईश्वर हा प्रत्येकाच्या रोमारोमात भिनला आहे, तुमच्या माझ्यात सुध्दा तोच आहे तर मग त्यातूनच मला या पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रांच्या समतेचा सिध्दांत काढता येतो. आणि त्याने जगातील सर्व साम्यवादी तत्वचिंतकाच्या जिज्ञासेचे समाधान होऊ शकते. हा मंत्र मला शिकवितो की जे जे भगवंताचे आहे, ते ते माझे म्हणून मी स्वतःजवळ ठेवू शकत नाही. आणि जर माझे जीवन, आणि जे लोक या मंत्रावर विश्वास ठेवतात त्यांचे जीवन संपूर्ण समर्पित प्रवृत्तीचे असेल, तर हे ओघानेच येते की हे समर्पित जीवन आपल्या बांधवांच्या सेवेसाठीच वाहावे लागेल.

ही माझी दृढ श्रध्दा आहे, आणि जे कोणी स्वतःला हिंदू समजत असतील त्यांचीही अशीच श्रध्दा असायला हवी आणि मी हेही सुचविण्याचे धारिष्ट्य करतो की माझ्या ख्रिश्चन व मुसलमान बांधवांनी जर आपले धर्मग्रंथ पुन्हा चाळून बघितले तर त्यांनाही या मंत्रापेक्षा अधिक काही सापडणार नाही.

मी तुमच्यापासून हे लपवू इच्छित नाही की हिंदूधर्माच्या नावाखाली अनेक अंधश्रध्दा दडलेल्या आहेत. मी याबद्दल अनभिज्ञ नाही. मला याची अतिशय वेदनापूर्वक जाणीव आहे की, या अंधश्रध्दाचा मुखवटा हिंदूधर्म म्हणून मिरवीत असतो. जे सत्य आहे, ते सत्यच असते हे सांगण्यात मला यत्किंचितही संकोच वाटत नाही. अस्पृश्यता ही सर्वात मोठी अंधश्रध्दा आहे, असे विशद करून सांगण्यात मी मुळीच मागेपुढे पाहिलेले नाही. परंतु हे सारे असूनही मी हिंदू आहे आणि हिंदू राहीन. कारण या साऱ्या अंधश्रध्दा हा हिंदूधर्माचा भाग आहे असे मी मानीत नाही. हिंदू धर्माने घालून दिलेल्या भाष्यांच्या नियमांनुसार मी हे शिकलो आहे की जे सत्य मी तुम्हाला सांगितलेले आहे आणि त्या मंत्रात जे सत्य निहित आहे, त्याच्याशी जे जे विसंगत असेल, ते सर्व हिंदूधर्माला मान्य नाही म्हणून सरसकट नाकारले पाहिजे.

हरिजन, 30 जानेवारी 1937

19

यज्ञ की बलिदान

यज्ञ म्हणजे कोणत्याही ऐहिक अथवा आध्यात्मिक फळाची अपेक्षा न बाळगता, दुसऱ्याच्या कल्याणाकरिता केलेली क्रिया असते. या ठिकाणी 'क्रिया' हा शब्द व्यापक अर्थाने घ्यावा लागतो. त्यामध्ये आचार, विचार आणि उच्चार हे सारे समाविष्ट आहे. या ठिकाणी 'दुसऱ्याच्या' म्हणजे केवळ मनुष्यांसाठीच नव्हे तर जगातील सर्व प्राणीमात्रांसाठी असा अर्थ सामावलेला आहे. असे आहे म्हणून आणि अहिंसेच्या दृष्टिकोनातूनही हलक्या जातीच्या प्राण्यांचा बळी देऊन, मानवतेच्या सेवेसाठी देखील केलेला यज्ञ, हा यज्ञ नसतो. वेदांमध्ये पशुबळीला स्थान आहे असे म्हटले जाते पण त्याला फारसे महत्त्व देऊ नये. आम्हाला एवढे पुरेसे आहे, की असा यज्ञ सत्य आणि अहिंसेच्या मूलभूत कसोटीला उतरू शकणार नाही. वेदांच्या ज्ञानाबद्दलची माझी अक्षमता मी ताबडतोब कबूल करतो. परंतु या प्रश्नाचा विचार करीत असताना माझ्या अक्षमतेबद्दल मला फारशी चिंता वाटत नाही. कारण वेदकालीन समाजात पशुबळी देण्याची प्रथा समाजाचे अंग होती हे सिध्द केले तरी अहिंसेच्या निस्सीम भक्ताच्या दृष्टीने असा दाखला बंधनकारक ठरणार नाही.

यज्ञाची मूलभूत क्रिया अशी असली पाहिजे की ज्यात अधिकाधिक व्यापक क्षेत्रातील जास्तीत जास्त लोकांनी अधिकाधिक संख्येने एकत्र येऊन कमीत कमी कष्टात जास्तीत जास्त लोकांचे म्हणजेच स्त्रीपुरूषांचे कल्याण साधावे. म्हणून दुसऱ्याचे अहित चिंतणारी अगर करणारी क्रिया, मग ती कितीही उदात्त हेतू पूर्ण करण्यासाठी केलेली क्रिया असली तरी ती यज्ञ ठरू शकत नाही, महायज्ञ तर नव्हेच नव्हे. म्हणून गीता असे शिकविते व अनुभवही हेच सांगतो की जी क्रिया, यज्ञ या संज्ञेखाली येऊ शकत नाही, ती नेहमीच बंधनात पाडते.

यादृष्टीने विचार केल्यास जग यज्ञाशिवाय क्षणभरही अस्तित्वात राहू शकत नाही, म्हणून गीतेच्या दुसऱ्या अध्यायात खरे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी अनेक साधने सांगितली आहेत आणि ठामपणे हे सांगितले आहे की यज्ञ हा विश्वनिर्मितीसोबतच अस्तित्वात आला आहे. म्हणून ईश्वराने आपल्याला दिलेल्या या शरीराचा हेतूच हा आहे की आपण जगतातील सर्व प्राणीमात्रांची सेवा करावी. त्यासाठीच गीतेत असे म्हटले आहे की जो यज्ञाला आहुती न देता खातो, तो चोरलेले अन्न खातो. जो शुध्द व पवित्र आचरण ठेवतो, त्याच्या जीवनातील प्रत्येक क्रिया ही यज्ञाच्या स्वरूपातच असते. आपल्या जन्मापासूनच यज्ञाला प्रारंभ झालेला आहे. आपण आयुष्यभर ऋणीच राहणार. म्हणून या साऱ्या विश्वाची सेवा करणे आपले कर्तव्य आहे. ज्याप्रमाणे वेठबिगाराला त्याच्या सेवेबद्दल अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी त्याच्या धन्याकडून मिळतात, त्याचप्रमाणे आपणही उपकृत राहून विश्वचालक ईश्वराकडून मिळणाऱ्या सर्व देणग्यांचा स्वीकार करावा. जे काही आपणास मिळेल ते कृपाप्रसाद समजून घ्यावे. कारण आपण देणेकरी असल्याने आपल्या कर्तव्याची पूर्ती करताना आपल्याविषयी कुणी सहानुभूती बाळगावी या अपेक्षेला आपण पात्र नाही. जर काही मिळाले नाही तर आपण आपल्या धन्याला दोषी ठरवू नये. आपले शरीर हे देवाचे देणे आहे. त्याचे रक्षण करणे किंवा त्याग करणे हे त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. हा दयेचा किंवा तक्रारीचा विषय नव्हे. उलटपक्षी ही अवस्था स्वाभाविक आहे, आणि आनंददायी, हवीशी वाटणारी आहे. आपण फक्त याची जाणीव ठेवली पाहिजे की ईश्वराच्या योजनेत आपले खरे स्थान कोणते आहे. त्यासाठी गाढ श्रध्दा हवी, मगच आपल्याला तो सर्वोच्च दिव्य आनंद अनुभविता येतो. "स्वतः विषयी मुळीच चिंता करू नका, सर्व भरवसा ईश्वरावर टाकून शांत रहा." हीच सर्व धर्माची आज्ञा असावी, असे दिसते.

याबद्दल कुणीही भीती बाळगू नये. जो स्वतःच्या सद्सद्विवेकबुध्दीनुसार सेवेस वाहून घेतो, त्याला अधिक व्यापक सेवेच्या गरजेचे आकलन होत जाते आणि त्याची निष्ठा सतत समृध्द होत जाते. हा सेवेचा मार्ग स्वीकारताना, स्वतःच्या स्वार्थाचा त्याग करता आला नाही, आणि आपल्या जन्माचा उद्देश्य समजून घेता आला नाही, तर हा सेवेचा मार्ग आक्रमणे फार कठीण होते. जाणतेपणी वा अजाणतेपणी आपल्यापैकी प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रकारे सेवा करीतच असतो. जर आपण सेवा करण्याची वृत्ती जाणूनबुजून अंगिकारली तर आपली सेवा करण्याची इच्छाशक्ती अधिकाधिक वाढत जाते. त्यामुळे केवळ आपल्यालाच सुख लाभते असे नव्हे तर संपूर्ण जगही अधिक सुखी होते.

*　　　*　　　*

केवळ सज्जननानीच नव्हे तर आपण सर्वांनी आपली संपदा मानवतेच्या कल्याणार्थ रूजू केली पाहिजे. आणि हे जर असेल, आणि ते आहे तर हे स्पष्टच आहे की मग जीवनातले उपभोगाचे स्थान हळूहळू कमी होऊन त्यागाला स्थान मिळेल. त्यागाची,

कर्तव्याची भावना माणसाला पशुहून काहीतरी वेगळेपण असल्याचे दर्शविते.

काहींना असे वाटते की अशाप्रकारे जीवन जगण्याने आयुष्य कंटाळवाणे, नीरस, कलाहीन होते व गृहस्थाश्रमाचा आनंद मिळत नाही. पण याठिकाणी त्याग म्हणजे जगाचा त्याग करून वनवासात जाणे नव्हे. जीवन जगण्याच्या सर्व क्रियांमध्ये त्यागाची भावना दिसून आली पाहिजे. आयुष्य हे कर्तव्य करण्यासाठी असते, केवळ उपभोगासाठी नव्हे, हे जर जाणून घेतले तर गृहस्थ आपल्या गृहस्थाश्रमाच्या आनंदाला मुकणार नाही. एखाद्या व्यापाऱ्याने कोट्यवधी रूपयांचा व्यापार, त्यागाची वृत्ती ठेवून केला आणि हे नियम पाळले, तर तो आपली क्षमता सेवेसाठी वापरू शकेल. तो लोकांना फसविणार नाही आणि खोटे वायदेही करणार नाही. साधेपणाने आयुष्य जगू शकेल, आणि लक्षावधी रुपयांचे नुकसान सोसेल पण जगातील कोण्याही आत्म्याला दुःख देणार नाही. अशा प्रवृत्तीचा व्यापारी केवळ माझ्या कल्पना विश्वातच असू शकतो असे कुणी समजू नये. जगाच्या सुदैवाने असा व्यापारी पश्चिमेसही आहे आणि पूर्वेसही आहे. अशाप्रकारचे व्यापारी हे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतील हे खरे आहे, परंतु ही प्रवृत्ती काल्पनिक नाही हे पटविण्यासाठी एक जरी माणूस त्या पध्दतीने जगत आहे, हे दाखविणे पुरेसे ठरते. अशा प्रकारच्या त्यागी लोकांना त्यांच्या कामातूनच उपजीविका साधता येते, हे निःसंशय ! परंतु उपजीविका हे त्यांच्या जीवनाचे साध्य नसते, तो केवळ त्यांच्या धंद्याचा एक सहज परिणाम असतो. त्यागाचे आयुष्य हे सुंदर निमुळत्या कळसासारखे कलात्मक असते आणि सात्विक आनंदाने भरलेले असते. यज्ञ जर त्रासदायक व ओझ्यासारखा वाटला तर तो यज्ञच राहात नाही. स्वार्थी उपभोग हा विनाशाकडे नेणारा आणि त्याग अमरत्वाकडे नेणारा असतो. आनंदाला स्वतंत्र असे अस्तित्व नसते. तो आपल्या जीवनाच्या वृत्तीवर अवलंबून असतो. एखाद्या माणसाला प्रेक्षागृहातील देखावे पाहून आनंद लुटता येईल तर दुसऱ्याला आकाशातील नवनवे रंग व शोभा पाहून आनंद होईल. आनंद ही वैयक्तिक वृत्तीची व राष्ट्रीय शिक्षणाची बाब आहे. लहानपणी आपण ज्या गोष्टीतून आनंद घेण्यास शिकतो त्याच पुढे आनंदास कारणीभूत ठरतात. विविध राष्ट्रांच्या विशिष्ट रूचींची अनेक उदाहरणे सहजपणे देता येतील.

पुष्कळ त्यागी लोकांना असे वाटते की त्यांना लोकांपासून त्यांच्या गरजेची प्रत्येक वस्तू फुकट घेण्याचा अधिकार आहे आणि ज्या आवश्यक नाहीत त्याही वस्तू घेण्यास हरकत नाही, कारण ते लोकांची निःस्वार्थपणे सेवा करतात. परंतु ही कल्पना माणसाला नेहमी विचलित करते आणि तो लोकांचा सेवक राहात नाही तर, लोकांवर जुलूम करणारा बनतो.

जो समाजाची सेवा करतो, तो स्वतःच्या सुखाचा विचार करण्यात एक क्षणही वेळ घालवीत नाही, त्याकडे लक्ष द्यावयाचे की दुर्लक्ष करावयाचे हे तो आपल्या परमेश्वरावर सोपवितो. त्याच्या मार्गात येणाऱ्या साऱ्या गोष्टींचे तो ओझे बाळगत नाही. जे त्याला

अति आवश्यक वाटेल तेवढेच तो काटेकोरपणे घेईल व बाकीचे राहू देईल. त्रासदायक परिस्थितीतही तो शांत, क्रोधमुक्त आणि अविचल राहील. जसे सद्‌गुणांचे बक्षीस सद्‌गुणच असते, तसेच सेवेचे मोल सेवाच असू शकते, हे जाणून तो समाधानी राहील. तरीही सेवेच्या कामात दुर्लक्ष करू नये आणि त्यात मागेही राहू नये. ज्याला असे वाटते की फक्त स्वतःचा उद्योगधंदा करताना माणसाने खूप मेहनत करावी परंतु ज्यात काही पैसा मिळत नाही अशी समाजसेवा केव्हाही आणि कशीही केली तरी चालते, त्याला अजूनही त्यागाच्या शास्त्राची मूलतत्वे शिकावयाची आहेत, असे मानावे लागेल. माणसाने इतरांची स्वैच्छिक सेवा करताना स्वतःतील पूर्ण क्षमतेनिशी केली पाहिजे व सेवेला स्वतःच्या कामापेक्षा अधिक महत्व दिले पाहिजे. वस्तुतः जो शुध्द सेवाभावी वृत्तीचा असतो, तो स्वतःसाठी काही न राखता मानवतेच्या सेवेतच स्वतःचे लक्ष केंद्रित करीत असतो.

येरवडा मंदिर, प्रकरण 14-15

20

ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न

आज आपण जे काही पहात आहोत, तो शुध्द हिंदू धर्म नव्हे, बहुधा त्याचे विडंबनच दिसते. नाही तर माझ्यासारख्याला त्याची वकिली करण्याची गरज भासली नसती, त्याची महती स्वयंप्रकाशितच असती. आणि मी जर स्वतः पूर्ण शुध्द असतो तरी देखील काहीच बोलण्याची गरज राहिली नसती. ईश्वर स्वतःच्या तोंडाने कधीच बोलत नसतो. जो मनुष्य कृतीतून ईश्वरासमीप जातो, तोच ईश्वरसदृश बनतो. हिंदू धर्म मला असे शिकवितो की शरीर हे अंतरातील आत्म्याच्या शक्तीला मर्यादित करणारे असते.

पाश्चात्य लोकांनी ज्याप्रमाणे भौतिक क्षेत्रात विस्मयकारक संशोधन करून दाखविले, त्याप्रमाणे हिंदू धर्मानेही धर्म, अध्यात्म व आत्म्याबाबत त्याहीपेक्षा आश्चर्यकारक शोध लावलेले आहेत. परंतु आपल्याला हे महान व सुंदर संशोधन पाहण्याची दृष्टी लाभलेली नाही. पाश्चात्यांनी विज्ञानाद्वारे इतकी प्रचंड भौतिक प्रगती केली आहे की त्यामुळे आपण दिपून गेलो आहेत. परंतु मी मात्र त्या प्रगतीने मोहून गेलो नाही. मला तर असे वाटते की ईश्वरीय योजनेनुसार हिंदुस्थानला याप्रकारे प्रगती करण्यापासून वाचविले गेले आहे, की ज्यामुळे तो लोंढा थोपवून धरण्याचे आपले खास वैशिष्ट्यपूर्ण जीवनकार्य हिंदुस्थान करू शकेल. अखेरीस हिंदू धर्मात असे काहीतरी वैशिष्ट्य असलेच पाहिजे की ज्यामुळे हा धर्म आजपर्यंत तग धरून आहे. या धर्माने बॅबिलॉन सिरीया, पर्शिया, इजिप्त येथील संस्कृतींचा ह्रास झालेला पाहिला आहे आपल्या आजूबाजूला नजर टाका, रोम आणि ग्रीस संस्कृती आज कुठे आहे ? आज तुम्हाला गिबनची इटाली, किंवा प्राचीन रोम, रोम म्हणजेच इटाली होते ना, कुठे दिसत आहे काय ? ग्रीसमध्ये जाऊन पहा, आज ती जगत् प्रसिध्द ॲटिक-संस्कृती कुठेतरी

दृष्टीस पडते काय ? मग हिंदुस्थानात या व पहा, त्याच्या प्राचीन संस्कृतीचा इतिहास पाहा, आणि सभोवार नजर टाका, आणि तुम्हाला म्हणावेच लागेल, मला येथे प्राचीन हिंदुस्थान अजूनही जिवंत स्वरूपात दिसतो आहे. इकडे तिकडे शेणाचे ढीग पसरले आहेत. हे खरे असले तरी त्याखाली समृध्द खजिने दडलेले आहेत. आणि हिंदू धर्म अजूनही जिवंत आहे, याचे खरे कारण असे आहे की हिंदू धर्माने भौतिक प्रगतीवर भर न देता आध्यात्मिक उन्नती हेच आपले ध्येय ठरविले होते.

आपल्या संस्कृतीच्या अनेक देणग्यांपैकी एक महत्त्वाची देणगी म्हणजे मनुष्याने मुक्या प्राण्याबाबत जपलेली एकत्वाची भावना होय. आणि ती अद्‌भूत आहे. माझ्यामते गोपूजा ही एक महान कल्पना आहे आणि ती विस्तारित केली जाऊ शकते. आधुनिक धर्मांतराच्या कल्पनेतून हिंदूधर्म मुक्त आहे, ही सुध्दा एक मोलाची गोष्ट आहे. त्याला धर्मप्रचाराची गरज नाही. तो म्हणतो, 'धर्मानुसार जीवन जगा'. जीवन जगणे हा माझा कार्यभाग, तुमचे जीवन जगणे तुमचा कार्यभाग, मग त्या दोहोचा परिणाम काय दिसून येतो ते काळच ठरवील. शिवाय हिंदू धर्मातील थोर व्यक्तींचे योगदान तर लक्षात घ्या. रामानुज, चैतन्य, रामकृष्ण, त्याहून अधिक आधुनिक काळातील नावे घेण्याची गरज नाही. या सर्व विभूतींनी हिंदू धर्मावर आपली छाप पाडलेली आहे. हिंदू धर्म हा कोणत्याही अर्थाने कालबाह्य झालेला नाही अथवा मृतवत नाही.

आणि चार आश्रमांच्या व्यवस्थेची देणगी ही देखील एक अपूर्व अशी देणगी आहे. साऱ्या जगतात अशी रचना कुठेही आढळत नाही. कॅथालिकांमध्ये आपल्या ब्रम्हचाऱ्यांप्रमाणे अविवाहित धर्मगुरू असतो. परंतु ब्रम्हचर्यासारखी संस्था अस्तित्वात नाही. हिंदुस्थानात मात्र प्रत्येक मुलाला या पहिल्या ब्रम्हचर्य आश्रमव्यवस्थेतून जावेच लागते. किती उदात्त कल्पना होती ती. आज आपली नजर दूषित आहे, विचार त्याहूनही दूषित आहेत आणि शरीराने तर आपण सर्वात अधिक दूषित आहोत. कारण आपण हिंदू धर्म नाकारीत आहोत.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे राहून गेले आहे, आणि ती म्हणजे चाळीस वर्षापूर्वी मॅक्समुल्लर म्हणाले होते की, युरोपाच्या आता लक्षात येत आहे की, पुनर्जन्म ही केवळ कल्पना नाही, ते एक सत्य आहे, ही खरोखरच केवळ हिंदू धर्माचीच देणगी आहे. आजचा वर्णाश्रमधर्म आणि हिंदू धर्म ही दोन्ही विपर्यस्त स्वरूपात दिसत असून त्याच्या भक्तांनीच त्याला नाकारला आहे. यावरील उपाय म्हणजे विनाश नव्हे, तर ती चूक सुधारणे हा होय. आपण आपल्या जीवनातील हिंदुत्व खऱ्या अर्थाने जागवू या आणि मग विचारूया की त्याने आत्म्याला समाधान मिळते की नाही.

यंग इंडिया, 24 नोव्हेंबर 1927

21

ईश्वर आणि काँग्रेस

माझ्या दृष्टीने ईश्वर म्हणजे सत्य व प्रेम. ईश्वर म्हणजे आचारधर्म आणि नैतिकता. ईश्वर म्हणजे निर्भयता. प्रकाश आणि चैतन्य याचा उगम म्हणजे ईश्वर, तरीही तो या सर्वापेक्षा वरचा असतो, पलिकडचा असतो. ईश्वर म्हणजे सद्‌सद्‌विवेकबुध्दी. नास्तिकतावाद्यांची नास्तिकता सुध्दा तोच असतो. ईश्वराच्या अगाध प्रेमामुळे ईश्वर नास्तिकालासुध्दा जगू देतो. तो अंतःकरणाचा शोधक असतो. तो वाणी आणि बुध्दीच्या अतीत आहे. आपण आपल्या स्वतःला आणि आपल्या हृदयाला जितके जाणतो, तो आम्हाला आणि आमच्या त्याहून तो अधिक जाणतो. त्याला माहीत आहे की पुष्कळदा आम्ही बोलतो एक व मनात असते दुसरेच, काही जाणतेपणे असे करतात व काही अजाणता. तो साकार रूपात हवा असतो, त्यांसाठी तो सगुण साकार होतो. ज्यांना ईश्वराच्या स्पर्शाची गरज भासते, त्यांच्यासाठी तो देहधारी होतो. तो म्हणजे अत्यंत शुध्दतम सत्वसार आहे. तो केवळ ज्यांची त्याच्यावर श्रध्दा आहे त्यांच्यासाठी, ज्याला जसा तो हवा आहे, तसा तो त्याच्याकरता होतो. तो आमच्या हृदयात आहे आणि तरीही बाहेर व आमच्या पलीकडे आहे. एखाद्याला काँग्रेसमधून "ईश्वर" हा शब्द काढून टाकता येईल परंतु त्याच्या अस्तिवाला पार नाहिसे करण्याची शक्ती कुणालाच नाही. ईश्वराच्या नामभिधानापेक्षा आणखी पवित्र प्रतिपादन कोणते असू शकेल ? आणि खरोखरच सद्‌सद्‌विवेक बुध्दी ही त्याची अत्यंत तोकडी व त्रासदायक अशी व्याख्या आहे. त्यापेक्षा "ईश्वर" हे तीन अक्षरी नाम अत्यंत सोपे आहे. त्याच्या नावावर त्याला काळिमा लावणारी भयानक अनैतिक कृत्ये व पाशवी अत्याचार केले जातात म्हणून काही त्याचे अस्तित्व संपत नाही. तो अतिसहिष्णु आहे, तो सौम्यही आहे आणि रूद्र आहे. या जगात आणि पुढे येणाऱ्या

जगातही तो म्हणजे अत्यंत करडेपणा गाजविणारे विभूतिमत्व आहे. आपण आपल्या शेजाऱ्यांना, इतर माणसांना आणि पशुंना जी वागणूक देतो, तीच तो आपल्याला देतो. त्याच्यापुढे अज्ञानाची सबब चालत नाही आणि तरीही तो सदैव क्षमाशील असतो. आणि नेहमी आपल्याला पश्चाताप करण्याची संधी देतो. जगाला ज्ञात असणारा तो सर्वात मोठा लोकशाहीचा कैवारी आहे. कारण तो आपल्याला वाईट आणि चांगल्यातून निवड करण्याची पूर्ण मोकळीक देतो. जगाला माहीत असलेला तो सर्वात मोठा हुकुमशहाही आहे कारण कधीकधी तो आपल्या तोंडाशी आलेला पेला हिसकावून घेतो आणि इच्छास्वातंत्र्याच्या आवरणाखाली तो आमच्यासाठी इतकी अपुरी माया ठेवतो की जणू आमच्या हतबल नशिबाकडे पाहून आपली करमणूक करून घेतो. यालाच हिंदूधर्मात, "लीला", "दैवी खेळ" म्हणतात अथवा 'माया' म्हणतात. आम्ही नाही, फक्त देवाचेच अस्तित्व खरे आहे आणि आपण जर असू तर आपण त्याचे निरंतर गुणगान केले पाहिजे. त्याची स्तुती करूया आणि त्याच्या इच्छेनुसार वागूया. आपण त्याच्या बासरीच्या तालावर नाचूया, गाऊया म्हणजे सर्व काही भले होईल.

यंग इंडिया, 5 मार्च 1925



22

अद्वैतवाद आणि ईश्वर

(एका मित्राच्या प्रश्नाला उत्तर म्हणून गांधीजींनी लिहिले होते:)

मी एक अद्वैतवादी आहे आणि तरीही मी द्वैतवादाचे समर्थन करू शकतो. जग हे क्षणोक्षणी बदलत असते, त्यामुळे ते मिथ्या आहे. त्याला शाश्वत स्वरूपाचे अस्तित्व नाही पण जरी ते सतत परिवर्तनशील असले तरी, त्यात असे काही स्वरूप आहे जे सतत अस्तित्वात आहे म्हणून त्या दृष्टीने जग सत्य आहे. म्हणून ते खरे आहे आणि मिथ्याही आहे, आणि म्हणून स्वतःला 'अनेकांतवादी' किंवा 'स्यादवादी' म्हणवून घेण्यात मला हरकत वाटत नाही. पण माझा 'स्यादवाद' हा विद्वानांचा स्यादवाद नाही, तो माझा स्वतःचाच विशिष्ट 'स्यादवाद' आहे. मी त्यांच्याशी वादविवाद करू इच्छित नाही. माझा असा अनुभव आहे 'की मी माझ्या दृष्टीने नेहमी खरेच बोलत असतो आणि माझ्या प्रामाणिक टीकाकारांच्या दृष्टीने नेहमी चुकीचे असतो. मला हे माहीत आहे की आम्ही दोघेही आपापल्या भूमिकेतून बरोबरच असतो आणि ही जाण असल्यामुळे मी आपल्या विरोधकांना अथवा टीकाकारांना कोणतेही हेतू चिकटवीत नाही. हत्ती कसा आहे याबाबत सात आंधळ्यांनी सात वेगवेगळी वर्णने केली. ती त्यांच्या त्यांच्या दृष्टिकोनातून अगदी खरीच होती, परंतु परस्परांच्या दृष्टिकोनातून मात्र खोटी होती व ज्या माणसाने हत्ती पाहिलेला आहे, त्याच्या दृष्टीनुसार, खरी व खोटी, दोन्हीही होती. मला हे वास्तवाचे, अनेकांतवादाचे तत्वज्ञान फार प्रिय आहे. मला मुसलमानाच्या दृष्टिकोनातून मुसलमानाकडे आणि ख्रिश्चनाच्या दृष्टिकोनातून ह्याच तत्वज्ञानाने शिकविले. पूर्वी मला माझ्या विरोधकांचे अज्ञान पाहून राग येत असे. परंतु आज मी त्यांच्यावर प्रेम करू शकतो. कारण मला अशी दृष्टी लाभली आहे की मी लोकांच्या दृष्टिकोनातून कसा दिसतो, हे

समजू लागले आहे आणि माझ्या दृष्टिकोनातून लोक कसे दिसतात हे ही मी जाणतो. मला सारे जग प्रेमाच्या कवेत घ्यावयाचे आहे. माझा 'अनेकांतवाद' हा माझ्या सत्य आणि अहिंसा या जुळ्या तत्वज्ञानाचा परिपाक आहे.

ईश्वराला मी ज्या रुपात मानतो, त्या रुपानेच वर्णितो. मी त्याला कर्ता व अकर्ता या दोन्ही रुपात मानतो. वास्तवातील अनेकांतवादाचा मी स्वीकार केला असल्यामुळे, त्याचाच हा परिणाम आहे. जैनधर्माच्या व्यासपीठावरुन मी ईश्वराचे असृजनशील अंग दाखवू शकतो, तर रामानुजाच्या व्यासपीठावरुन ईश्वराची क्रियाशीलता दाखवून देऊ शकतो. वस्तुतः आपण सारे अचिंतनीयाचे चिंतन करीत आहेत, अवर्णीयाचे वर्णन करू पाहतो आहोत, अज्ञेयाला जाणून घेऊ इच्छितो आहोत आणि म्हणूनच आपली वाणी अडखळते, शब्द अपुरे पडतात आणि पुष्कळदा ते परस्परविरोधी वाटतात. म्हणूनच ब्रह्माच्याबाबत वेदाने अलौकिक शब्दयोजना केली 'नेति नेति'. पण जरी तो किंवा 'ते' हे नाही, तरी तो किंवा 'ते' हे आहे. जर आपण अस्तित्वात आहोत तर आपले जन्मदाते आई-बाप आणि त्यांचे ही आई-बाप अस्तित्वात आहेत. मग सर्वांना जो जन्म देतो तो सर्व सृष्टीचा पिता आहे, हे मानणे योग्यच ठरेल. जर त्याचे अस्तित्व नसेल, तर आपणही नसू. म्हणून आपण सगळे एका आवाजात त्या एकाच देवाला परमात्मा, ईश्वर, शिव, विष्णू, राम, अल्ला, खुदा, दादा होमुझदा, यहोवा, गॉड आणि इतर अनंत नामाने हाका मारीत असतो. तो एक आहे, आणि अनेकही आहे, अणुहून सूक्ष्म आहे, हिमालयाहून भव्य आहे. तो समुद्राच्या एका बिंदूतही सामावला जाऊ शकतो आणि सातासमुद्रांमध्येही सामावत नाही. तो बुध्दीच्या कक्षेच्या पलिकडचा आहे, बुध्दी त्याला समजून घेण्यास असमर्थ आहे. परंतु मला या मुद्यावर अधिक काही सांगण्याची गरज भासत नाही. याबाबत श्रध्देचीच अधिक गरज आहे. माझे तर्कशास्त्र त्याविषयी असंख्य तर्कवितर्क (परिकल्पना) करू शकते. एखादा नास्तिक मला वादविवादात सहज हरवूही शकेल. पण माझी श्रध्दा माझ्या बुध्दीपेक्षा, अधिक वेगाने धावते की इतक्या मी या साऱ्या जगाला आव्हान देत असे म्हणू शकेन की, "ईश्वर आहे, होता आणि पुढेही सदैव राहील."

परंतु ज्यांना त्याचे अस्तित्व नाकारावयाचे असेल, त्यांनाही ते स्वातंत्र्य आहे. तो स्वतः दयाळू व करूणावान आहे. तो काही या पृथ्वीतलावरील राजा नाही, की त्याचे अस्तित्व स्वीकारण्यासाठी त्याला सैन्याची गरज भासेल. तो आपल्याला स्वातंत्र्य देतो, पण त्याची करुणा आपल्याला त्याची आज्ञा स्वीकारावयास लावतो. परंतु जर आपल्यापैकी एखाद्याने त्याची आज्ञा अमान्य करण्याचे ठरविले तर तो म्हणतो "ठीक आहे, माझा सूर्य तुलाही प्रकाश देईल, माझे मेघ तुलाही पाऊस देतील. तुला माझे म्हणणे स्वीकारण्यासाठी मी काही जबरदस्ती करणार नाही." अशा या परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल अज्ञानी लोकानी खुशाल शंका घेत रहाव्यात. जे ईश्वरावर विश्वास ठेवतात अशा अनेक लक्षावधी शहाण्यांपैकी मीही एक आहे, त्यामुळे त्याच्यासमोर नतमस्तक होण्यात आणि त्याचे गुणगान करण्यात मला कधीही थकवा येत नाही.

यंग इंडिया, 21 जानेवारी 1926



23

ईश्वर आहे

जगात एक अवर्णनीय, अद्‌भूत गूढ शक्ती आहे, जी सर्व वस्तूंना व्यापून टाकणारी आहे. ती मला दिसत नाही, परंतु मला तिचा प्रत्यय येतो. ही जी अदृश्य शक्ती आहे, ती सतत जाणवते, परंतु त्याची साक्ष सापडत नाही. कारण माझ्या इंद्रियांना जे जे काही जाणवते काही त्याहून ती अगदीच वेगळी आहे, ती इंद्रियातीत आहे.

काही एका विशिष्ट मर्यादेत ईश्वराचे अस्तित्व सिध्द करून देणे संभवनीय नाही. साध्या बाबतीत या जगात लोकांना हे देखील माहीत नसते की कोण राज्य करते, का करते व कसे करते ? आणि तरीही त्यांना हे माहीत असते की एखादी सत्ता आहे जी राज्य करते. माझ्या मागच्या वर्षीच्या दौऱ्यात म्हैसूरचे पुष्कळ असे गरीब गावकरी भेटले ज्यांना म्हैसूरवर कोण राज्य करते हे माहीतच नव्हते. ते सरळपणे म्हणाले, "कुठला तरी ईश्वर राज्य करीत आहे." आपल्या राजाविषयी या लोकांचे ज्ञान इतके तोकडे तर राजांचा राणा जो ईश्वर त्याचे अस्तित्व मला कळले नाही तर आश्चर्य वाटावयास नको. कारण ते लोक आपल्या राजाहून जितके लहान आहेत त्याहून अनंतपटीने मी माझ्या ईश्वराहून लहान असणारा जीव आहे. तरीसुध्दा त्या म्हैसूरातील गरीब गावकऱ्यांना जशी जाणीव होती, की कुणीतरी राज्य करीत आहे त्याप्रमाणे या सृष्टीत एक व्यवस्थितपणा आहे, प्रत्येक वस्तूवर, प्रत्येक जीवमात्रावर सत्ता चालविणारा अपरिवर्तनीय असा नियम आहे, याची मला खात्रीपूर्वक जाणीव आहे. हा अंध नाही, कारण सजीव प्राण्यांच्या हालचालीवर अंध नियमन सत्ता चालवू शकणार नाही. आणि सर जगदीशचंद्र बोस यांच्या विलक्षण संशोधनाचे आभार मानले पाहिजेत की ज्यांच्यामुळे हे सिध्द झाले आहे की जडात सुध्दा चैतन्य असते. म्हणून जगतातील साऱ्या जीवित प्राणीमात्रावर शासन

करणारा हा नियम म्हणजेच ईश्वर होय. हा नियम व त्याचा नियंता दोन नव्हे तर एकच आहेत, मी हा नियम व तो बनविणारा ईश्वर यांची अवज्ञा करणार नाही कारण मला त्या नियमाविषयी व त्याच्या निर्मात्याविषयी फारच कमी ज्ञान आहे. या ऐहिक सत्तेच्या अस्तित्वाची अवज्ञा किंवा त्याविषयीचे अज्ञान माझ्या काहीच कामास येणार नाही. त्याचप्रमाणे ईश्वराची आणि त्याच्या कायद्याची अवज्ञा केल्याने काही माझी त्याच्या नियमांच्या अंमलबजावणीतून सुटका होऊ शकणार नाही. जगातल्या नियमांचे पालन केल्याने जसे आपले जीवन सुखकर बनते, तसेच दैवी शक्तीच्या समोर नम्रतेने आणि मौन स्वीकारुन नतमस्तक झाल्यास आपली जीवनयात्रा सुखदायी होते.

मला अंधुकतेने हेही जाणवत राहते की माझ्या सभोवताली असलेली प्रत्येक वस्तू परिवर्तनशील आहे, नश्वर आहे तरीही त्या सर्व परिवर्तनशील जगाच्यामागे एक अशी चैतन्य शक्ती आहे जी अविचल, अपरिवर्तनीय आहे. ती सर्वांना एकत्रित धरुन ठेवते, ती सृजन करते, विसर्जन करते आणि पुनर्निर्मिती करते. सचेतन करणारी ही शक्ती आणि चेतना म्हणजेच ईश्वर होय. आणि जे मी केवळ इंद्रियांद्वारे पाहतो ते सर्व अस्थायी असल्याने त्याशिवाय जे काही चिरंतन असेल तर केवळ ईश्वरच होय.

आणि ही जी शक्ती आहे, ती कल्याणकारी आहे की अकल्याणकारी ? मला तर ती केवल पूर्णत: कल्याणकारीच वाटते. कारण मृत्युमध्येही जीवन टिकून आहे, असत्यामध्ये सत्य टिकून राहते, अंधःकारातही प्रकाश टिकून राहतो. म्हणून मी असे अनुमान काढतो की ईश्वर हा चैतन्यमय, सत्यस्वरूप व ज्योतीरूप आहे. तो प्रेममय आहे आणि तो सर्वोच्च परमात्मा आहे.

जो केवळ बुध्दीचेच समाधान करतो, तो ईश्वर नव्हे, पण तो खरोखरच बुध्दीचे समाधान करतो की नाही कुणास ठाऊक ? ईश्वराचे देवत्व हृदयावर सत्ता गाजविण्यात व त्याचे परिवर्तन करुन दाखविण्यात असले पाहिजे. भक्ताच्या प्रत्येक लहानसहान कृतीतही ईश्वराचे रूप प्रकट झाले पाहिजे. हे प्रत्यक्ष अनुभूतीद्वारेच संभवनीय आहे. ती विशिष्ट अनुभूती पंचेद्रियांच्याद्वारे होणाऱ्या अनुभूतीपेक्षा अधिक वास्तव असेल, तरच ते साध्य होऊ शकेल. इंद्रियजन्य ज्ञान आपल्याला खरे वाटले तरी ते फसवे व मिथ्या असते. परंतु जी अनुभूती इंद्रियांच्या अतीत असते, ती प्रमादरहित असते. ही गोष्ट बाहेरील साक्षी पुराव्याने सिध्द होणारी नसते. ती ज्यांना आपल्या हृदयात ईश्वराच्या अस्तित्वाची साक्षात अनुभूती घडते, अशा माणसाच्या बदललेल्या वागणुकीतून आणि व्यक्तिमत्वातून दिसून येते.

सर्व देशात, सर्वकाळी ऋषीमुनींची आणि प्रेषितांची जी अखंड मालिका दृष्टीस पडते, त्यांच्या अनुभवांमधून अशा तऱ्हेचा दाखला आपणास पहावयास मिळतो. तो अमान्य करणे म्हणजे स्वतःलाच नाकारण्यासारखे आहे.

अशी अनुभूती अविचल श्रध्देतून निर्माण होत असते. ईश्वराच्या अस्तित्वाची

कसोटी जो स्वतःमध्ये घेऊ पाहतो त्याला ती ज्वलंत श्रध्देतूनच घेता येईल आणि ही श्रध्दा बाह्य पुराव्यानिशी सिध्द करण्याजोगी नसल्यामुळे सर्वात सुरक्षित उपाय हा आहे की जगाच्या नैतिक सत्तेवर आणि म्हणून नीतिधर्मांच्या सार्वभौमत्वावर आणि प्रेम आणि सत्याच्या धर्मावर विश्वास ठेवून वागावे. सत्य आणि प्रेम यांना जे जे प्रतिकूल असेल त्याचा निर्धारपूर्वक व ताबडतोब त्याग केल्यानेच श्रध्देचे अधिष्ठान सुरक्षित राहू शकते.

कोणत्याही तार्किक व बौध्दिक पध्दतीने मी आसुरी सत्तेचे अस्तित्व सिध्द करु शकत नाही. तसे करू पहाणे म्हणजे स्वतः ला ईश्वराच्या बरोबरीचे मानण्यासारखे आहे. म्हणून मी नम्रपणे स्वीकारतो की जगात पापाचे अस्तित्व आहे. म्हणूनच मी परमेश्वराला अतिसहिष्णु व क्षमावान मानतो कारण तो या जगात पाप चालू देतो. मी जाणतो की त्याच्यात पाप नाही. मला माहीत आहे की तो (पापाचा) कर्ता आहे, तरी तो त्यापासून अलिप्त आहे.

मला हे चांगले माहीत आहे की जोपर्यंत मी प्राण पणाला लावून पापाशी झुंज घेणार नाही, तोपर्यंत मला ईश्वर कधीही समजणार नाही. माझ्या नम्र व मर्यादित अनुभवामुळे माझ्या याबाबतचा विश्वास दृढ झाला आहे. मी जसजसा अधिक पवित्र व शुध्द होईन, तसतशी ईश्वराजवळ पोहोचल्याची प्रचिती येईल येते. यापेक्षा मला अजून खूप काही करायला हवे, म्हणजे माझी आज श्रध्दा जशी केवळ दिखाऊ आहे, तशी ती न राहता, ती हिमालयासारखी अविचल आणि त्याच्यावरील हिमशिखरांसारखी अतिशुभ्र व अति तेजस्वी होईल अशी मी आशा करतो. तोपर्यंत मी पत्रकाराला एवढेच म्हणतो की न्यूमनने आपल्या अनुभवातून गाईलेल्या गाण्यात आपणही सामील होऊ याः

> हे करुणावान ईश्वरा, या सभोवतालच्या अंधःकारातून, मला समोरचा मार्ग दाखव,
> रात्र घनघोर आहे आणि मी घरापासून दूरवर आहे, मला समोरचा मार्ग दाखव,
> समोर पाऊल टाकायला शिकव. मी फार लांबवर पाहू इच्छित नाही.
> एवढे एकच पाऊल मला पुरेसे आहे.

यंग इंडिया, 11 ऑक्टोबर 1928

24

युरोपचे पत्र

(लंडन येथील गोलमेज परिषदेहून परतताना स्वित्झर्लंडमधील एका सभेत दिलेल्या प्रश्नाचे उत्तर) गांधीजी म्हणतात :

तुम्ही मला विचारता की मी ईश्वर सत्य आहे असे का मानतो. माझ्या लहानपणी हिंदू धर्मात असलेला देवाच्या सहस्त्रनामाचा पाठ करण्यास मला शिकविले होते. परंतु देवाची ही एक हजार नामे म्हणजे संपूर्ण नावे नव्हे अशी आमची श्रध्दा आहे. माझ्यामते ते सत्यही आहे, की जगात जितके जीवमात्र आहेत, तितकी ईश्वराची नावे आहेत, आणि म्हणूनच आपण म्हणतो की ईश्वर नामातीत आहे. ईश्वराची इतकी विविध रुपे आहेत की आम्ही म्हणतो तो रूपातीत निर्गुण आहे, तो अनंतमुखाने बोलतो म्हणून आम्ही त्याला वाचातीत म्हणतो, इत्यादी. जेव्हा मी इस्लाम धर्माचा अभ्यास करु लागलो तेव्हा मला आढळून आले की, त्या धर्मातही देवाला अनेक नामे आहेत. जेव्हा ते म्हणतात की ईश्वर म्हणजे प्रेम, त्यांच्यासोबत मीही म्हणतो की ईश्वर प्रेमस्वरूप आहे, परंतु मनातल्या मनात मी पुढे असेही म्हणत असे की ईश्वर प्रेमरूप असू शकेल पण त्या सर्वापेक्षा ईश्वर सत्य आहे हे खरे. जर मानवी वाणीला देवाचे संपूर्ण वर्णन करता येईल तर माझ्यापुरते मी या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचलो आहे की ईश्वर म्हणजे सत्य. परंतु दोन वर्षापूर्वी मी त्याही पलिकडचे पुढचे पाऊल टाकले आहे आणि म्हटले की सत्य हाच ईश्वर होय. तुम्ही "ईश्वर म्हणजे सत्य" आणि "सत्य म्हणजेच ईश्वर" या दोन विधानातील सूक्ष्म फरक नीटपणे समजून घ्या. सत्यशोधनासाठी सतत पन्नास वर्षे अव्याहत व कठोर परिश्रमपूर्वक शोध केल्यावर मी या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचलो की सत्याप्रत पोहोचण्याचा सर्वात सरळ आणि सोपा मार्ग प्रेम होय. नंतर मला असेही आढळून आले की इंग्रजी भाषेत तरी प्रेम

या शब्दाचे अनेक अर्थ आहेत आणि वासनेच्या रूपाने उद्‌भवलेले मानवी प्रेम ही एक प्रकारे अधोगती असू शकते. मला असेही आढळून आले की या जगात अहिंसेच्या' अर्थाने प्रेमाला फारच कमी भक्त मिळू शकतात. परंतु सत्याच्या बाबतीत दोन अर्थ होऊच शकत नाहीत. आणि नास्तिकाला सुध्दा त्या शब्दाला अथवा सत्याच्या शक्तीला आक्षेप घेण्याची गरज भासली नाही. परंतु सत्याचा शोध घेण्याच्या ओढीमुळे नास्तिक ईश्वराचे अस्तित्वही नाकारण्यास कचरले नाहीत. त्यांच्या स्वतःच्या भूमिकेतून हे बरोबर असेलही, आणि या भूमिकेवरुन विचार करुनच मी ठरविले की ईश्वर म्हणजे सत्य असे म्हणण्यापेक्षा सत्य हेच ईश्वर, हे म्हणणेच अधिक श्रेयस्कर ठरेल. जे स्वतःला आनंदाने नास्तिक म्हणवीत असत, अशा चार्लस ब्रॅडलॉचे नाव मला आठवते, परंतु त्यांचे इतर विचारही मी जाणत असल्यामुळे, मी त्यांना नास्तिक समजत नाही. मी त्यांना ईशभीरू माणूस समजतो. पण ते हे मान्य करणार नाही. जर मी त्यांना म्हणालो, "मिस्टर ब्रॅडलॉ, तुम्ही सत्याला भिणारे व्यक्ती आहात, आणि म्हणून तुम्ही ईश्वराला भिणारे आहात", तर ते रागाने लाल होतील. पण जेव्हा मी म्हणेन की सत्य हेच ईश्वर आहे, तेव्हा मी आपोआपच त्यांच्या टीकेतून मुक्त होईन. अशाच तऱ्हेने मी कित्येक तरुण माणसांच्या टीकेतून मुक्त झालो आहे. आणखी एक मोठी अडचण लक्षात घ्या. कित्येक लक्षावधी लोकांनी देवाचे नाव घेऊन असंख्य अत्याचार केले आहेत. सत्याच्या नावाखाली शास्त्रज्ञांनी सुध्दा पुष्कळदा क्रूर कृत्ये केली नाहीत, असे नाही. मला हे सुध्दा माहीत आहे की सत्याच्या आणि विज्ञानाच्या नावावर प्रयोगादाखल अनेक वेळा अमानवीय क्रौर्य करून सतत प्राण्यांची चिरफाड करण्यात येते. तुम्ही ईश्वराचे वर्णन कसेही करा, त्या मार्गात अनेक अडचणी उद्‌भवतात. मानवी मनाला मर्यादा असतात, आणि जेव्हा तुम्ही मानवी आकलन शक्तीच्या पलीकडे असलेल्या त्या अस्मितेचा विचार करता तेव्हा तुम्हाला मनाच्या मर्यादेपुढे कैक प्रयास घडतात.

हिंदू तत्वज्ञानात तुम्हाला आणखी एक गोष्ट सापडते. ती म्हणजे फक्त ईश्वराचेच अस्तित्व आहे, इतर कुणाचेही अस्तित्वच नाही. आणि हेच सत्य इस्लाममध्ये कलमातून जोरदारपणे प्रतिपादन केले आहे आणि दृष्टान्त देऊन सांगितले आहे. त्यात स्पष्टपणे सांगितलेले आहे की फक्त ईश्वराचेच अस्तित्व खरे, इतर कशाचे अस्तित्वच नाही. खरे पाहू गेले असता संस्कृतात सत्य या शब्दाला अक्षरशः 'सत्' म्हणजे अस्तित्वात असणे हाच शब्द आहे. या एका आणि अशाच अनेक कारणांमुळे मी निष्कर्ष काढून या ईश्वराच्या व्याख्येपर्यंत येऊन पोहोचलो आहे की 'सत्य हेच ईश्वर'. त्यामुळे मला अत्यंत समाधान लाभले आहे. आणि ज्यावेळेस 'सत्य हेच ईश्वर' हा शोध घ्यावयाचा असतो तेव्हा एकमेव मार्ग असतो प्रेम; आणि प्रेम म्हणजे अहिंसा. आणि असा विश्वास आहे, की अंततः साधन आणि साध्य एकमेकांपासून वेगळे नाहीत म्हणूनही मी न कचरता म्हणू शकतो की ईश्वर म्हणजेच प्रेम.

मग सत्य म्हणजे काय ?

प्रश्न मोठा कठीण आहे. (गांधीजी म्हणाले), पण माझ्यापुरता मी तो अशा प्रकारे सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. की तुमचा अंतरात्मा सांगेल ते सत्य ! मग तुम्ही विचाराल, विविध लोकांची, विविध सत्ये परस्परविरोधी कशी असू शकतात ? येतात बरे, मानवी मन हे विविध माध्यमातून कार्यरत होत असते आणि मानवी मनाची वाढ व विकास प्रत्येक माणसागणिक वेगवेगळी असतो, म्हणून असे म्हणता येईल की एका माणसाला जे सत्य वाटते, ते दुसरा असत्य समजतो, म्हणून याबाबत ज्या लोकांनी प्रयोग केले आहेत, ते या निर्णयाप्रत येऊन पोहचले आहेत की या प्रयोगासाठी काही निश्चित अटी पाळल्याच पाहिजेत. ज्याप्रमाणे शास्त्रीय प्रयोग करण्यासाठी काही अनिवार्य शास्त्रीय अभ्यासक्रमातून पार पडणे आवश्यक ठरते कारण तेव्हाच प्रयोग करण्याची पात्रता येते, त्याचप्रमाणे आध्यात्मिक क्षेत्रातही प्रयोग करण्याची क्षमता येण्यासाठी काटेकोरपणे कडक नियमपालन शिस्तीने करणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आंतरिक आवाजाबाबत बोलण्याच्या आधी स्वतःच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. याकरिता आमच्या येथे अनुभवावर आधारित अशी श्रध्दा आहे की ज्यांना कुणाला वैयक्तिक रुपाने सत्याचा ईश्वररुपात शोध घ्यावयाचा असेल त्याला काही व्रतांचे पालन करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, सत्यपालन, ब्रह्मचर्य, अहिंसा, अपरिग्रह आदि व्रते स्वीकारली पाहिजेत. कारण तुमचे सत्यावर म्हणजेच ईश्वरावर प्रेम असेल तर तुम्ही इतर कशावरही प्रेम करु शकत नाही. जसे अहिंसेचे व्रत, ऐच्छिक दारिद्र्याचे व अपरिग्रहाचे व्रत; जोपर्यंत ही व्रते आपण आपल्या आचरणात आणत नाही, तोपर्यंत या प्रयोगांचा प्रारंभ मुळीच करु नये. याशिवाय इतरही पुष्कळसे नियम व अटी सांगितल्या आहेत, पण त्या साऱ्या पुन्हा सांगण्याची मला गरज वाटत नाही. तुम्हाला एवढे सांगणे पुरेसे आहे की ज्यांनी हे प्रयोग केलेले आहेत, त्यांना हे माहीत आहे की, प्रत्येकजण असे म्हणत असेल की माझ्या अंतरात्म्याचा आवाज ऐकू येत आहे, तर ते योग्य नाही. याचे कारण असे की आजच्या काळात प्रत्येक जण कुठलीही साधना न करता आतल्या आवाजाचा दावा करीत आहे आणि त्यामुळे संभ्रभात पडलेल्या आजच्या जगात रोज कितीतरी असत्य गोळा होत आहे. म्हणून मी अत्यंत नम्रपणे तुम्हाला सांगू इच्छितो की ज्याने अत्यंत निरहंकारी वृत्ती व नम्रता अंगी बाणवली असेल त्यालाच सत्याचा शोध घेणे शक्य होऊ शकेल, इतर कुणालाही नव्हे. जर तुम्हाला सत्याच्या सागरात तळापर्यंत जायचे असेल, तर तुम्हाला शून्यवत् व्हावे लागेल. या अत्यंत आकर्षक अशा मार्गाविषयी यापेक्षा जास्त काही मी सांगू शकत नाही.

यंग इंडिया, 31 डिसेंबर 1931

25

मंदिरात श्रध्देने जा

(त्रावणकोरच्या अस्पृश्य-मंदिर-प्रवेशाच्या जाहीरनाम्यानिमित्त झालेल्या सोहळ्यात त्रिवेंद्रम येथे भाषण करीत असताना गांधी म्हणाले :)

बालवयात, माझ्या आईवडिलांनी मला प्रेरित केल्यामुळे मी अत्यंत श्रध्देने आणि भक्तिभावाने मंदिरात जात असे. परंतु गेल्या काही वर्षापासून मी देवळात जात नाही. आणि जेव्हापासून मी अस्पृश्यता निर्मूलन चळवळीचे काम हाती आहे घेतले तेव्हापासून ज्या मंदिरात अस्पृश्याला प्रवेश बंद आहे त्या मंदिरात जाण्याचे मी टाळले आहे. त्यामुळे आज जेव्हा मी सकाळी मंदिरात गेलो तेव्हा मला तेच नावीन्य दिसून आले, जे शेकडो अवर्ण हिंदुंना या जाहीरनाम्यानंतर मंदिर प्रवेश मिळाल्यामुळे दिसले असेल. कल्पनेच्या भराऱ्या मारीत माझे मन हजारो वर्षापूर्वीच्या प्राचीन काळाकडे वळले, जेव्हा त्या मंदिरांद्वारे ईश्वराचा संदेश दगडांतून व धातूतून भक्तापर्यन्त पोहचविला जाण्याचा आरंभ झाला होता. मला हे स्पष्टपणे दिसत होते की तेथील प्रतिमांचे वर्णन करणारा पुजारी आपल्या खास हिंदी भाषेत मला हे ध्वनित करत नव्हता की तेथील प्रत्येक प्रतिमा देवाची होती. परंतु हे विशिष्ट भाष्य न करताही त्याने मला हे जाणवून दिले, की ही मंदिरे म्हणजे त्या अदृश्य, अव्यक्त व अवर्णनीय ईश्वराच्या आणि अथांग, अनंत सागरातील अगदी असंख्य सूक्ष्म बिंदूप्रमाणे असणाऱ्या आपल्यामधील एक सेतू आहेत. आपण सारे मानवी प्राणी काही तत्ववेत्ते नसतो. आपण या मातीतून निर्माण झालेले पार्थिव जीव असतो आणि आपण अदृश्य ईश्वराची कल्पना करून समाधान मानू शकत नाही. आपल्याला अशा एका मूर्त स्वरूपाची आवश्यकता भासते, ज्याला आपण स्पर्श करू शकू, जे आपण पाहू शकू आणि ज्यापुढे आपण श्रध्दापूर्वक भक्तिभावाने नतमस्तक होऊ शकू. मग ते

एखादे पुस्तक असो, वा एखादी दगडी मोकळी इमारत असो किंवा अनेक प्रतिमांनी सजविलेली दगडाची इमारत असो. काहींना पुस्तक समाधान देईल, काहींना मोकळी वास्तू दिलासा देऊ शकेल, तर इतर काहींना रिकाम्या वास्तूत कुणी वास करीत असलेले पाहिल्याशिवाय समाधान वाटणार नाही, म्हणून मी सांगू इच्छितो की, या मंदिरांकडे हे केवळ जणू अंधश्रध्देचे प्रतिनिधी आहेत या दृष्टिकोनातून बघू नका. जर या मंदिरांमध्ये तुम्ही मोठ्या श्रध्देने प्रवेश कराल, तर तुम्हाला आढळून येईल की दर भेटीत तुम्ही अधिक शुचिर्भूत होऊन परताल आणि प्रत्यक्ष परमेश्वरावरची तुमची श्रध्दा अधिकाधिक दृढ होत जाईल.

हरिजन, 23 जानेवारी 1937

26

गीतेचा अर्थ

(एका मित्राने पुढील प्रश्न केला:)

गीतेची शिकवण हिंसा आहे की अहिंसा आहे, हा वादग्रस्त प्रश्न पुष्कळ काळपर्यंत घोळत राहील असे दिसते. गीतेतून आपण काय अर्थ वाचतो, किंवा वाचून अर्थ काढावयाचा ही एक गोष्ट आहे आणि गीतेबद्दल पूर्वग्रहदूषित न होता ती वाचल्याने त्यातून कुठला अर्थलाभ होतो हे निराळेच आहे. त्यामुळे ज्या माणसाने अहिंसा हे आपल्या जीवनाचे अगदी स्पष्टपणे शाश्वत मूल्य मानलेले आहे, त्याला हा प्रश्न इतका अवघड वाटत नाही. तो म्हणेल, गीतेतून अहिंसेचा संदेश मिळत असेल तरच मी गीतेचा स्वीकार करीन. त्याच्यासाठी गीतेसारखा थोर महान ग्रंथ, शाश्वत धार्मिक मूल्य असलेले अहिंसेचे तत्वच मनात ठसवितो. जर त्यातून हा भाव निर्माण होत नसेल तर, त्याच्याकरिता गीता अचूक मार्गदर्शक रहाणार नाही. तो गीतेला आदरणीय ग्रंथ मानेल, पण प्रमाणभूत ग्रंथ मानणार नाही.

पहिल्या अध्यायात आपल्याला अर्जुन अहिंसेच्या तत्वाने भारलेला असून शस्त्रास्त्रे खाली टाकताना दिसतो. तो कौरवांच्या हातून मरण पत्करावयास तयार झालेला आहे. त्याच्या मनासमोर विनाशकारी महान संकट व हिंसा आणि पापाचाराचे चित्र उभे राहते आणि हिंसेचा वीट येऊन विषादाने व भीतीने त्याचा थरकाप होतो. तो म्हणतो, "आपण केवढे महत् पाप करीत आहोत."

त्याची ही मन:स्थिती पाहून कृष्ण अर्जुनाला म्हणतो, "आता हे महान तत्वज्ञान तू पुरे कर. कुणी कुणाला मारत नाही आणि कुणीही मरत नाही. आत्मा अमर आहे आणि शरीर नाशवंत आहे. म्हणून तू आता लढाईला सुरूवात कर. ही लढाई तुला

कर्तव्य भावनेने करावयाची आहे. यश वा अपशय याचा विचार तुला करावयाचा नाही. तुझ्यासमोर जे कर्तव्य आहे, ते तू पार पाड."

अकराव्या अध्यायात परमेश्वर त्याला विश्वरूपाचे विलोभनीय दर्शन घडविताना म्हणतात, "मी काळ आहे, जगाचा संहारकर्ता आहे. प्राचीनहून प्राचीन आहे. मी येथे माझ्या सृष्टीच्या संहाराच्या कामाला लागलो आहे. जे माझ्या हातून मृत्यु पावले आहेत, त्यांना तू पुन्हा मार, त्याबद्दल शोक करीत बसू नकोस."

ईश्वरासमोर हिंसा आणि अहिंसा समान आहेत. परंतु माणसासाठी ईश्वराचा कोणता संदेश आहे ? तो असा की, युध्द कर. कारण या रणक्षेत्रात तू आपल्या शत्रूचा नक्कीच पराभव करणार आहेस. जर गीता अहिंसा शिकविते असे मानले तर पहिल्या आणि अकराव्या अध्यायातील मजूकर इतर मजकुराशी जुळत नाही, कमीत कमी तो अहिंसेच्या तत्वज्ञानाला पोषक नाहीच. म्हणून तुम्ही माझी ही शंका दूर करण्यासाठी थोडा वेळ द्यावा.

हा प्रश्न अनादिकालापासून विचारला जात आहे आणि ज्याने गीतेचा अभ्यास केला आहे, त्याला स्वतःलाच हे उत्तर शोधून काढावयाचे आहे. मी तुम्हाला उत्तर सांगणार असलो तरी मला हे माहीत आहे की प्रत्येकजण शेवटी आपल्या बुध्दीवर विश्वास ठेवीत नाही तर हृदय सांगेल तसेच वागतो. हृदय प्रथम निष्कर्ष स्वीकारते आणि मग बुध्दी त्याचे उत्तर तर्काने शोधते. निश्चित मत आधी बनते आणि मग त्यासाठी युक्तिवाद सुचतो. मनुष्य जे करतो किंवा त्याला जे करावेसे वाटते, त्याच्यासाठी आधारभूत असलेली कारणे तो नेहमी शोधीत असतो.

त्यामुळे ज्यांना माझे गीतेचे विवेचन मान्य होणार नाही त्यांची भूमिका मी समजून घेऊ शकतो. मला एवढेच करावयाचे आहे की मी माझ्या अर्थाप्रत कसा पोहोचलो आणि निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी मी भाष्याच्या कोणत्या नियमांचा स्वीकार केला हे तुम्हाला सांगावयाचे आहे. माझी लढाई फक्त अर्थापुरती सीमित आहे, मग मी जिंकतो की हरतो याला महत्व नाही.

1889 साली जेव्हा, मी जवळपास वीस वर्षाचा होतो, तेव्हा माझा गीतेशी पहिला परिचय झाला. त्यावेळेस मला अहिंसेच्या तत्वाची खास काही कल्पना नव्हती. गुजराथी कवी श्यामल भट यांच्या एका ओळीने मला एक तत्व शिकविले की प्रेमाने शत्रूलाही जिंकता येते आणि ती शिकवण माझ्या मनात खोल रुजली. परंतु त्यापासून मी अहिंसेचे शाश्वत तत्वज्ञान काढले नाही. कारण उदाहरणार्थ, ते साऱ्या प्राणीमात्राला सामावून घेणारे नव्हते. यापूर्वी हिंदुस्थानात असताना मी मांसाची चव घेतली होती. मला असे वाटत असे की सापासारख्या विषारी प्राण्याला मारणे, हे माझे कर्तव्यच आहे. परंतु आज माझे ठाम मत झाले आहे की, ज्याला अहिंसेच्या तत्वाचे पालन करावयाचे असेल त्याने सापासारख्या विषारी प्राण्याला सुध्दा ठार मारू नये. त्याकाळी मला असे वाटत होते की

ब्रिटिशांशी लढाई करण्यासाठी आपल्याला सुसज्ज व्हावे लागेल. मी नेहमी एका प्रसिध्द गुजराथी कवीची कविता म्हणत असे, "ब्रिटिश आपल्यावर राज्य करतात, त्यात नवल ते कोणते" इ.इ. माझे मांस खाणे ही ब्रिटिशांशी लढण्यासाठी पात्र होण्याच्या तयारीची पहिली पायरी होती. मी जेव्हा इंग्लडला जाण्यासाठी निघालो तेव्हा माझ्या मनाची ठेवण ही अशी होती. परंतु तेथे गेल्यावर मात्र मी मांसाला स्पर्शही केला नाही. कारण मी माझ्या आईला जे वचन दिले होते, ते मी मरेपर्यंत पाळण्याचा पक्का निर्धार केला होता. माझ्या सत्यावरील प्रेमाने मला कित्येक वेळा आपत्तीतून वाचविले आहे.

मी इंग्लडमध्ये आल्यावर माझ्या दोन इंग्लिश मित्रांच्या परिचयामुळे मला गीता वाचावी लागली. मी असे म्हणतो, कारण गीता वाचण्याची माझी स्वतःची इच्छा नव्हती. त्यांच्या म्हणण्यावरून मी ती वाचली. परंतु जेव्हा त्या दोन मित्रांनी आमच्याबरोबर तू गीता वाच असे म्हटले, तेव्हा मला माझ्या अज्ञानाची लाज वाटली. मला आपल्या धर्म-शास्त्र ग्रंथांबाबतचे काहीच ज्ञान नाही या जाणीवेने मी दुःखी झालो. मला वाटते याच्या मुळाशी माझा स्वाभिमान असावा. माझे संस्कृतचे ज्ञान एवढे पुरेसे नव्हते की ज्याच्या बळावर मी कुणाच्या मदतीशिवाय गीतेच्या सर्व श्लोकांचा अर्थ लावू शकेन. माझे मित्र अर्थातच संस्कृतबद्दल अगदी अनभिज्ञ होते. सर एडविन अर्नोल्ड यांनी केलेला गीतेचा उत्कृष्ट इंग्रजी अनुवाद त्यांनी माझ्यासमोर आणून ठेवला. मी ते सारे आतुरतेने अथपासून इतिपर्यन्त वाचून काढले व मंत्रमुग्ध झालो. दुसऱ्या अध्यायातील शेवटचे एकोणवीस श्लोक माझ्या हृदयावर कायमचे कोरले गेले आहेत. माझ्या मते त्यात सर्व ज्ञान सामावलेले आहे. त्यात शिकविलेली सत्ये शाश्वत आहेत. त्यामध्ये तर्क असला तरी तो अनुभूतीतून आलेल्या ज्ञानाचा द्योतक आहे.

त्यानंतर मी गीतेची अनेक भाषांतरे व भाष्ये वाचलीत, त्याबद्दल वादविवाद आणि मनाचे समाधान होईपर्यंत युक्तिवाद केले, ऐकले. परंतु पहिल्याप्रथम गीता वाचनाने माझ्या मनावर जो ठसा पडला तो कधीही पुसला गेला नाही. गीतेचा अर्थ समजून घेण्यासाठी ते श्लोक खऱ्या अर्थाने महत्वपूर्ण अशी गुरूकिल्ली आहेत. मी तर असाही सल्ला देईन की, जे श्लोक या अध्यायाशी विसंगत वाटत असतील ते सोडून दिले तरी चालेल. पण नम्र अभ्यासकाने काहीही त्यागू नये. तो सहजपणे म्हणेल, "मला तर या माझ्या बुध्दीच्या मर्यादा वाटतात की मला या विसंगतीचे निराकरण करता येत नाही. कदाचित कालांतराने मी हे काम करू शकेन". अशातऱ्हेने तो स्वतःसमोर व इतरांसमोर आपली भूमिका मांडेल.

धर्मशास्त्र ग्रंथांचा योग्यरीत्या अर्थ लावण्यासाठी त्यांचा भक्तिभावाने अभ्यास करणे व अनुभव घेणे अत्यंत आवश्यक असते. शूद्राने वेदांचे वाचन करू नये, हा निर्बंध पूर्णतः निरर्थक नव्हता. याठिकाणी शूद्राचा अर्थ आध्यात्मिक दृष्टया असंस्कृत व अज्ञानी माणूस असा होतो. त्यामुळेच त्याच्याकडून वेदांचा व इतर धर्मग्रंथांचा चुकीचा अर्थ

लावणे संभवनीय होते. प्रत्येकजण बीजगणिताची प्रमेये सोडवू शकत नाही. त्यासाठी काही प्रारंभिक अभ्यास आवश्यक असतो. पापी माणसाच्या तोंडी "मी ब्रह्म आहे" (अहं ब्रह्मोऽस्मि), हे भव्य वचन किती वाईट दिसेल याची कल्पना करा. तो किती नीच हेतूने त्याचा उपयोग करू शकेल. त्याच्या हातून किती अर्थाचा अनर्थ होऊ शकेल, याची कल्पना करा.

म्हणून जो कोणी वेदांचा व शास्त्रांचा अर्थ लावणार असेल त्याला स्वतःला आध्यात्मिक संस्कार असलेच पाहिजेत. त्याने यमनियम आचरणात आणलेच पाहिजेत. कारण तेच आचरणाचे शाश्वत मार्गदर्शक आहेत. त्याबाबतीत वरवरचे आचरण निरुपयोगी ठरते. शास्त्रांमध्ये नेहमी गुरूची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. परंतु आजकालच्या काळात गुरू दुर्मिळ व दुर्लभ असल्यामुळे सूज्ञ लोकांनी भक्तिप्रधान प्राकृत ग्रंथांचे पठण करण्याची सूचना केली आहे. ज्यांना भक्तिभाव व श्रध्दा माहीत नाही, असे लोक धार्मिक शास्त्रांचा अर्थ लावण्यासाठी अपात्र असतात. विद्वान त्यापासून विस्तारपूर्वक, विव्दत्तापूर्ण अर्थ भले काढतील, पण तो खरा शास्त्रार्थ नव्हे, धर्मशास्त्राचा खरा अर्थ केवळ अनुभवी लोकच नीट सांगू शकतील.

परंतु अननुभवी लोकांसाठी सुध्दा काही नियम ठरवून दिलेले आहेत. जे सत्याच्या विरोधी असेल, ते भाष्य खरे नव्हे. ज्यांना सत्याबद्दलसुध्दा शंकाकुशंका वाटतात त्यांच्या बाबतीत शास्त्राला काहीच अर्थ उरत नाही. त्यांचे समाधान कुणीही करू शकत नाही. धर्मशास्त्रांमधून ज्या माणसाला अहिंसेचे दर्शन होत नाही, त्याचे मत धोक्याचे ठरते. तो संकटात सापडतो, पण त्याचा उध्दार होऊ शकतच नाही, असे नाही. सत्य हे 'सत' म्हणजे भावरूप आहे आणि अहिंसा ही अभावरूप आहे. आणि तरीही अहिंसा ही परमोधर्म-सर्वोच्च धर्म मानली जाते. सत्य हे स्वयंसिध्द असून अहिंसा ही त्याचे परिपक्व फळ आहे. ती सत्यात निहित असते परंतु ती स्पष्टपणे नजरेस येत नसल्यामुळे माणसाने धर्मशास्त्रांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. शास्त्रे मान्य केलीच पहिजेत असे नव्हे. परंतु जेव्हा तो सत्याचा स्वीकार करतो, तेव्हा तेच त्याला अहिंसेकडे घेऊन जाते.

सत्याची अनुभूती घेण्यासाठी तपश्चर्या करणे आवश्यक असते. ज्या तपस्व्याला सत्याचा साक्षात्कार झाला, त्याला सभोवतालच्या हिंसेतूनच अहिंसेचे तत्वज्ञान सापडले. तो म्हणतो – "हिंसा ही मिथ्या आहे. आणि अहिंसा हेच सत्य आहे. अहिंसेशिवाय सत्याचा साक्षात्कार कदापि संभवनीय नाही. ब्रम्हचर्य, अस्तेय व अपरिग्रह ही अहिंसा प्राप्तीची साधने आहेत. अहिंसा ही सत्याचा आत्मा आहे. मनुष्यप्राणी तिच्याशिवाय केवळ पशुवत असतो. सत्याच्या शोधकाला सत्याचा शोध घेत असताना हे सारे जाणवू लागते आणि मग त्याला धर्मशास्त्रांचा खरा अर्थ लावण्यास कसलीही अडचण भासत नाही.

शास्त्राचा अर्थ लावताना आणखी एक नियम असा आहे की, प्रत्येक शब्दाच्या अर्थाला चिकटून बसू नये, त्यामागील भावना तपासणे आवश्यक आहे. तुलसीदासाचे

रामायण हे एक अद्वितीय पुस्तक ठरते कारण ते पावित्र्य, दया, भक्ती या भावनांनी परिपूर्ण आहे. त्यामध्ये एक चरण आहे, त्यात म्हटले आहे की ढोलक, शूद्र, मूर्ख पशु व स्त्री हे ताडनासाठी पात्र असतात. जो पुरूष या कडव्याचा आधार घेऊन आपल्या पत्नीला मारझोड करीत असेल, तो अधोगतीला जाईल. प्रभू रामाने आपल्या पत्नीला कधीही मारले नाही एवढेच नव्हे तर त्याने तिला कधीही दुखावले नाही. तुलसीदासाने बहुधा त्यावेळी प्रचलित असलेला वाकप्रचार आपल्या काव्यात घुसडला असेल, परंतु त्याला स्वप्नातही वाटले नसेल की कोणी नालायक माणूस या चरणाचा आधार घेऊन आपल्या बायकोला पशुवत् वागवण्याचे आणि मारहाण करण्याचे समर्थन करील. समजा त्याकाळी प्रचलित असेल म्हणून तुलसीदासानेही आपल्या बायकोला मारले असेल, पण म्हणून काय झाले ? मारणे हे केव्हाही वाईटच. जे नवरे आपल्या बायकांना मारहाण करीत असतील त्यांचे समर्थन करण्यासाठी काही रामायण लिहिले नव्हते. ते फक्त राम एक आदर्श व पूर्ण पुरूष कसा होता, सीता आदर्श पत्नी कशी होती आणि भरत एक आदर्श भक्तिपरायण बंधू कसा होता, हे दाखवण्यासाठी लिहिले गेले होते. म्हणून त्यात योगायोगाने आलेले भ्रष्ट व दोषयुक्त चालीरीतींचे समर्थन आपण त्याज्य मानले पाहिजे. तुलसीदासाने हे अनमोल काव्य काही भूगोल शिकविण्यासाठी लिहिलेले नव्हते. म्हणून भूगोलविषयक चुकीची माहिती त्यात आढळल्यास आपण ती ताबडतोब नाकारली पाहिजे.

या विचारांच्या पार्श्वभूमीवर आपण गीतेचे अवलोकन केले पाहिजे. आत्मज्ञान व त्याच्या प्राप्तीची साधने हा गीतेचा मूळ विषय आहे. दोन सैन्यांमधील युध्द हा केवळ तो विषय समजावून सांगण्याचे निमित्तमात्र आहे. जर तुम्हाला तसे वाटत असेल तर, फारतर तुम्ही म्हणू शकता की कवी स्वतः युध्द व हिंसेच्या विरूध्द नव्हता म्हणून त्याने युध्दाच्या प्रसंगाचा वापर करून घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. परंतु महाभारताच्या वाचनानंतर माझ्यावर एक वेगळीच छाप पडली. कवी व्यासांनी आपल्या या अतिसुंदर महाकाव्यातून युध्दाची विफलता फारच परिणामकारकरीत्या दाखवून दिली आहे. कौरव पराभूत झाले तर काय झाले ? आणि पांडव जिंकले म्हणून काय झाले, असे ते विचारतात. जे जिंकले, त्यांच्यापैकी कितीजण वाचले आणि त्यांचे नशिबी काय आले ? कुंतीमातेची शेवटी काय दशा झाली ? आणि आज यादव कुल कुठे आहे ? जेव्हा या महाभारताच्या महाकाव्याचा विषय व आशय हा हिंसेच्या लढायांचे वर्णन व त्याचे समर्थन हा नव्हेच, तर मग त्यावर भर देणे चुकीचे ठरते. जर त्यातील काही श्लोकांचा अहिंसेच्या शिकवणुकीशी मेळ बसत नसेल तर, मग संपूर्ण गीतेला हिंसेच्या चौकटीत बसविणे अधिकच अवघड मानावे लागेल.

जेव्हा कवी लेखन करीत असतो, तेव्हा त्याला ही जाणीव नसते की त्याच्या लेखनाचे वेगवेगळे अर्थ निघू शकतात. काव्याचे सौंदर्य असे असते की ती काव्यानिर्मिती कविपेक्षाही श्रेष्ठ ठरते. कवी आपल्या कल्पनेच्या दुनियेत भराऱ्या मारीत

असतांना ज्या सत्याप्रत पोहोचतो, ते अनेकदा त्याच्या आयुष्यात आढळून येत नाही. म्हणून पुष्कळ कवींचे जीवन, त्यांच्या काव्यानिर्मितीच्या समोर विसंगत वाटते. गीतेच्या शिकवणुकीची मध्यवर्ती कल्पना हिंसा नसून अहिंसा आहे हे स्पष्टपणे गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभी आणि अठराव्या अध्यायाच्या परिसमाप्तीत दाखवून दिलेले आहे. इतर अध्यायांमध्ये सुध्दा याच निष्कर्षाला आधार मिळतो. आसक्ती आणि मत्सर यांच्या शिवाय हिंसाही संभवनीय नसते. आणि गीता तर आपल्याला सत्व, रजस्, तमस् यांच्या पलिकडे जाऊन क्रोधरहित, द्वेषरहित अनासक्त जीवन जगण्याला शिकविते. परंतु आजही माझ्या मनात जी अर्जुनाची मूर्ती उभी राहते, ती दरवेळी धनुष्याची दोरी आपल्या कानापर्यंत खेचणाऱ्या क्रोधित, लाल डोळे असलेल्या अर्जुनाची असते.

अर्जुनाने अहिंसेच्या भावनेतून लढाईत उभे राहण्याचे नाकारले असे नव्हते. त्याने त्यापूर्वी कितीतरी युध्दे केली होती. फक्त यावेळेस तो खोट्या मायेच्या मोहात पडला होता. आपल्याच नातलगांना व स्वकीयांना मारण्यास तो तयार नव्हता. अर्जुनाने मारण्याबद्दलच्या प्रश्नाची कधी चर्चाच केली नाही. कुणालाही व तो कितीही दुष्ट असला तरी मी त्याला मारणार नाही, असे अर्जुनाने म्हटलेच नव्हते. श्रीकृष्ण प्रत्येकाच्या अंतरातले विचार जाणत होते. त्यामुळे अर्जुनाच्या मनात उद्‌भवलेला क्षणिक मोहही त्यांना जाणवला. म्हणून ते अर्जुनाला म्हणाले, तुझ्या हातून कितीतरी हत्या तर झाल्याच आहेत, आता तू स्वतःला एकाएकी अहिंसक म्हणवून घेऊ शकणार नाहीस. ज्याचा प्रारंभ केला आहेस, ते पूर्ण कर. एखादा प्रवासी स्कॉच एक्सप्रेसने जाताना एकाएकी प्रवासाचा कंटाळा आला, म्हणून गाडीतून उडी मारू लागला तर, तो आत्महत्येचा गुन्हा ठरेल. रेल्वेने प्रवास करण्याची निरर्थकता काही त्याला जाणवली नव्हती. तीच अवस्था अर्जुनाची झाली होती. अहिंसक श्रीकृष्ण अर्जुनाला आणखी दुसरा कोणता उपदेश देऊ शकेल ? परंतु एका विशिष्ट वेळी युध्दाचा सल्ला दिला होता, म्हणून गीता हिंसा शिकविते किंवा युध्दाचे समर्थन करते असे म्हणणे हे तितकेच चुकीचे ठरते, जेव्हा आपण म्हणतो की हिंसा ही काही वेळा दैनंदिन जीवनाच्या वहिवाटीचा भाग असते म्हणून ती आपल्या जीवनाचा नियम आहे. जे गीतेचा भाव जाणून वाचन करतात, त्यांना गीता अहिंसेचे रहस्य सांगते. देहाच्या माध्यमातून आत्म्याच्या अंतःर्ज्ञानाचे रहस्य शिकविते.

आणि धृतराष्ट्र, युधिष्ठिर, अर्जुन तरी कोण होते ? कृष्ण कोण होता ? ती सारी इतिहासातील पात्रे होती का ? आणि गीताही त्यांचे वर्णन ऐतिहासिक पात्रे असेच करते काय ? रणांगणावर युध्द करीत असताना अर्जुनाने एकाएकी लढाई करण्याचे थांबविले व कृष्णाला प्रश्न विचारले म्हणून कृष्णाने संपूर्ण गीता त्याला सांगितली, हे खरे आहे काय ? मग ती गीता कोणती ? जी अर्जुन असे म्हणून विसरून गेला की मी खरोखरच आता मोहातून मुक्त झालो आहे आणि कृष्णाला पुन्हा विनंती केली की "तू पुन्हा गा", पण कृष्णा पुन्हा सांगू शकला नाही. तीच पुढे कृष्णमुखाने 'अनुगीता' या रूपात आली आहे.

मला वाटते दुर्योधन आणि त्याचा पक्ष ह्या मानवी जीवनातील हीन प्रवृत्ती असून अर्जुन आणि त्याचा पक्ष ह्या उच्च दर्जाच्या वृत्ती असाव्यात आणि रणक्षेत्र म्हणजे आपले शरीर. आपल्या मनात या उच्च-नीच द्वंद्वाची लढाई सदैव चालू असते. म्हणूनच द्रष्ट्या कवीने हे वर्णन हुबेहूब केलेले आहे. कृष्ण म्हणजे अंतर्यामी, शुध्द चित्तात सदैव गुंजारव करणारा. घडयाळाप्रमाणे आपल्या हृदयालाही शुचितेची किल्ली द्यावी लागते, अन्यथा अंतर्यामीचा आवाज बंद होतो.

प्रत्यक्ष लढाईचा विचारच करू नये नाही असे नाही. जे अहिंसेविषयी अज्ञानी आहेत, त्यांना गीता भ्याडपणाचे पाठ देत नाही. जो भित्रा असतो, कातडी बचावून राहतो, जो वासनेच्या आहारी जातो, त्याला प्रत्यक्ष लढावेच लागते. मग त्याची इच्छा असो वा नसो, पण तो काही त्याचा धर्म नसतो. धर्म हा एक व एकमेव असतो. अहिंसा म्हणजे मोक्ष आणि मोक्ष म्हणजे सत्याचा साक्षात्कार. येथे भित्रेपणाला थारा नसतो. या विचित्र दुनियेत हिंसा ही सदैव चालू राहणारच. गीता त्यातून मार्ग काढावयास शिकविते. पण ही गीता हेही शिकविते की भित्रेपणाने पलायन करणे किंवा निराश होणे हा मार्ग नाही. भित्रेपणापेक्षा मारणे किंवा रणक्षेत्रात मरणे श्रेष्ठ होय.

जर त्या पत्रकाराने उद्धृत केलेल्या श्लोकांचा अर्थ अजूनही स्पष्ट झाला नसेल, तर मग मला आपली अक्षमता मान्य करावी लागेल. यावर आता एकमत झाले आहे नां की सर्व शक्तिमान ईश्वर हा जगाचा निर्माता, नियंता, संरक्षक आणि संहारक आहे आणि तो तसाच असला पाहिजे ? आणि जर तो सृष्टी निर्माण करितो तर निश्चितच तिचा संहार करण्याचा अधिकारही त्याचाच असला पाहिजे आणि तरीही तो विनाश करीत नाही कारण तो निर्माणही करीत नाही. त्याचा नियम असा आहे की जे जन्मते, ते मृत्यू पावते आणि त्यातच त्याची कृपा निहित आहे. त्याचे नियम अपरिवर्तनीय आहेत. जर त्याने आपले नियम आपल्या लहरीनुसार फिरविले तर आपली काय गती होईल ?

यंग इंडिया, 12 नोव्हेंबर 1925

27

कृष्णजन्माष्टमी

(म्हैसूर राज्यातील अर्सिकेरे या गावी गांधीजींनी दिलेल्या भाषणाचा गोषवारा:)

श्रीकृष्णाच्या जीवनचरित्राचा आपणासाठी काय बोध आहे हे आपणास माहीत नसते. आपण गीता वाचत नाही आणि आपल्या मुलांना ती शिकविण्याचा प्रयत्नही करीत नाही. गीता हे एक असे अलौकिक पुस्तक आहे की ते प्रत्येक धर्माच्या, वयाच्या व प्रत्येक प्रदेशातल्या माणसाने आदरपूर्वक वाचले पाहिजे आणि आपापल्या धर्माच्या सिध्दांतांचा त्यात शोध घेतला पाहिजे. जर आपण दर कृष्णाष्टमीला कृष्णाचे स्मरण करून गीतेचे पठण केले असते आणि त्यातील शिकवणीनुसार वागण्याचा निर्धार केला असता तर आपण आज आहोत त्या शोचनीय अवस्थेत राहिलो नसतो. श्रीकृष्णाने जन्मभर जनतेची सेवा केली, तो लोकांचा खराखुरा सेवक होता. जर त्याने मनात आणले असते तर त्याला कुरूक्षेत्राचा सेनापती होता आले असते, परंतु त्याने अर्जुनाचे सारथ्य पत्करले. त्याचे संपूर्ण आयुष्य म्हणजे अखंड कर्मगीता होती. त्याने दुराभिमानी दुर्योधनाचे मिष्टान्न नाकारले आणि गरीब विदुराच्या घरच्या कण्या आनंदाने खाल्या. बालपणी तो गुराखी होता म्हणून आपण आजही त्याला "गोपाल" म्हणून ओळखतो. परंतु आपण गोपाळाच्या भक्तांनी, आज गाईकडे दुर्लक्ष केले आहे. आदि कर्नाटकी लोक गाईची हत्या करून गोमांस खातात, त्यामुळे मुलाबाळांना व अपंगाना दुधापासून वंचित राहावे लागते. कृष्णाला झोप व आळस माहीतच नव्हता. तो जगावर, सदैव जागरूक पहारा करी. परंतु आपण त्यांचे वंशज असूनही अत्यंत आळशी झालो आहोत व हातांचा उपयोग करण्याचेही विसरून गेलो आहोत. भगवद्गीतेत भगवान कृष्णाने भक्तीचा म्हणजेच कर्माचा मार्ग दाखविला आहे. लोकमान्य टिळकांनी सांगितले आहे की आपण भक्त बनू

इच्छितो अथवा ज्ञानी; दोहोंचा कर्म हा एकच मार्ग आहे, परंतु हे कर्म स्वार्थासाठी नव्हे तर दुसऱ्याच्या कल्याणासाठी असावे. स्वतःकारिता काम करीत राहण्याने आपण बंधनांत पडतो परंतु दुसऱ्यासाठी कार्यरत राहिलो तर बंधनातून मुक्ती मिळते. असे कोणते निःस्वार्थी सेवाकार्य आहे की जे हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन; मुले, स्त्रिया, पुरूष या साऱ्यांना सर्वत्र करता येईल ? मी प्रयत्नपूर्वक आपल्याला दाखवून दिले आहे की सूत कांतणे ही अशी एकच त्यागाची क्रिया आहे की जी आपल्याला देवाच्या नावाने, गरिबांसाठी सदैव करता येईल आणि त्यायोगे आपण आपल्यातील आळस झटकून कामाला प्रारंभ करू शकू. भगवान कृष्णाने आपल्याला हेही शिकविले आहे की आपण जर त्याचे खरे भक्त असू तर आपण ब्राह्मण व सफाई कामगार असा भेदभाव करणार नाही. हे जर खरे असेल तर हिंदू धर्मात अस्पृश्यतेला थारा राहणार नाही आणि अजूनही तुमच्या मनात अस्पृश्यतेच्या अंधविश्वासाचे ओझे चिकटून असेल तर मग आज या कृष्णजन्माच्या पवित्रदिनी ते झटकून टाका. जो म्हणतो गीतेवर माझी निष्ठा आहे, त्याला हिंदू-मुसलमान असा भेदाभेद जाणवत नाही. कारण भगवान कृष्णाने जाहीर केले होते की जो कुणी खऱ्या भक्तिभावाने ईश्वराची उपासना करील, मग तो कोणत्याही नावाने करो, तो माझीच उपासना करील. गीतेतील भक्ती, कर्म आणि प्रेमाच्या मार्गावर खरी श्रध्दा ठेविली तर एक माणूस, दुसऱ्या माणसाचा तिरस्कार करूच शकणार नाही.

यंग इंडिया, 1 सप्टेंबर 1927



28

गीतेचा संदेश

1. १८८८-८९ साली माझा गीतेशी प्रथम परिचय झाला तेव्हाच माझ्या ध्यानी आले की गीता हा काही ऐतिहासिक ग्रंथ नाही. त्यात भौतिक लढाईच्या प्रसंगाचा दृष्टांत देऊन केवळ माणसाच्या मनांत सदैव चालणाऱ्या अंतःर्द्वंद्वाचे वर्णन केले आहे, आणि भौतिक लढाईचा उल्लेख एवढ्यासाठीच केला की अंतर्गत द्वंद्वांचे वर्णन अधिक प्रभावीपणे मांडले जावे. धर्म आणि गीता यांचा सखोल अभ्यास करण्याने, प्रारंभीच झालेली ही अन्तःप्रेरणा अधिकच दृढ झाली. महाभारताच्या अभ्यासाने त्यावर अधिकच शिक्कामोर्तब झाले. महाभारत हा रूढ अर्थाने ऐतिहासिक ग्रंथ आहे असे मी मानीत नाही. आदिपर्वात माझ्या मताला पुष्टी देणारे प्रभावी दाखले सापडतात. महान् कवी व्यासांनी आपली प्रमुख पात्रे एकतर दैवी किंवा मनुष्यजातीहून हीन दर्जाची बनवून राजे आणि त्यांच्या प्रजा या बाबतच्या इतिहासाची संक्षिप्त प्रतिकृती तयार केली. त्यात वर्णन केलेल्या व्यक्ती कदाचित् ऐतिहासिक असूही शकतील, परंतु महाभारताच्या लेखकाने त्यांचा वापर मात्र फक्त धार्मिक विषय पटवून देण्यासाठीच केलेला आहे.
2. महाभारताच्या लेखकाने भौतिक लढाईची आवश्यकता दाखवून दिलेली नाही, उलटपक्षी त्याची निरर्थकताच सिध्द केली आहे. त्यांनी त्यातील विजेत्यांना अश्रू आणि पश्चातापाचे दुःख भोगावयास लाविले असून त्यांच्यासाठी केवळ दुःखाचा वारसा शिल्लक ठेविला आहे.
3. अशा या महान् ग्रंथाचा, "गीता" हा भाग मुकुटमणी आहे. त्याच्या दुसऱ्या अध्यायात भौतिक लढाईचे नियम शिकविण्याऐवजी आदर्श मानव कसा असावा याची शिकवण दिली आहे. गीतेतील या आदर्श मानवाच्या (स्थितप्रज्ञ)

व्यक्तीवैशिष्ट्यांत भौतिक संघर्षाचा उल्लेख कुठेही सापडत नाही. दोन लढत राहणाऱ्या पक्षांच्या व त्यासंबंधीचे नियम पाळणाऱ्या परस्परसंबंधाशी गीतेचे पूर्ण स्वरूप हे विसंगत वाटते.

4. गीतेतील कृष्ण हा पूर्णपुरूष असून मूर्तिमंत ज्ञान आहे. पण हे चित्र काल्पनिक आहे. याचा अर्थ असा नव्हे की ज्याची अनेक भक्तांनी पूजा केली, तो कृष्ण अस्तित्वातच नव्हता. पण पूर्णत्व हे काल्पनिक आहे. पूर्ण पुरुषाच्या अवताराची कल्पना ही मागाहून सुचलेली आहे.

5. हिंदू धर्मामध्ये, ज्याने मानवतेची काही अदभुत सेवा करून दाखविली असेल, त्याला अवतार मानण्यात येते. तसे पाहिले तर सर्वच शरीरधारी जीव, हे खऱ्या अर्थाने ईश्वराचे अवतार मानले पाहिजे, पण तसे बहुधा मानले जात नाही. प्रत्येक व्यक्तीला ईश्वराचा अवतार मानीत नाहीत. आपल्या पिढीत ज्याने अलौकिक धार्मिक आचरण ठेविले असेल, त्याला भावी पिढया अवतारपुरुष मानून आपली श्रध्दा प्रकट करील. या प्रक्रियेत मला काही गैर दिसत नाही, यात ईश्वराचे मोठेपण कुठेही कमी होत नाही आणि सत्याच्या बाबतीत हिंसाही घडत नाही. उर्दूमध्ये अशी एक म्हण आहे की, "आदम हा काही ईश्वर नाही परंतु त्यांत देवाची चमक आहे" आणि म्हणून जो उच्च कोटीचे धार्मिक आचरण ठेवितो त्याच्यात दैवी शक्तीची अधिक चमक दिसते. या विचारासरणीनुसार कृष्णाला हिंदू धर्मात उच्च कोटीचा पूर्ण अवतार मानतात.

6. अशा प्रकारे अवतारावर विश्वास ठेवणे हे मानवाच्या उच्च कोटीच्या आध्यात्मिक महत्वाकांक्षेचे द्योतक ठरते. जोपर्यंत माणूस ईश्वरसदृश होत नाही, तोपर्यंत त्याला मनः शांती लाभत नाही. या अवस्थेला पोहोचण्यासाठी केलेले प्रयत्न, सर्वोच्च प्रकारचे असतात व अशी एकच महत्वाकांक्षा आहे जी बाळगण्यायोग्य आहे. यालाच आत्मसाक्षात्कार म्हणतात. इतर सर्व धार्मिक ग्रंथाप्रमाणेच, आत्मसाक्षात्कार हा गीतेचाही विषय आहे. परंतु लेखकाने मात्र हा सिध्दांत प्रस्थापित करण्यासाठी खात्रीने गीता लिहिली नाही. माझ्या मतानुसार गीतेचा उद्देश आत्मसाक्षात्काराचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे, हे दाखवून देण्याचा असावा. हिंदू धर्माच्या शास्त्रग्रंथामध्ये जे ज्ञान इतस्ततः विखुरलेले आहे, जे अस्पष्ट आहे, ते सारे एकत्रित करून अतिशय स्पष्ट शब्दात, पुनरुक्तीचा दोष पत्करूनही, गीतेत मांडलेले आहे.

7. तो अनन्य साधारण उपाय म्हणजे फल त्याग युक्त कर्म.

८. हा विचार गीतेचा केंद्रबिंदू असून त्याभोवती गीता गुंफली गेली आहे. फल त्याग मध्यवर्ती सूर्य कल्पून त्याच्याभोवती भक्ती, ज्ञान आणि इतर सर्व ग्रहांप्रमाणे फिरत असतात. आपले शरीर हे एखाद्या बंदीशाळेप्रमाणे असते. जेथे जेथे शरीर असते तेथे तेथे कर्म असते. कोणत्याही देहधारी माणसाची कर्मातून सुटका नाही. आणि

तरीही सर्व धर्म आवर्जून सांगतात की जर देहाला ईश्वराचे मंदिर मानले तर, माणसाला मुक्ती मिळणे शक्य आहे. कुठलेही कर्म, कितीही क्षुल्लक असले तरी, दूषितच असते. मग माणसाचे शरीर मंदिर कसे बनू शकेल ? दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास माणूस कर्मातून मुक्त कसा होऊ शकेल ? पापाच्या दोषातून मुक्त कसा होऊ शकेल ? "वासनारहित कर्म करून, कर्मफलाचा त्याग करून न आपली सर्वे कर्मे ईश्वरचरणी अर्पण करून म्हणजेच तनमनाने स्वतःला सर्वस्वी ईश्वरचरणी समर्पण करून."

9. परंतु वासनारहित अवस्था किंवा कर्मफलत्याग नुसता त्याबद्दल चर्चा करून, संभवनीय नाही. किंवा बौध्दिक कसरत करुनही प्राप्त होऊ शकत नाही. ती अवस्था फक्त हृदयाच्या सततच्या मंथनातूनच प्राप्त होऊ शकते. कर्मफलत्याग प्राप्तीसाठी योग्य ज्ञानाची आवश्यकता असते. विद्वान माणसांजवळ थोडेफार ज्ञान असते. ते तोंडाने वेदपाठ करु शकतात. परंतु तरीही ते स्वार्थात बुडलेले शकतात. अशा प्रकारे ज्ञान हे वेड्यावाकड्या मार्गाकडे जाऊ नये म्हणून गीतेच्या लेखकाने आग्रह धरला आहे की ज्ञानाला भक्तीची जोड हवी आणि भक्तीला प्रथम स्थान दिले गेले. भक्तीशिवाय ज्ञान निरर्थक ठरेल. म्हणून गीता म्हणते, "भक्ती करा, ज्ञान आपोआप येईल" ही भक्ती म्हणजे केवळ वरवरची असते, त्यांत मृत्युशी झुंज असते म्हणून गीतेच्या भक्तांच्या बाबतीतील कसोट्या व गुण हे ऋषीमुनीच्या गुणांसारखे असतात.

10. अशा प्रकारे गीतेत सांगितलेला भक्तियोग हा काही-हळव्या मनाची उसळून येणारी अभिव्यक्ती नव्हे. ती निश्चितच अंधश्रध्दाही नव्हे. गीतेत सांगितलेल्या भक्तियोगाचा बाह्य गोष्टींशी फारच थोडा संबंध असतो. गीतेचा भक्त, पाहिजे तर जपमाळ वापरील, गंधटिळा लावील, देवाला काही अर्पण करील परंतु या गोष्टी म्हणजे काही भक्तीयोगाची कसोटी नव्हे. जो खरा भक्त असतो, जो कुणाचाही हेवा करीत नाही, तो करुणेने ओथंबलेला असतो, त्याला अहंकार नसतो, तो निःस्वार्थी असतो, तो उष्ण व शीत समान मानतो, सुख दुःख समान मानतो, सदैव क्षमाशील असतो, सदैव तृप्त समाधानी असतो, निश्चयाचा पक्का असतो, तनमन ईश्वरचरणी अर्पण करतो, त्याला कुणाचेही भय वाटत नाही आणि तो कुणालाही भीत नसतो, अति हर्ष, दुःख आणि भयापासून तो मुक्त असतो, पवित्र असतो, कार्यरत असूनही अलिप्त असतो, वाईट अथवा चांगल्या, सर्व प्रकारच्या फळांचा त्याग करतो, मित्र व शत्रू दोहोंनाही समान मानतो. मानापमान समान मानतो, प्रशंसेने फुगून जात नाही, आणि निंदेने खचून जात नाही. एकांतप्रिय व मौनप्रिय असतो, त्याच्या बुध्दीला एक वळण, शिस्त असते. तीव्र आसक्ती असेल तर अशा प्रकारची भक्ती संभवनीय नाही.

11. अशा प्रकारे खरा भक्त होणे म्हणजे स्वतःला ओळखणे. आत्मसाक्षात्कार यापेक्षा

वेगळा नसतो. एक रुपयात आपण विष किंवा अमृत विकत घेऊ शकतो, परंतु ज्ञान किंवा भक्ती यांच्या बदल्यात ज्यांच्या प्राप्तीची आपल्याला आस आहे असा मोक्ष किंवा बंधन विकत घेता येत नाही. ती अशी विनिमयाची माध्यमे नव्हेत. हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर साधन आणि साध्य अगदी एकसारखे नसतीलही पण जवळजवळ सारखेच आहेत. साधनांची परिसमाप्ती म्हणजे मोक्ष. गीतेत सांगितलेला मोक्ष म्हणजे पूर्ण शांती, ज्यांत कसलेच न्यून राहत नाही.

12. परंतु अशा प्रकारचे ज्ञान, भक्ती ही खरी ठरण्यासाठी कर्माच्या फळाची अपेक्षा न ठेवण्याच्या, कसोटीस उतरावे लागते. निव्वळ योग्य अथवा अयोग्य यांचे ज्ञान झाल्याने मोक्षप्राप्तीची पात्रता येत नाही. सर्वसाधारण समजुतीनुसार, केवळ विद्वान माणसाला पंडित म्हणतात, कित्येकदा तो कुठलीच सेवा करीत नाही. एखादा लहानसा तांब्या उचलणे म्हणजे बंधन आहे असे त्याला वाटते. ज्ञान्याची कसोटी सेवाभाव ही नसते. तेथे साहजिकच त्याला उचलण्यासारखी प्रापंचिक कामे करण्याचीही जरूरी वाटत नाही.

13. किंवा भक्तीचे उदाहरण घ्या. भक्तीची सर्वसाधारण कल्पना म्हणजे, अंतःकरणाची कोमलता, माळा ओढणे आणि अशाच इतर गोष्टीत असते आणि आपल्या या माळ ओढण्याच्या भक्तीत खंड पडू नये म्हणून ही भक्त मंडळी प्रेमाने सेवा करण्याचे देखील तुच्छतापूर्वक नाकारतात. ही भक्त मंडळी फक्त खाण्यापिण्याच्या व इतर व्यवहाराच्या वेळी मणीमाळेचा त्याग करतात परंतु अंगमेहनतीच्या कामासाठी वा रूग्णांच्या सेवेसाठी करीत नाहीत.

14. परंतु गीता म्हणते, "कर्म केल्याशिवाय कोणी ही साध्याप्रत पोहोचू शकत नाही. जनकासारख्या राजाला सुध्दा कर्माद्वारेच मोक्ष प्राप्त झाला. जर मी देखील आळशीपणाने काम करण्याचे सोडून दिले, तर जगाचा नाश होईल. म्हणून बहुसंख्य लोकांनी कार्यरत राहणे कितीतरी आवश्यक ठरत नाही काय ?

15. एका बाजूने हे म्हणणे योग्यच आहे की कर्म माणसाला बंधनांत टाकते, परंतु उलटपक्षी हेही तितकेच खरे आहे की जगातील सर्व प्राणीमात्रांनी काम केलेच पाहिजे, त्यांची इच्छा असो व नसो. येथे शारीरिक व मानसिक सर्व प्रकारच्या क्रियांचा कर्मात समावेश होतो. तर मग सतत कर्म करीत असताना देखील कर्माच्या बंधनांतून मुक्ती मिळणार तरी कशी ? परंतु गीतेमध्ये ज्याप्रकारे हा प्रश्न सोडविण्यात आला आहे, त्याला माझ्यामते कुठेच तोड नाही. गीता म्हणते, "प्राप्त कर्म करीत राहा, पण कर्म फळाचा त्याग करा, अनासक्त राहून काम करा, त्या 'कामाच्या मोबदल्याची इच्छा धरु नका, निष्काम कर्म करीत रहा'.

हीच खरी गीतेची अचूक शिकवण आहे, जो कर्म करणे सोडतो तो अधोगतीस जातो. परंतु जो कर्माच्या फळाचा त्याग करतो तो वर चढतो. परंतु फळाचा त्याग म्हणजे कर्माच्या परिणामांविषयी उदासीनता मुळीच नव्हे. कोणतेही कर्म करताना

प्रत्येकाने त्याचे संभाव्य परिणाम जाणून घेतले पाहिजेत. त्यासाठी वापरलेली साधनने व त्यांची क्षमताही तपासली पाहिजे. जो स्वतःला अशाप्रकारे सुसज्ज करितो, तो कर्माच्या फलाची अपेक्षा ठेवीत नाही, आणी तरीही कामात व्यग्र राहातो व ते पूर्णत्वास नेण्यासाठी झटतो, तोच खरा फलत्यागी समजला जातो.

16. तसेच फलत्याग म्हणजे त्यागी माणसाला फळ मिळत नाही असा अर्थ कुणी करु नये. गीतेत अशा प्रकारचा अर्थ कुठेही सांगितला नाही. फलत्याग करणे म्हणजे कर्मफलाची वासना सोडणे. वस्तुतः जो फलत्याग करतो, त्यालाच हजारपटीने मिळते. गीतेत सांगितलेला फलत्याग ही श्रध्देची खरीखुरी अग्नी परिक्षा असते. कर्म करीत असताना जो सतत फलाचा विचार करतो, तो कर्तव्य पार पाडीत असतांना अनेकदा हातपाय गाळून बसतो. तो अधीर होतो, म्हणून क्रोध त्याचा प्रगट होतो आणि मग इतर अनुचित गोष्टी करु लागतो, एका कामाकडून दुसऱ्या कामाकडे धावू लागतो आणि मग कोणत्याच कामाशी प्रामाणिक राहात नाही. जो सदैव फलाचाच विचार करतो, तो विषयासक्त माणसासारखा, तो सारखा चलबिचल होतो, नैतिक मूल्यांना रामराम ठोकतो. त्याच्या अंदाजाप्रमाणे सारेच आलबेल असते म्हणून तो बरे-वाईट कोणतेही मार्गअवलंबून आपला हेतू साध्य करुन घेतो.

17. कर्माच्या फलासाठी आसक्त झालेल्यांचे कटु अनुभव लक्षात घेऊन गीतेच्या लेखकाने कर्म-फल-त्यागाचा मार्ग शोधून काढला आणि तो लोकांना पटेल अश्या पध्दतीने अत्यंत प्रभावीपणे जगासमोर मांडला. सर्वसाधारण समज असा आहे की धर्म हा नेहमी ऐहिक समृध्दीच्या विरोधात असतो" व्यापारविषयक व इतर बाबीत कुणी धार्मिकपणे वागू शकत नाही. अशा प्रकारच्या व्यवसायांमध्ये धर्माला स्थानच नसते; धर्म हा फक्त मोक्ष प्राप्तीसाठीच असतो" आशा प्रकारची मुक्ताफळे तथाकथित शहाण्या लोकांच्या तोंडून आपण ऐकतो. माझ्या मते गीतेच्या लेखकाने या साऱ्या भ्रमांचा, गोंधळाचा निरास केला आहे. त्याने ऐहिक जगातील व्यवहार व मोक्षप्राप्ती या दोन्हीत कोणतीही सीमारेषा काढलेली नाही. उलटपक्षी त्याने असे दाखवून दिले आहे की आपल्या ऐहिक व्यवहारांवर धर्माचे राज्य असावे. मला असे निश्चित वाटते, गीतेची शिकवणूक अशी आहे की आपल्या दैनंदिन जीवनात जो आपण आचरणात आणू शकत नाही, तो धर्मच नव्हे. अशाप्रकारे, गीतेच्या तत्वानुसार, अनासक्तीने न करता येणारी कर्मे त्याज्य मानली पाहिजेत. ही गुरुकिल्ली मानवतेला अधोगतीपासून वाचविते. या अर्थानुरुप खून, खोटे बोलणे, दुराचार आणि तत्सम दुर्गुण हे पापमय मानले जातात, म्हणून ते करणे निषिध्द मानले पाहिजे. त्यामुळे माणसाचे जीवन साधे बनते व या साधेपणातूनच शांती उदयास येते.

18. या विचारसरणीनुसार मला असे वाटते की गीतेचे पालुपद असलेली ही शिकवण

आचरणात आणण्याचे प्रयत्न केल्याबरोबरच माणसाला सत्य व अहिंसेचा मार्ग अनुसरावासा वाटू लागेल. जेव्हा कर्माच्या फलाची आसक्ती राहणार नाही, तेव्हा असत्य व हिंसेचे प्रलोभनही राहात नाही. कोणत्याही असत्य व हिंसक प्रसंगाचे उदाहरण घ्या, तुम्हाला आढळून येईल की त्याच्या मुळाशी केवळ मनात बाळगलेल्या उद्दिष्टाच्या पूर्तीची वासनाच असते. परंतु हे मोकळेपणाने कबूल केले पाहिजे की गीता ही काही अहिंसा प्रस्थापित करण्यासाठी लिहिली गेली नव्हती. गीता युगापूर्वी देखील अहिंसा सर्वमान्य होती आणि ते प्रथम कर्तव्य मानले जात होते. गीतेला कर्मफलाचा त्याग, हाच संदेश द्यायचा होता आणि तो लवकरच म्हणजे दुसऱ्या अध्यायापासूनच स्पष्टपणे मांडण्यातआलेला आहे.

19. यावर असा प्रश्न उद्‌भवतो की जर गीतेचा अहिंसेवर विश्वास होता, आणि ती अनासक्तीतच सामावली होती, तर मग लेखकाने युध्दाचा प्रसंग उदाहरण म्हणून का घेतला ? वस्तुस्थिती अशी आहे की जेव्हा गीता लिहिली गेली, तेव्हा जरी लोकांचा अहिंसेवर विश्वास होता तरी लढाया केवळ निषिध्द मानल्या जात नव्हत्या. एवढेच नव्हे तर लोकांना त्यात आणि अहिंसेत विरोधाभास वा विसंगती वाटत नव्हती.

20. कर्म-फल-त्यागाच्या गीतेच्या संदेशाच्या अर्थाचे मूल्यमापन करताना आपल्याला गीतेच्या लेखकाच्या भूमिकेचा ठाव घेण्याची गरज नाही. अहिंसेच्या व इतर तत्सम बाबतच्या त्याच्या मर्यादांचा शोध घेण्याचीहीगरज नाही. पुष्कळदा एखादा कवी विशिष्ट सत्य जगाला सांगून जातो, तेव्हा त्याचा अर्थ असा नव्हे की त्याने सत्याच्या सर्व महत्त्वाच्या संभाव्य परिणामांचा विचार केलेला असतो, किंवा जर तसा केला असा तरी, तो ते परिणाम पूर्णत: प्रकट करू शकेलच असेही नाही. कदाचित् यातच त्या काव्याचा व कवीचा मोठेपणा दडलेला असेल. कवीच्या अर्थाला मर्यादा मनुष्याप्रमाणेच नसतात. श्रेष्ठ साहित्याचाही विकास होत असतो. भाषांच्या इतिहासाचा अभ्यास करताना आपल्याला आढळून येते की काही महत्वाच्या शब्दांचे अर्थ बदलत आहेत वा व्यापक होत आहेत. हे गीतेच्या बाबतीही लागू पडते. लेखकाने स्वतःच काही प्रचलित शब्दांचे अर्थ व्यापक केले आहेत. वरवर तपासणी केली असतानाही हे सहजपणे आपल्याला लक्षात येते. गीता अस्तित्वात येण्यापूर्वीच्या काळात, यज्ञामध्ये प्राण्यांचा बळी देण्यास परवानगी असावी अशी शक्यता दिसते. परंतु गीतेत ज्या अर्थाने यज्ञ शब्द वापरला आहे, तेथे या गोष्टीचा उल्लेखही दिसत नाही. गीतेमध्ये ईश्वराचे सतत एकाग्रपणे केलेले चिंतन हे यज्ञांचा (सर्वश्रेष्ठ) राजा ठरते. तृतीय अध्यायात हे दाखविले आहे की प्रामुख्याने यज्ञ म्हणजे शरीरश्रमाच्या द्वारे सेवा. तिसरा व चौथा अध्याय एकत्र वाचल्यास आपल्याला यज्ञाचे इतर अर्थ सापडतील परंतु त्यात प्राण्यांच्या बळीचा उल्लेख कुठेच नाही. तसेच गीतेमध्ये 'संन्यास' या

शब्दाचाही अर्थ बदललेला दिसतो. गीतेतील 'संन्यास' हा सर्व कर्माचा संपूर्ण त्याग करण्यास मुळीच सांगत नाही. गीतेचा संन्यास म्हणजे सतत कर्म करणे आणि तरीही काहीच न करणे. अशा तऱ्हेने गीतेच्या लेखकाने शब्दांचे अर्थ व्यापक करुन आपल्याला त्याचे अनुकरण करण्यास शिकविले आहे. गीतेच्या शब्दार्थानुसार आपण असे मानू शकतो की युध्द हे फलत्यागाशी सुसंगत असणे शक्य आहे. परंतु सतत चाळीस वर्षेपर्यंत सतत कठोर साधना करीत गीतेनुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करतांना मला नम्रपणे सांगावेसे वाटते की संपूर्ण कर्म फल-त्याग हा, प्रत्येक गोष्टीत, सर्वप्रकारे अहिंसेचे संपूर्ण पालन केल्याशिवाय शक्य होणार नाही.

21. गीता ही काही सूत्रबध्द कृती नव्हे, ते एक महान् आध्यात्मिक काव्य आहे. जो जो आपण त्यात खोल शिरतो, तो तो समृध्द अर्थ हाती लागत जातो. तो साऱ्या जनतेसाठी असल्यामुळे त्यात सुखद पुनरावृत्ती आहे. प्रत्येक युगांत त्यातील महत्वाच्या शब्दांचे नवनवे व विस्तारित अर्थ हाती येतील. परंतु त्यातील मूळ शिकवणुकीत कदापि बदल होणार नाही. जो गीतेचा अन्वेषक असतो, त्याला या खजिन्यातून कोणताही अर्थ काढण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. ज्यायोगे तो गीतेची मूळ शिकवण आपल्या जीवनांत आणू शकेल.

22. गीता ही, काय करावे वा काय करु नये, सांगणारा संग्रह नव्हे. जे एखाद्यासाठी वैध ठरत असेल, ते दुसऱ्यासाठी निषिध्द ठरू शकते. एखाद्या ठिकाणी अथवा एखाद्या प्रसंगी जे योग्य असेल, ते दुसऱ्या ठिकाणी अथवा दुसऱ्या प्रसंगी योग्य नसेलही. कर्माच्या फलाची अपेक्षा करणे ही एकच गोष्ट मात्र सदैव, सर्वत्र वर्जित आहे. अनासक्ती ही सदैव अनिवार्य मानली गेली आहे.

23. गीतेने ज्ञानाचे गुणगान केले असले तरी ती सर्वसाधारण बुध्दीच्या पलीकडची बाब आहे. ते मुख्यतः हृदयाला केलेले आवाहन आहे आणि हृदयाने समजून घेण्याची गोष्ट आहे. म्हणून ज्याच्यापाशी श्रध्दा नाही, त्याच्यासाठी गीता हा ग्रंथ नाही. म्हणून लेखक कृष्णाच्या तोंडी हे शब्द घालतो, 'जो माझे अस्तित्व मानत नाही, ज्याला ह्या उपदेशाची गरज नाही, जो भक्तिहीन आहे, त्यागाची भावना बाळगीत नाही, त्याच्या हाती हा ज्ञानाचा खजिना सोपवू नये. उलटपक्षी जे हा मौल्यवान खजिना माझ्या भक्तांच्या हवाली करतील, ते या सेवेनेच माझ्या चरणी खात्रीपूर्वक रूजू होतील. जे तुच्छवृत्तीपासून मुक्त होऊन गीतेची शिकवणूक श्रध्दापूर्वक अंगी बाणवतील त्यांना मुक्ती मिळेल व मृत्यूनंतर सद्वर्तनी, सदगुणी लोक जेथे जातात, ते स्थान त्यांना प्राप्त होईल.

यंग इंडिया, 6 ऑगस्ट 1931

29

येरवडा मंदिरातून

(गांधीजींनी येरवडा जेलमधून साबरमती आश्रमवासियांना ही दोन भाषणे लिहून पाठविली होती.)

जेव्हा जेव्हा मी अडचणीत सापडतो, तेव्हा तेव्हा मी गीतामातेकडे धाव घेतो आणि आजपर्यंत मला समाधान देण्यात तिने कधीही काही कमी पडू दिले नाही. जे गीतेपासून समाधान मिळवू शकतात, त्यांनी जर मी ज्याप्रमाणे नित्य गीतेचा अर्थ समजून घेतो ते जाणून घेतले तर त्यांना गीतेपासून कितीतरी अधिक मदत मिळू शकेल. अगदीच नवा अर्थ उमगू शकेल.

मला बाराव्या अध्यायाचा संक्षिप्त गोषवारा तुमच्यापुढे ठेवायाचा आहे. तो अध्याय म्हणजे भक्तियोग, भक्तीमार्गाने ईश्वरी साक्षात्कार करुन घेणे होय. लग्नप्रसंगी आम्ही (आश्रम पद्धतीनुसार) जोडप्याला हा अध्याय पाठ करायला आणि त्याचे चिंतन करायला लावतो. त्याप्रसंगी करावयाच्या पाच यज्ञांपैकी तो एक मानला गेला आहे. भक्तीशिवाय ज्ञान आणि कर्म, निर्जीव व शुष्क होते व बंधनरुपही होते म्हणून प्रेमपूर्ण अंतःकरणाने आपण गीतेचे मनन करु या.

अर्जुन ईश्वराला विचारतो, "जो मूर्त साकाराची उपासना करतो तो भक्त श्रेष्ठ की जो अव्यक्ताची उपासना करतो तो श्रेष्ठ ?" भगवान उत्तर देतात, "जे पूर्ण श्रद्धेने साकाराची उपासना करतात, आणि माझ्यात विलीन होऊन जातात, ते श्रद्धावान जीव माझे भक्त असतात. परंतु जे अव्यक्ताची उपासना करतात, आणि त्यासाठी आपल्या सर्व इंद्रियांचा यम करतात, सर्वांकडे समान दृष्टीने पाहतात व सर्वांची सेवा करतात, कुणालाही उच्च-नीच मानीत नाहीत, ते देखील मला जाणून घेतात."

त्यामुळे, दोहोत कोण श्रेष्ठ आहे, ते सांगता येणार नाही. परंतु देहधारी माणसाला अव्यक्त ईश्वरा पूर्णपणे जाणून घेणे व त्याची उपासना करणे जवळजवळ अशक्य कोटीतील वाटते. अव्यक्त ईश्वर, निर्गुण आहे म्हणून तो मानवी नजरेच्या पलीकडील आहे. म्हणून सर्व देहधारी जीव जाणून वा अजाणता व्यक्त साकाराचे भक्त असतात.

भगवान म्हणतात, "तेव्हा तुझे मन माझ्या साकार विश्वरुपात लीन होऊ दे. तुझे सर्वस्व तू ईश्वराच्या चरणी अर्पण कर. परंतु ते तुला जमत नसेल तर मनाच्या विकारावर ताबा ठेवण्याचा अभ्यास कर. यमनियमांचे आसन-प्राणायामाच्या मदतीने पालन करुन, आणि इतर उपायांनी मनावर ताबा मिळव. जर तुला हेही साधत नसेल तर, तू आपले कर्म करीत असताना, या गोष्टी ध्यानात ठेव, की तुम्ही जे काम हाती घ्याल ते ईश्वरासाठी (माझ्यासाठी) करीत आहात, हे लक्षात असू द्या. त्यामुळे तुमचे ऐहिक मोह व आसक्ती कमी कमी होत जाईल आणि तुम्ही हळूहळू निर्मळ व पवित्र व्हाल. तुमच्या चित्तांत प्रेमाचे झरे निर्माण होतील. परंतु तुम्हाला हेही करणे साधत नसेल तर तुम्ही केलेल्या सर्व कर्माच्या फलाचा त्याग करा, तुम्ही करीत असलेल्या कर्माच्या फलाची आकांक्षा, इच्छा धरू नका, तुमच्या वाट्याला जी कामे येतील ती करा. माणूस करीत असलेल्या कर्माच्या फलाचा तो स्वामी होऊ शकत नाही. कर्माची फळे मिळण्यासाठी त्यामागील कार्यकारणभाव एकत्रित व्हावा लागतो. म्हणून तू केवळ साधनमात्र हो. मी तुला सांगितलेल्या या चार पद्धतीपैकी कोणती ही श्रेष्ठ वा कनिष्ठ समजू नकोस. त्यापैकी जी पद्धती तुला जमत असेल त्या मार्गाने जाऊन भक्ती करीत रहा.

"असे दिसते की मी सांगितलेल्या यम, नियम, प्राणायाम आणि आसनांच्या मार्गापेक्षा श्रवण, ध्यान, आणि मनन, निदिध्यासन हे अधिक सुलभ उपाय असू शकतील. त्याहीपेक्षा चित्ताची एकाग्रता व उपासना अधिक सोपी असते आणि या एकाग्रतेपेक्षाही अधिक सोपे काय असेल तर कर्म-फल-त्याग आहे. प्रत्येकाला एकच मार्ग श्रेयस्कर वाटणार नाही, काहीना या सर्व उपायांची मदत घ्यावी लागेल. हे निश्चितच एकात एक मिसळलेले आहेत. अखेर तुम्ही भक्त होऊ इच्छिता हे महत्वाचे आहे. हा उद्देश्य साध्य करुन घेण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास हरकत नाही. माझे काम फक्त एवढेच की खरा भक्त कुणाला म्हणावे, हे तुम्हाला सांगावे. भक्त कुणाचाही द्वेष करीत नाही, कुणाशीही वैरभाव ठेवीत नाही, प्राणीमात्रांशी मैत्री ठेवतो आणि सर्वांबद्दल करुणा बाळगतो. हे साध्य करुन घेण्यासाठी तो, त्यांच्या चित्तांतील सर्व आसक्तीतून मुक्त होतो, अहंकार टाकून देतो, शून्यवत् बनतो, त्याला सुख दुःख समान वाटते, स्वतःवर आक्रमण करणाऱ्या माणसांनाही तो क्षमा करतो, ज्याप्रमाणे स्वतःच्या दोषांना जगाने क्षमा करावी यासाठी, तो तळमळतो. तो संतुष्ट असतो, आपल्या शुभ निर्णयांवर तो अटळ असतो, तो आपले तनमनबुध्दी सारे माझ्या चरणी अर्पण करतो. तो दुसऱ्याला कधीही उपद्रव देत नाही, भीती दाखवित नाही, आणि त्याला स्वतःलाही दुसऱ्यांकडून कधी त्रास होत नाही, तो कुणाचीहि भीती बाळगत नाही. माझा भक्त सदैव सुखदुःख, हर्ष-शोक यापासून मुक्त

असतो. तो वासनारहित, पवित्र, दक्ष आणि ज्ञानी असतो. त्याने सर्व महत्वाकांक्षी कर्मांचा त्याग केलेला असतो. तो आपल्या संकल्पांबाबत पक्का असतो, त्याच्या बऱ्या वाईट कर्मफलनिष्पत्तीचा त्याग करतो. त्याबाबत निश्चिंत असतो. अश भक्ताला शत्रूही नसतात. व मित्रही नसतात. तो मानापमानाच्या पलीकडे असतो.

"शांति आणि मौनांत राहून जे मिळेल त्यात समाधानी राहतो, तो आंतरिक अवस्थेत जणू राहतो, सभोवताली काहीही घडत असले तरी त्याने विचलित न होता, शांत राहतो. जो अशा पध्दतीचे जीवन जगतो, पूर्ण श्रध्दामय असतो, तोच माझा आवडता प्रिय भक्त आहे."

यंग इंडिया, 13 नोव्हेंबर 1930

30

गीता पठन करणाऱ्यांस

मला गीतेचे किती महत्व वाटते हे 'हरिजन'च्या वाचकांना माहितच आहे. गीतेसारख्या ग्रंथाचे पाठांतर करणे हे मी अत्यंत आवश्यक मानतो. तथापि मला स्वतःला - अनेक प्रयत्न करुनही गीता तोंडपाठ करणे जमले नाही. मला माहीत आहे की मी पाठांतराच्या बाबतीत फार कच्चा आहे. त्यामुळे संपूर्ण गीता पाठ केलेली कोणीही व्यक्ती मला भेटली तर मला त्या व्यक्तीबद्दल फार आदर वाटू लागतो. माझ्या तामीळनाडूच्या प्रवासात मला अशा दोन व्यक्ती भेटल्या. त्यात एक गृहस्थ मदुराईचे होते. आणि एक महिला होती. एक अपरिचित व्यापारी, होता, आणि दुसऱ्या होत्या पार्वतीबाई-कैलासवासी न्यायमूर्ती सदाशिव अय्यर यांच्या कन्या. के. अय्यर यांनी आपल्या हयातीत गीता तोंडपाठ व उत्कृष्टपणे म्हणणाऱ्यांसाठी वार्षिक बक्षिस ठेवलेले होते. तथापि मला असेही सांगावेसे वाटते की गीता पठण करणाऱ्यांनी ते अंतिम साध्य मानू नये. गीतेचा संदेश समजून घेण्यासाठी, तिच्यापासून बोध घेण्यासाठी व चिंतन करण्यासाठी हे पाठांतर सहाय्यभूत ठरले पाहिजे. चिकाटीने शिकविले तर पोपटालाही गीतापाठ करायला शिकविता येईल. पण त्या पाठांतराने तो काही ज्ञानी होणार नाही. गीता पठण करणाराने, गीतेच्या लेखनकर्त्याच्या अपेक्षेप्रमाणे व्यापक अर्थाने योगी बनले पाहिजे. गीता प्रत्येक भक्ताकडून समतोल व्यक्तिमत्व व उच्चार, आचार, विचार याच्यात एकवाक्यता, सुसंवाद यांची अपेक्षा करते. ज्याच्या उच्चारात व आचारात त्याच्या विचारांशी एकवाक्यता नसते, तो दांभिक अथवा फसवा असतो.

हरिजन, 2 फेब्रुवारी 1934

31

गीतेचा आदर्श

(साबरमती आश्रमवासियांना उद्देशून गांधीजी म्हणाले :)

मी गीतेचा भक्त आहे आणि कर्माच्या अटळ नियमांवर माझी श्रध्दा आहे. अगदी साधी टिपटिप असो की अडखळणे असो, त्याला काही कारण असावेच लागते म्हणून मला नेहमी आश्चर्य वाटते की ज्याने गीतेत सांगितल्याप्रमाणे विचार, उच्चार व आचार सतत पाळण्याचा प्रयत्न केला असेल, त्याला आजारपण का यावे ? डॉक्टरने मला खात्रीपूर्वक सांगितले आहे की उच्च रक्तदाबाचा विकार हा मानसिक तणाव व चिंतेमुळे होत असतो. हे जर खरे असेल तर मग मी उगीचच चिंता करीत बसत असेन. अकारण मनाला हुरहुर लावून गुप्तपणे राग, वासना इत्यादी सारख्या विकारांना कुरवाळीत बसत असेन. मी अगदी गंभीरपणे कितीही प्रयत्न केला तरी एखादी घटना अथवा प्रसंग माझ्या मनाचा तोल बिघडविण्यास कारणीभूत होतो. याचा अर्थ असा की, गीतेच्या आदर्शात दोष नाही तर माझीच गीतेबद्दलची भक्ती अपुरी व दोषयुक्त आहे. गीतेचा आदर्श सदा सर्वकाळ सत्यच असतो. परंतु गीता समजून घेण्यात आणि त्यानुसार आचरण करण्यात माझ्याकडून चुका होतात.

हरिजन, 29 फेब्रुवारी 1936

आपले ध्येय आपल्यापासून सदैव दूरदूरच राहात असते. जसजशी आपली प्रगती होत असते, तसतशी आपली अपात्रता अधिक जाणवत जाते. म्हणून प्रयत्न करण्यातच समाधान मानावे, ध्येयपूर्तीत नव्हे. संपूर्णपणे झोकून देऊन केलेले प्रयत्न हेच संपूर्ण यश !

यंग इंडिया, 9 मार्च 1922



32

अहिंसा

ज्यावेळेस एखादा माणूस असा दावा करतो की मी अहिंसक आहे, तेव्हा ज्याने त्याला दुखावले असेल त्याच्यावर सुध्दा तो रागावणार नाही अशी अपेक्षा असते. तो त्या माणसाचेही अहित चिंतणार नाही. उलट कल्याणच चिंतीत असतो. तो त्याचा तिरस्कार करीत नाही किंवा त्याला शारीरिक इजा करू इच्छित नसतो. दुष्कृत्य करणाऱ्याने त्याला जे दुःख दिले असते, ते दुःख तो निमूटपणे सहन करतो. अशातऱ्हेने अहिंसा म्हणजे संपूर्ण निष्कपटता होय. जीवमात्राबद्दल दुर्भावनेचा पूर्ण अभाव म्हणजे पूर्ण अहिंसा होय. म्हणून त्यांत मानवाहून निकृष्ट दर्जाचे जीवमात्र, विषारी किटाणू आणि पशुचा सुध्दा समावेश होतो. आपल्या विनाशकारी प्रवृत्तीची भूक भागवून घेण्यासाठी ईश्वराने त्यांना निर्माण केलेले नसते. आपण जर निर्मात्याचा मूळ हेतू जाणून घेतला तर त्याने निर्माण केलेल्या या जगात त्या सर्वांचे उचित स्थान कोणते ते आपल्याला कळेल. म्हणून अहिंसेचे सक्रीय रूप म्हणजे जगातील सर्व जीवन मात्रांविषयीचा सद्भाव होय. अहिंसा म्हणजे निखळ प्रेम. हिंदू ग्रंथांमधून, बायबलमधून व कुराणातून मला हेच गवसले.

अहिंसा ही पूर्णत्वाची अवस्था होय. अखिल मानवजात ज्याकडे अजाणतेपणी स्वभावतःच वाटचाल करीत राहाते असे हे ध्येय आहे. मनुष्य केवळ निष्कपट व्यक्तिमत्व अंगी बाणण्याने दैवी ठरत नाही. मात्र, त्यानंतर तो खरा माणूस होतो. आपल्या सध्याच्या अवस्थेत आपण अर्ध मानव आणि अर्ध-पशुप्रमाणे जगतो आणि आपल्या अज्ञानाने आणि अहंकाराने असे म्हणत असतो की आपण खरोखरच मानवजातीत जन्मल्याचा उद्देश पुरा करीत आहोत, पण याचवेळेस "ठोशास ठोसा" न्यायाने वागत असतो. आणि त्याकरता आवश्यक तितक्या क्रोधाला उत्तेजन देतो. आपण अशी बतावणी करतो की

प्रत्युत्तर हा आपल्या अस्तित्वाचा नियम आहे. परंतु आपण कोणताही धर्मग्रंथ उघडून पाहिल्यास आपणास दिसू येईल की जशास तसे वागून सूड घेण्याची वृत्ती आवश्यक मानली गेली, बंधनकारक नाही, त्याची फक्त परवानगी दिलेली असते. संयम पाळणे हेच खरे आवश्यक मानले गेले असते. जशांस तसे वागणे नियमांच्या चौकटीत बसवावे लागते. संयम हा आपल्या जीवनाचा मूळ नियम आहे. सर्वोच्च पूर्णत्व प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वोच्च संयमाची गरज असते. सहनशीलता हेच खरे मानवजातीचे लक्षण होय.



33

हिंदू - मुसलमान तणाव त्याची कारणे व उपाय

मी हिंदुधर्मीय आहे असा माझा दावा काहीजणांना मान्य नाही कारण मी अहिंसेबाबत टोकाची भूमिका स्वीकारतो व तिचे प्रतिपादन करतो. त्यांचे म्हणणे असे की मी छुपा ख्रिश्चन आहे. पुष्कळांनी मला गंभीरपणे सांगितले आहे की, तुम्ही गीतेचा अर्थ विपर्यस्त रीतीने सांगत असता. जेव्हा मी म्हणतो की गीतेच्या महान काव्यातील शिकवणुकीत शुध्द स्वरूपाचे अहिंसेचे तत्वज्ञान सामावलेले आहे. काही हिंदू मित्र म्हणतात की गीता सांगते की विशिष्ट परिस्थितीत संहार करणे हे कर्तव्य ठरते. नुकतेच एका विद्वान शास्त्र्यांनी माझे गीतेवरील भाष्य तिरस्कारपूर्वक नाकारताना म्हटले की, गीता ही अनंतापर्यंत चालणाऱ्या अंतर्द्वंद्वाचे-चांगल्या आणि वाईट वृत्तींच्या संघर्षाचे प्रातिनिधिक रूप असून आपल्या अंतर्मनातील दुष्प्रवृत्तीचे निर्धाराने कठोरपणे निर्दालन करण्याचे कर्तव्य अंगी बाणवते, असे काही टीकाकारांनी गीतेचा अर्थ लावताना जे मत दिले आहे त्याला आधारभूत असे प्रमाण नाही.

ही मते अहिंसाविरोधी असल्यामुळे मी ती तुम्हाला सविस्तरपणे सांगितली. कारण मी पुढे सांगणारे उपाय तुम्हाला नीट समजावून घ्यावयाचे असतील तर हे समजून घेणे अत्यावश्यक होते.

आज माझ्या अवतीभोवती अहिंसेच्या प्रसाराबाबत विरोधी प्रतिक्रिया आढळून येत आहेत. मला हिंसेची लाट येताना दिसते आहे. हिंदू-मुसलमान तणाव ही या लाटेचीच एक तीव्र अवस्था आहे.

सद्यपरिस्थितीत मला विसरून जा. माझा धर्म हा केवळ ईश्वरामधील आणि

माझ्यामधील बाब आहे. जर मी हिंदू असेन तर समस्त हिंदू लोकसंख्येने मला नाकारले तरी मी हिंदूच राहीन. तरीही मी सांगू इच्छितो सुचवितो की, अहिंसा ही सर्व धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे.

परंतु हिंदुस्थानात अशाप्रकारच्या टोकाच्या अहिंसेचे मी कधीही प्रतिपादन केले नाही. कारण मी स्वतःला तो प्राचीन संदेश पुन्हा देण्याच्या योग्यतेचा समजत नाही. जरी माझ्या बुध्दीने ती पूर्णतः समजून ग्रहण केली असली तरी अद्यापही ती माझ्या संपूर्ण जीवनाचे अंग बनली नाही. जे मी माझ्या जीवनात पुनःपुन्हा प्रयास करूनही रुजवू शकलो नाही, ते लोकांना करावयास न सांगण्यातच माझी खरी शक्ती निहित आहे. म्हणून माझ्या देशबांधवांना मी एवढेच सांगू इच्छितो की, त्यांनी अहिंसा हा आपल्या जीवनाचा अंतिम धर्म मानावा. फक्त विविध समूहातील परस्पर संबंधांचे योग्य नियंत्रण व्हावे आणि स्वराज्य मिळविणेही सुलभ व्हावे एवढाच त्यामागे उद्देश्य आहे. हिंदू आणि मुसलमान, ख्रिश्चन, शीख आणि पारशी यांनी आपले आपापसातले मतभेद हिंसेच्या आधारे मिटवू नयेत आणि स्वराज्य मिळविण्याची साधने अहिंसक असावी. मी हे हिंदुस्थानसमोर मांडण्याचे धारिष्ट्य करीत आहे ते भेकडांचे शस्त्र म्हणून नव्हे, तर ते शूरवीरांचे शस्त्र आहे. हिंदू आणि मुसलमान अशी बढाई मारतात की त्यांच्या धर्मात कशाचीच जबाबदारी नाही. पण ही जबरदस्ती नव्हे तर काय? जेव्हा गाईचे रक्षण करण्यासाठी हिंदू मुसलमानाला मारतो ते जबरदस्तीने मुसलमानाला हिंदू करण्यासारखेच आहे. आणि त्याचप्रमाणे जेव्हा मुसलमान हिंदुंना मशिदीसमोर वाद्य वाजविण्यास मनाई करतात, ती जबरदस्ती नव्हे तर दुसरे काय? गडबड गोंधळ आणि गदारोळातही प्रार्थनेत लीन होणे, यातच खरी सात्विकता दडलेली आहे. जर आपण दोघेही एकमेकांना इच्छेविरूध्द आपल्या धार्मिक भावना दुसऱ्यांवर लादण्याची जबरदस्ती करण्याचे निरर्थक प्रयत्न करीत राहू, तर भावी पिढया आपल्याला अधार्मिक पशुवत् रानटी वर्तन करणारे मानून दोघांनाही दोष देतील. आपल्यासारख्या तीन कोटी लोकसंख्या असणाऱ्या राष्ट्राला केवळ एक लाख इंग्रजांना सरळ करण्यासाठी बळाचा वापर करावा लागतो, ही गोष्ट लज्जास्पद वाटली पाहिजे. त्यांना आपल्या बाजूला वळवायचे असल्यास, अथवा वेळ पडल्यास त्यांना देशाबाहेर हाकलून द्यावयाचे असल्यास, आपल्याला शस्त्र शक्तींची गरज नाही, तर इच्छाशक्तीची गरज आहे. जोपर्यंत आपली इच्छाशक्ती जागृत होणार नाही, तोपर्यन्त शस्त्र-शक्ती देखील प्राप्त होणार नाही. जर आपल्या जवळ इच्छाशक्तीचे बल असेल तर आपल्याला शस्त्रशक्तीची गरजच पडणार नाही.

म्हणून आपले राष्ट्रीय अस्तित्व टिकवावयाचे असेल तर मी सांगितलेल्या कारणांस्तव अहिंसेचा स्वीकार करणे हीच सर्वाधिक स्वाभाविक आणि आवश्यक गोष्ट आहे. अहिंसा आपल्याला सामूहिक भौतिक शक्तीचा उपयोग अधिक चांगल्या कारणाकरिता करण्यास शिकवील. सध्या आपण ही शक्ती निरर्थक भाऊबंदकीच्या

भांडणांमध्ये वाया घालवीत आहोत. कारण त्यानंतर प्रत्येक पक्ष थकून संपुष्टात येतो. तसेच प्रत्येक सशस्त्र बंडाचा उठाव हा, संपूर्ण राष्ट्राचा पाठिंबा नसेल तर शुद्ध मूर्खपणा ठरतो. परंतु असहकाराच्या कुठल्याही कार्यक्रमाला जर संपूर्ण राष्ट्राचा पाठिंबा मिळाला तर आपल्याला रक्ताचा एक थेंबही न सांडता आपले उद्दिष्ट गाठता येईल.

यंग इंडिया, 29 मे 1924

34

धर्मांतराला परवानगी नसावी

इंग्रजी वर्तमानपत्रांच्या कात्रणामध्ये एक अत्यंत मजेदार बातमी छापून आली ती अशी की मिस स्लेड, आश्रमात ज्या मीराबाई नावाने ओळखल्या जातात, त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला आहे. परंतु मी आपल्याला सांगतो की त्यांनी हिंदू धर्म स्वीकारलेला नाही. उलट मला असे वाटते की, चार वर्षापूर्वी त्या इथे आश्रमात आल्या, तेव्हापेक्षा आज अधिक चांगल्या ख्रिश्चन झाल्या आहेत. त्या काही कुणी कोवळ्या वयाची लहान मुलगी नाहीत. त्या तीस वर्षे वयाच्या असून त्यांनी इजिप्त, पर्शिया आणि युरोप या देशांमध्ये एकट्याने प्रवास केलेला आहे व तेथील पशुपक्षी व वृक्षांशी देखील मैत्री केली आहे. माझ्यासोबत मुसलमान, पारशी व ख्रिश्चन अल्पवयीन सोबती सोबती घेऊन राहण्याची सुसंधी मला लाभलेली आहे. मी त्यांच्यासमोर कधीही हिंदू धर्म स्वीकारण्याचा प्रस्ताव मांडलेला नाही. त्यांना नेहमी त्यांचेच धर्मग्रंथ वाचण्यास उत्तेजन दिले आणि त्यांच्या धार्मिक ग्रंथाबद्दल आदर बाळगण्यास शिकविले. मी अत्यंत आनंदाने कित्येक स्त्री-पुरूषांची व मुलामुलींची उदाहरणे देऊन सांगू शकतो की मी त्यांना इतर धर्मांचाही आदरपूर्वक अभ्यास करण्यास उत्तेजन दिल्याने ते आपला धर्म अधिक उत्तम तऱ्हेने जाणून घेऊन त्यावर पूर्वापेक्षा जास्त प्रेम करू लागले आहेत.

आमच्या आश्रमात आज विविध धर्मांचे प्रतिनिधी आहेत. कोणत्याही प्रकारचे धर्मांतर झालेले नाही व त्याची परवानगी देखील कदापि दिलेली नाही. सर्व धर्म समान सत्य आहेत व दैवी प्रेरणेपासून निर्माण झालेत असे आम्ही मानतो. त्याच सोबत अपूर्ण माणसांनी अयोग्यरीत्या हाताळल्यामुळे सर्व धर्मांचे नुकसान झाले आहे, हे ही आम्हाला माहीत आहे. मिस स्लेड यांचे नाव हिंदू नाही. ते हिंदुस्थानी नाव आहे आणि त्यांनी स्वतःच ते केवळ सोयीसाठी ते नाव घेतलेले आहे.

यंग इंडिया, 20 फेब्रुवारी 1930

35

धर्माची समानता

हिंदू धर्मामध्ये येशूसाठी तसेच मुहंम्मद, झरतुष्ट्र आणि मोझेससाठी भरपूर जागा आहे. माझ्यादृष्टीने विविध धर्म हे एकाच बागेतील सुंदर फुले आहेत किंवा ते एकाच भव्य वृक्षाच्या शाखा आहेत. म्हणून ते सर्व सारखेच सत्य आहेत, परंतु साधनांद्वारे प्राप्त झालेले आणि मानवांनीच त्यांचे भाष्य केल्यामुळे ते अपूर्ण देखील आहेत. आज ज्या पध्दतीने हिंदुस्थानात आणि इतरत्र धर्मांतर घडून येत आहे. ते मी कधीही मान्य करू शकलो नाही. जागतिक शांततेच्या प्रगतीपथात या एका भयंकर चुकीमुळे फार मोठा अडसर निर्माण झालेला आहे. "लढाऊ धर्मश्रध्दा" हा वाक्‌प्रचार इशनिंदात्मक आहे आणि हे हिंदुस्थानातील सद्यपरिस्थितीचे योग्य वर्णन आहे. ज्या हिंदुस्थानला केवळ हिंदू धर्माची माता नव्हे तर मी साऱ्या धर्माची माता मानतो, आणि ती जर खरोखरच आई असेल तर तिचे मातृत्व कसोटीला लागणारे आहे. एखाद्या ख्रिश्चनाला, हिंदूला बाटवून ख्रिश्चनधर्मात आणावेसे का वाटते ? आणि त्याच्या उलटही का वाटते ? जर तो हिंदू चांगला व देवमाणूस असेल तर त्यात त्याला समाधान वाटत नाही ? जर माणसाच्या नीतीमत्तेचे काहीच मूल्य नसेल, तर मग केवळ विशिष्ट पूजेची पध्दत, मग ती चर्चमधील असो, वा मशिदीतील असो वा मंदिरात होवो, ती पोकळ कर्मकांड ठरते, औपचारिक असते. तिच्यामुळे व्यक्तिगत प्रगतीला अथवा सामाजिक उन्नतीला अडथळाच निर्माण होतो. आणि एका विशिष्ट उपासना पध्दतीवर पुन्हापुन्हा भर देणे किंवा सिध्दांताची पुनरावृत्ती करणे ही हिंसक भांडणे उद्‌भवण्याचे सबळ कारण ठरू शकते. त्यातून रक्तपात व धर्मावरील श्रध्देचा संपूर्ण विनाश घडून येईल. म्हणचेज प्रत्यक्ष धर्मावरील व पर्यायाने ईश्वरावरील विश्वास संपुष्टात येईल.

हरिजन, 30 जानेवारी 1937

36

धर्माची समानता

सी.एफ. अॅन्ड्रयूज : "जो माणूस खोलवर विचार आणि प्रार्थना केल्यानंतर असे म्हणत असेल की मी ख्रिश्चन झाल्याशिवाय मला मुक्ती मोक्ष व शांती लाभ मिळणार नाही, त्या माणसाला तुम्ही काय सांगाल ?"

गांधीजी : "मी असे सांगीन की एखादा गैर ख्रिश्चन-समजा हिंदू माणूस ख्रिश्चनाकडे आला व त्याने तसे विधान केले तर, त्याने त्याला चांगला हिंदू बनण्याचा सल्ला द्यावा, धर्मांतरात चांगलेपण शोधण्यास सांगू नये."

सी.एफ.ए. : "मी याबाबत तुमच्याशी पूर्णपणे सहमत नाही ही माझी स्थिती तुम्हाला माहीत आहे. केवळ ख्रिश्चन असेल तरच त्या माणसाला मुक्ती मिळू शकेल, हा विचार मी फार पूर्वीच मनातून काढून टाकला आहे. परंतु समजा "ऑक्सफर्ड ग्रुप मुव्हमेंट" च्या चळवळीतील लोकांनी तुमच्या मुलाचे परिवर्तन करून दाखविले, व तुमच्या मुलाचाही कल धर्मांतरांकडे गेला तर तुम्ही काय कराल ?"

गांधीजी : "मला हेच म्हणावयाचे आहे की ऑक्सफर्ड ग्रुपच्या लोकांनी पाहिजे तेवढ्या लोकांची जीवने सुधारून दाखवावीत पण धर्मांतर करून नव्हे. त्यांच्या त्यांच्या धर्मातील श्रेष्ठ तत्वांकडे, त्यांचे लक्ष वेधून द्यावे आणि त्या तत्वांनुसार आचरण ठेवा असे सांगावे. एकदा माझ्याकडे एक ब्राह्मण आईबापाचा मुलगा आला व म्हणू लागला की तुमची (अॅन्ड्रयूज) पुस्तके वाचून मला ख्रिश्चन धर्म स्वीकारावासा वाटू लागला आहे. मी त्याला विचारले की, तुझ्या पूर्वजांचा (हिंदू) धर्म चुकीचा आहे असे तुला वाटते काय ? तो म्हणाला, "नाही". मग मी म्हणालो, "बायबल हा जगातील महान ग्रंथ आहे. आणि येशू हा जगातील एक महान् धर्मगुरू आहे असे समजण्यात तुला काही अडचण येत

आहे काय ? मी त्याला सांगितले की तुम्ही (दीनबंधू) आपल्या पुस्तकातून हे कधीही सांगितले, नाही, की हिंदुस्थानी लोकांनी बायबल मान्य करून ख्रिश्चन धर्म स्वीकारावा. त्याने तुमच्या पुस्तकातून चुकीचा अर्थ काढला आहे – अर्थात् तुमचीही वृत्ती त्या एम. मोहमदअल्लीसारखी असेल तर गोष्ट वेगळी, जो म्हणत असे की, इस्लाम धर्माला मानणारा मुसलमान आचरणाने व वृत्तीने कितीही वाईट असला तरी चांगल्या हिंदूपेक्षा तो श्रेष्ठच असतो."

सी.एफ.ए.: "मला एम. मोहम्मद अल्लींची भूमिका आणि मते मुळीच मान्य नाहीत. परंतु मला असे म्हणावेसे वाटते की, एखाद्या माणसाला धर्म बदलणे खरोखरच आवश्यक वाटत असेल, तर आपण त्याच्या आड येऊ नये."

गांधीजी : "पण तुमच्या हे लक्षात कसे येत नाही की तुम्ही त्याला संधी देखील देत नाही. तुम्ही त्याची उलटतपासणी देखील करीत नाही. समजा माझ्याकडे एखादा ख्रिश्चन माणूस आला व म्हणाला भागवत वाचून मी मंत्रमुग्ध झालो आहे व म्हणून मला हिंदू व्हावेसे वाटते, तर मी त्याला म्हणेन, "नाही, अरे जे भागवतात सांगितले आहे, तेच बायबलमध्ये पण सांगितले आहे. फक्त तू ते शोधावयाचा प्रयत्न केला नाहीत. म्हणून तू तसा प्रयत्न कर व चांगला ख्रिश्चन हो."

सी.एफ.ए.: "मला काही हे सांगता येत नाही. जर कुणी मला उत्कटतेने म्हणाले की मला चांगले ख्रिश्चन व्हावयाचे आहे तर मी म्हणेन; तू चांगला ख्रिश्चन होऊ शकतोस. पण तुम्हाला हे ही माहीत आहे की माझ्याकडे जे लोक उत्साहाने, उत्कटपणे ख्रिश्चनधर्म स्वीकारण्यास आले होते, त्यांना मी अत्यंत दृढतेने त्यापासून परावृत्त केले होते. मी त्यांना म्हणालो, खचितच माझ्यामुळे तरी तुम्ही असे काही (धर्मांतर) करू नका. परंतु मानवी स्वभावानुसार माणसाला कुठेतरी दृढ श्रध्देची गरज भासते."

गांधीजी : "जर कुणाला बायबलवर श्रध्दा ठेवावयाची असेल तर त्याने जरूर ठेवावी पण त्यासाठी स्वतःच्या धर्माचा त्याग करावयाची काय गरज ? या धर्मांतराच्या प्रवृत्तीमुळे जगात कधीही शांतता लाभणार नाही. धर्म ही अतिशय खाजगी बाब आहे. आपण आपल्या अंतरप्रकाशानुसार जीवन जगावे. एकमेकाच्या उत्कृष्ट गुणांमध्ये सहभागी व्हावे, आणि मानवजातीच्या ईश्वराकडे होणाऱ्या वाटचालीत अधिक भर टाकीत जावे.

गांधीजी पुढे म्हणाले, "विचार करा, तुम्ही कोणती भूमिका घेणार ?" एकमेकांच्या धर्माविषयी परस्पर सहिष्णुता बाळगून दर्शवावयाची की धर्माची समानता मानावयाची. माझे मत असे की, जगातील सर्व महान धर्म हे मूलतः समान आहेत. आपण स्वधर्माविषयी जशी आदरभावना बाळगतो, तसाच इतरांच्या धर्माबद्दलही आदरभाव ठेवावा. लक्षात ठेवा, फक्त परस्पर सहिष्णुता नव्हे, तर सर्व धर्माविषयी समान आदर बाळगावा, सर्व धर्म समभाव ठेवावा."

हरिजन, 28 नोव्हेंबर 1936

37

ख्रिश्चन मिशनांची हिंदू धर्माबद्दलची भावना

मला अशी भीती वाटते की, आताशा माझे ख्रिश्चन मित्र जरी काही म्हणत नाहीत अथवा कबूल करीत नाहीत की हिंदू धर्म हा खोटा आहे, तरीही त्यांच्या मनात कुठेतरी हा समज दडलेला आहे की ज्याला ते ख्रिश्चन धर्म मानतात, तोच तेवढा चांगला खरा धर्म आहे आणि हिंदू धर्म हा चुकीचा धर्म आहे. असे काही असल्याशिवाय, इंग्लडच्या चर्च मिशनरी सोसायटी ने (सी.एम.एस)† काढलेले जे निवेदन आहे, ज्यातून काही महत्वाचे उतारे या रकान्यामध्ये मी काही दिवसापूर्वी उद्धृत केले होते, ते तसे का केले हे हे समजणे शक्य नाही आणि त्याला योग्य मानणे तर सोडून द्या. हिंदू धर्मातील अस्पृश्यतेवर कोणी हल्ला केला आणि हिंदू लोकांच्या जीवन पध्दतीतील अनेक चुकीच्या गोष्टी दाखविल्या, तर ते समजण्यासारखे आहे. आणि त्यांनी या चुकीच्या चालीरीतीतून मुक्त होण्यासाठी आणि आमचा धर्म शुध्द करण्यासाठी जर मदत केली तर हे कार्य त्यांचे विधायक सहकार्य मानून त्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानता येतील. परंतु त्यांचे सध्याचे प्रयत्न पाहू गेले असता असे दिसते की त्यांना हिंदू धर्माचे समूळ उच्चाटन करावयाचे आहे आणि त्याजागी दुसऱ्या धर्माची प्रस्थापना करावयाची आहे. हे तर राहते घर पाडून टाकण्यासारखे आहे. त्या घराला दुरूस्तीची जरी आवश्यकता असली तरी त्यात राहणाऱ्या माणसाला ते चांगले व रहाण्यायोग्य वाटते. जे लोक हे घर दुरूस्त करून देण्याचा मार्ग दाखवतील व त्या कामात मदत करतील त्यांचे तो स्वागतच करील, यात नवल नाही. परंतु जे लोक ते घर पाडण्यास सांगतील त्यांचा तर तो निर्धाराने विरोध करील. कारण त्या घराने इतकी वर्षे त्यांची एवढी सोबत केली, वर्षानुवर्षे त्यांच्या पूर्वजांना

---

† हे निवेदन इंग्लडच्या चर्च मिशनरी सोसायटीने प्रसारित केले असून त्यातील काही उतारे हरिजनच्या 26 डिसेंबर 1936 च्या अंकात उद्धृत करण्यात आले आहेत.

आसरा दिला आहे म्हणून जोपर्यंत घरात राहणाऱ्याची खात्री पटणार नाही की हे घर आता राहण्याच्या लायक राहिले नाही आणि आता त्याची दुरूस्तीही करणे शक्य नाही तोपर्यंत ते घर पाडू देणार नाहीत. जोपर्यंत ख्रिश्चन जगतात हिंदू घराबद्दलचे हे मत कायम राहील, तोवर "पार्लमेंट ऑफ रिलिजन्स" आणि 'इंटरनॅशनल फेलोशिप' हे शब्द पोकळ, निरर्थक ठरतील. कारण या दोन्ही शब्दात समान दर्जा आणि समान व्यासपीठ निहित आहे. परंतु समान व्यासपीठ हे उच्च व नीच, ज्ञानी आणि अज्ञानी, उन्नत आणि अवनत, उच्चभ्रू आणि दलित जाती, आतले व बहिष्कृत अशा असमान लोकांचे होऊ शकत नाही. माझी ही तुलना कदाचित दोषयुक्त असेल, कदाचित आक्रमकही वाटेल, माझा तर्क भरभक्कम नसेल, पण माझे विधान मात्र खरे आहे.

हरिजन, 13 मार्च 1937



38

धर्माची समानता

सर्व धर्म सत्य आहेत एवढेच नव्हे तर ते समान आहेत असे जेव्हा गांधीजी एकदा म्हणाले होते, तेव्हा त्यांच्या मनात नक्की काय आहे हे येथे काही दिवसांपूर्वी आलेल्या श्री. कैथान यांना समजू शकले नाही. त्यांना वाटले, की शास्त्रीयदृष्टया सर्व धर्म समान आहेत हे म्हणणे क्वचितच योग्य ठरेल. ईश्वरवादी व जीवात्मवादी यांच्यात तुलना होणारच. श्री कैथान म्हणाले, "मला वाटते, धर्मामध्ये तुलना करीत राहणे योग्य नव्हे. ते वेगवेगळे मार्ग आहेत. तुम्ही ही गोष्ट आणखी वेगळ्या प्रकारे विषद करू शकाल का ?"

"तुमचे हे म्हणणे बरोबर आहे, की धर्माची तुलना करणे अशक्य आहे. पण त्यातूनच अनुमान निघते की ते सर्व समान आहेत. सर्व मानव जन्मतः स्वतंत्र व समान असतात, परंतु त्यापैकी कोणी दुसऱ्यापेक्षा शरीराने व मनाने अधिक शक्तिशाली अथवा दुर्बल असतो. म्हणून वरवर पाहू गेले असता त्या दोघात समता नसते. तथापि, मूलतः ते समान असतात. आपल्या नग्नावस्थेत गांधी कोण व कैथान कोण हा विचार ईश्वर करीत नसतो. आणि या भव्य विश्वात आपण आहोत तरी कोण ? आपण अणुपेक्षाही लहान आहोत आणि अणुमध्ये कोण मोठा व कोण लहान हे विचारण्यात देखील काय अर्थ आहे ? जन्मतः आपण सर्व समान आहोत. विविध वंश, कातडीचा रंग, शरीर आणि मन, विविध हवामान व विविध राष्ट्रे हे सर्व क्षणिक भेद आहेत. त्याचप्रमाणे मूलतः सर्व धर्म समान आहेत. जर तुम्ही कुराण वाचीत असाल, तर ते मुसलमानांच्या नजरेतून वाचले पाहिजे, तुम्ही बायबल वाचीत असाल तर ते ख्रिश्चनांच्या दृष्टीने वाचले पाहिजे आणि जर गीता वाचणार असाल तर ती हिंदुच्या दृष्टीकोनातूनच वाचली पाहिजे. तपशीलाची छाननी करावयाची आणि मग त्या धर्माचा उपहास करावयाचा याला काय अर्थ ? जेनिसिसचे

पहिले प्रकरण किंवा मॅथ्यूच्या पहिल्या प्रकरणाचे उदाहरण घ्या. प्रथम आपण लांबलचक वंशावळ वाचतो आणि शेवटी आपल्याला सांगितले जाते की येशूचा जन्म एका कुमारी मातेच्या पोटी झाला. मग तुमच्यासमोर एक मोठी भिंत उभी राहते. परंतु आपण हे सारे ख्रिश्चनांच्या दृष्टीने वाचले पाहिजे.

श्री. कैथान म्हणाले, "मग आमच्या बायबलमध्ये सुध्दा मोझेस आणि जिझस् हा प्रश्न आहेच. आपण त्यांना समान मानावयाचे काय ? गांधीजी म्हणाले "होय, अर्थात सर्व प्रेषित समान असतात. सर्व समान पातळीवर असतात. जर आपण आईन्स्टीनच्या सापेक्षतावादाच्या संदर्भात विचार केला तर सर्व समान असते. परंतु मी मात्र सहजपणे ही समानता प्रकट करू शकणार नाही."

"म्हणून मी म्हणतो की सर्व धर्म एकसारखेच खरे आहेत आणि एकसारखेच अपूर्ण पण आहेत. त्यामध्ये तुम्ही जेव्हा सूक्ष्मतर रेखा काढू इच्छिता, त्यावेळी तुम्ही युक्लीडच्या सरळरेषेजवळ पोहचत असता, पण ती कधीही खरी सरळ रेषा नसते. धर्मांचा मूल वृक्ष एकच आहे परंतु त्यांच्या फांद्यामध्ये बाहयतः समानता आढळत नाही. कारण त्या सर्व बाजूंनी वाढत असतात. परंतु वाढत असणाऱ्या फांदीवर बसलेल्याने मात्र गर्वाने असे म्हणू नये की "माझीच फांदी श्रेष्ठ आहे." कुणीही कुणापेक्षा श्रेष्ठ नसते व कुणीही कनिष्ठ नसते.

हरिजन, 13 मार्च 1937

39

गांधीजी आणि दलितवर्ग

मी स्वतःला नेहमी एक सनातनी हिंदू म्हणवितो. धर्मशास्त्र ग्रंथाच्या बाबतीत मी अगदी अनभिज्ञ आहे असे नव्हे. परंतु मी संस्कृतचा गाढा विद्वान नाही. मी वेद, उपनिषदे यांचे फक्त अनुवादच वाचले आहेत. त्यामुळे स्वाभाविकतःच माझा संस्कृत ग्रंथांविषयीचा अभ्यास सखोल व विद्वत्तापूर्ण नाही. माझे त्या ग्रंथांविषयीचे ज्ञान संपूर्ण व खोल आहे असे मी मानीत नाही, परंतु मी त्यांचा अभ्यास मात्र एखाद्या खऱ्या हिंदूप्रमाणे केलेला असून त्या ग्रंथामागील भावना व त्याचे सार मी आत्मसात केलेले आहे असे म्हणू शकतो. मी एकवीस वर्षाचा झालो तेव्हा माझा इतर सर्व धर्माचाही अभ्यास झाला होता.

माझ्या आयुष्यात असा एक काळ असा होता की हिंदू धर्म व ख्रिश्चन धर्म या दोहोंच्या हिंदोळ्यावर माझे मन हेलकावीत होते. परंतु जेव्हा माझ्या मनाने समतोल गाठला, तेव्हा मला आढळून आले की, मला जर मोक्षप्राप्ती हवी असेल तर ती फक्त हिंदू धर्मानेच मिळू शकेल आणि त्यानंतर माझी हिंदू धर्मावरील श्रध्दा अधिकच प्रगाढ व ज्ञानमय होत गेली.

परंतु असे असून ही माझी ही धारणा आहे की अस्पृश्यता ही हिंदू धर्माचा भाग नाही, आणि जर तसे असेल तर मग असा हिंदू धर्म मला नको.

हे खरे आहे, की अस्पृश्यता हे पाप आहे असे हिंदू धर्म मानीत नाही. शास्त्रांच्या भाष्यांबद्दल व अर्थ लावण्याबाबत मी कोणत्याही वादात पडू इच्छित नाही. माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी भागवत अथवा मनुस्मृतिच्या दाखल्यांचा उपयोग करून विशद करणे मला कदाचित फार जड जाईल. परंतु माझा असा दावा आहे की मी भावना जाणून चुकलो आहे. अस्पृश्यतेला मान्यता देऊन हिंदू धर्माने एक पाप केले आहे. त्यामुळे आपले

भयंकर अधः पतन झालेले आहे. आणि ब्रिटिश साम्राज्यातही आपल्याला हीन दर्जा मिळाला आहे. मुसलमानांना सुध्दा आपल्या संगतीने या रोगाची लागण झाली आहे. आणि दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका व कॅनडा येथील मुसलमान देखील हिंदूप्रमाणेच निकृष्ट जात मानू लागलेत. हा सारा दुष्परिणाम अस्पृश्यतेच्या पापातूनच उद्‌भवला आहे.

यंग इंडिया, 27 एप्रिल 1921

40

अस्पृश्यतेचे पाप

अस्पृश्यता ही धर्माने मान्य केलेली बाब नव्हे, ती सैतानी करामत आहे. सैतानाने नेहमीच धर्मग्रंथांना उद्धृत केले आहे. पण धर्मशास्त्राच्या ग्रंथांचे स्थान कधीच बुध्दी आणि सत्य यांच्या वरचे असू शकत नाही. त्यांचा उद्देश्य बुध्दी शुध्द करणे व सत्याला प्रकाशित करणे हा असतो. वेदांनी तसा उपदेश केला असेल, हरकत घेतली नसेल, यज्ञाला मान्यता दिली असेल, असे असेल तरीही मी कोण्या उत्तम अश्वाची यज्ञात कदापि आहुती देणार नाही. वेद हे दैवी व अलिखित आहेत असे मी मानतो. केवळ अक्षरज्ञान मारक ठरते. परंतु त्यामागील सारतत्व असते, ते प्रकाश दाखविते आणि वेदांचे सार हे म्हणजे निर्मलता, सत्य, निष्पापता, पवित्र्य , नम्रता, साधेपणा, क्षमाशीलता, ईश्वरीय शक्ती इत्यादी अनेक गुण, हे आहे आणि स्त्रीपुरुषांना दिव्यभव्य व शूर वीर बनविणारे आहे. पण आपल्या राष्ट्रातील थोर आणि न कुरकुरणाऱ्या सफाई कामगारांना कुत्र्यापेक्षाही निकृष्ट दर्जाची वागणूक देऊन त्यांच्यावर थुंकून, त्यांचा तिरस्कार करणे, यात कुठलाही मोठेपणा किंवा शौर्य कदापि नाही हे कक्षात घ्यायला हवे.

यंग इंडिया, 19 जानेवारी 1921



41

साप्ताहिक पत्र

माझे अस्पृश्यतेबद्दलचे विचार हे काही माझ्या पाश्चात्य शिक्षणाचा परिपाक नव्हे. माझे हे विचार इंग्लडला जाण्यापूर्वीच पक्के झाले होते व धर्मशास्त्रग्रंथांचा अभ्यास करण्याच्या कितीतरी आधी अशा स्थितीत ही जडणघडण झाली होती, की जेव्हा असे विचार करण्यास वातावरण मुळीच अनुकूल नव्हते. तेव्हापासूनच माझे ते विचार होते कारण मी एका सनातनी वैष्णव कुटुंबात जन्मलो आणि मला कळू लागल्यापासूनच या प्रश्नांबाबत कुणाशीही तडजोड न करता मी निर्णायत्मक मते बनविली होती. तीच मते पुढे हिंदू धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर आणि स्वतः या अनुभवाच्या आधारावर अधिक पक्की झालीत. कुठल्याही धर्मशास्त्रांत या पाचव्या वर्णाचा उल्लेख नाही, हे सत्य असून देखील व गीतेत ब्राह्मण व भंगी (सफाई कामगार) हे समान माना असा स्पष्ट आदेश असताना देखील आपण लोक हिंदू धर्मावरील असलेला व खोलवर रुजलेला हा अस्पृश्यतेचा कलंक अजूनही का टिकवून धरीत आहोत हे मला काही उमजत नाही. ब्राह्मण व भंगी समान आहेत असे म्हणण्यात जो गुणांनी खरा ब्राह्मण असेल त्याचा तुम्ही योग्य आदर करणार नाही असे नाही. त्याचा अर्थ असा की ब्राह्मण आणि भंगी यांना पण समान सेवेचा हक्क आहे. म्हणजे भंग्याला देखील चांगल्या शाळेमध्ये मुलांना आपल्या शिक्षण देण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक मंदिरे त्यांच्यासाठी खुली करणे, सार्वजनिक विहिरींचा वापर करण्याची मुभा देणे इत्यादी अधिकार जे इतर हिंदुना उपभोगता येतात, ते सर्व उपभोगण्याचा अधिकार त्यांनाही मिळालाच पाहिजे.

यंग इंडिया, 17 फेब्रुवारी 1927



42

सहस्त्रमुखी राक्षस

I

एक पत्रकार विचारतो : "तुम्हाला असे वाटते काय की अस्पृश्यांच्या स्पर्शाचा आणि दर्शनाचा विटाळ मानण्याच्या पापाचे मूळ वैदिक साहित्यात आहे ?"

मला वेदांचे प्रत्यक्ष ज्ञान नसल्यामुळे मी जरी या विषयावर अधिकारवाणीने बोलू शकत नसलो तरी पण माझा वेदांच्या शुचितेवर पूर्ण विश्वास आहे. आणि म्हणून मी ठामपणे म्हणू शकतो की दर्शन व स्पर्शाचा विटाळ मानण्याच्या या पापाला वेदांचा आधार नाही. यावर मी हेही सांगू इच्छितो की मूळ वेदांमध्ये काहीही असो, जर ते नैतिकतेच्या विरोधी असेल, तर ते वेदांच्या भावनेशी विसंगत आहे असे स्पष्ट सांगून त्याचा इन्कार करावा. आणि याहूनही अधिक म्हणजे ते मूलभूत नीतीमूल्यांच्या विरोधी म्हणून तर ते ताबडतोब नाकारले पाहिजे.

पुढील चार प्रश्नांचे सार खालीलप्रमाणे आहे :

"तुम्हाला असे वाटत नाही काय की कर्मकांड हे चुंबकीय सिध्दांतांच्या ज्ञानावर आधारलेले आहे आणि त्यामुळे स्पर्श, दर्शन जन्मप्रदूषण व मृत्युप्रदूषण, विटाळ, यासंबंधीचे नियम हे मनाच्या शुध्दीकरणासाठी वापरलेले उपाय आहेत म्हणून ?"

अशाप्रकारच्या विचारामधून त्यामध्ये काही विशिष्ट सापेक्ष अर्थ आहे असे मानता येईल. परंतु वेद, उपनिषदे, पुराण आणि इतर सर्व शास्त्रग्रंथ व जगातील इतर धर्मदेखील अगदी स्पष्टपणे सांगतात की चित्तशुध्दी ही मनाची ही सर्वस्वी आंतरिक प्रक्रिया आहे आणि शरीरांच्या परस्पर संपर्कामुळे निर्माण होणारे चुंबकत्व हे मनांच्या परस्पर संपर्काने होणाऱ्या सूक्ष्म चुंबकीय तत्वापुढे अगदीच नगण्य ठरते. जेव्हा माणूस उन्मत्तपणे स्वतःला

इतर बांधवापेक्षा श्रेष्ठ मानतो आणि आपल्या या बांधवांना पशुंपेक्षाही निकृष्ट दर्जाची वागणूक देतो. तेव्हा केवळ बाह्य शुध्दीकरण विधी नेहमी आत्म्याचा नाश करणारे ठरतात.

* * *

नियम हे नेहमी बुध्दीला पटणारे असायला हवेत. त्यांना मूलतत्वाला कधीही चिरडू देता कामा नये. अस्पृश्यतेच्या नियमांनी हे दाखवून दिले आहे की ते भावनेच्या विकासला हानीकारक ठरतात आणि हिंदूधर्मात जे जे उत्कृष्ट आणि भव्य दिव्य असेल त्यांच्याशी ते संपूर्णतः विसंगत ठरतात.

यंग इंडिया, 3 ऑक्टोबर 1929

43

डॉ. आंबेडकरांचे आरोपपत्र

वाचकांना आठवत असेल की एक मेला लाहोर येथे भरणाऱ्या जातपात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्षपद भूषविणार होते. परंतु ही परिषद रद्द करण्यात आली. कारण स्वागत समितीला डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण स्वीकारण्यायोग्य वाटले नाही.

परंतु डॉ. आंबेडकर हे स्वागत समितीच्या विरोधापुढे नमते घेणारे नव्हते. त्या नकाराला डॉ. आंबेडकरांनी प्रत्युत्तर म्हणून हे अध्यक्षीय भाषण स्वखर्चाने छापून घेतले आणि त्याची किंमत आठ आणे ठेवली. मी असे सुचवितो की, ही किंमत दोन आणेपर्यंत अथवा चार आणे पर्यंत ठेवावी.

कोणत्याही सुधारकाला या अध्यक्षीय भाषणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जे सनातनी आहेत, त्यांचे ते वाचून फायदाच होईल. पण याचा अर्थ असा नव्हे की या अध्यक्षीय भाषणात विरोध करण्यासारखे काही नाही, यात जर काही गंभीर विरोध करण्यासारखे असले तरीही ते वाचावे लागेल. डॉ. आंबेडकर हे हिंदू धर्माला एक आव्हान आहे. हिंदू म्हणून त्यांचे पालनपोषण झाले, एका हिंदू सत्ताधीशाने त्यांचे शिक्षण केले. पण त्यांना स्वतःला आणि त्यांच्या मंडळींना तथाकथित सवर्ण हिंदूंकडून जी वागणूक मिळाली ती पाहून ते इतके विटून गेले की त्यांनी त्या सवर्ण हिंदुंचाच नव्हे तर त्यांचा व आपला समान वारसा असलेल्या हिंदू धर्माचाही त्याग करण्याचे ठरविले आहे. त्या धर्माचे प्रतिपादन करणाऱ्या काही काही लोकांबद्दल वाटणारी घृणा त्यांनी धर्मावर संक्रमित केली आहे.

परंतु यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण एखाद्या संस्थेबद्दल अथवा

समाज व्यवस्थेचे मूल्यमापन करावयाचे असेल तर ते त्यांच्या प्रतिनिधींच्या वागणुकीवरूनच ठरवावे लागते. याशिवाय डॉ. आंबेडकरांना हे दिसून आले आहे की बहुसंख्य सवर्ण हिंदुनी त्यांच्या बंधु-बांधवांना, धर्मबंधूंना, अस्पृश्य मंडळींना अत्यंत गर्हणीय पशुवत् वागणूक दिली आहे आणि ही वागणूक त्यांनी त्यांच्या धर्मशास्त्रांतील ग्रंथात नमूद केलेल्या आधारावर दिलेली आहे असे सांगितले जाते, म्हणून डॉक्टर साहेब धर्मग्रंथ शोधू लागले तेव्हा त्यांना त्यात अस्पृश्यतेबद्दलच्या समजुतींवर व त्याची अंमलबजावणी करण्यावर भरपूर प्रमाणात अधिकृत साहित्य मिळाले. या अध्यक्षीय भाषणाच्या लेखकाने धर्मग्रंथातील अध्याय व श्लोक साक्ष म्हणून उद्धृत केली असून तीन प्रकारे आपले आरोप त्यात व्यक्त केले आहेत - अमानवीय व पशुतुल्य वागणूक देणे, अस्पृश्यता चालू ठेवण्याबाबत निर्लज्जपणे समर्थन करणे आणि नंतरच्या शोधात प्राप्त झालेला शास्त्राधार व शास्त्रग्रंथाचे दाखले सादर करणे, हे ते आरोप होत.

हरिजन, 11 जुलै 1936

Printed at Jupiter Offset Works, Shahdara, Delhi-110032